
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र.



यथा व्रजगोपिकानाम्

REFBK-0013487

# भक्तिपदतीर्थामृत

## [सार्थ]

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबराव महाराज

मधुर प्रकाशन

कानाम् यथाव्रजगोपिकानाम् यथाव्रजगोपिकानाम्

य व्रजगोपिकानाम् यथाव्रजगोपिकानाम् यथाव्रज

कानाम् यथाव्रजगोपि यथाव्रजगोपिकानाम्

व्रजगोपिकानाम् जगोपिकानाम् यथाव्रज

कानाम् व्रजगो व्रजगोपिकानाम्

व्रज यथाव्रज

व्रज पिका व्रजगोपिकानाम्

व्रजगोप यथाव्रज

व्र प जगोपिकानाम्

जगो म् यथाव्रज

ग जग प कानाम्

ज

ज पि कानाम्

का

ज

जगोपि

ग प ज

न ज पे न

ज

३६८७५

श्रीगुलाबरावमहाराजविरचित

१५.८.६४.

सं.शा.

१६२२

# भक्तिपदतीर्थामृत

( सूक्तिरत्नावलि प्रथमषष्ठ्यन्तर्गत )

द्वितीय आवृत्ति

विवरणकार — श्री बाबाजी महाराज पंडित

★

मधुर प्रकाशन — पंचमार्गविस्तार

९३४८० विजयादशमी

REFBK-0013487

दीड रुपया.

प्रकाशक:—
प्र. भा. चांदले, व्यवस्थापक,
मधुर प्रकाशन, बडकसचौक,
महाल, नागपूर २.

प. महाराष्ट्रातील विक्रेते:—
हिंदुस्थान साहित्य
३०९, शनिवार पेठ,
मोतिबाग, पुणे २.

★

सर्व हक्क श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ, दहिसाथ, अमरावती यांचे स्वाधीन.

★

पुस्तिकावृत्ति

२०००

★

मुद्रक:—
म. बा. बोकारे,
गोपाल प्रिंटिंग प्रेस, महाल,
नागपूर २.

विजयादशमी
शके १८८५
२८-९-१९६३

# निवेदन

परमगुरु श्रीगुलाबरावमहाराज यांच्या प्रथम यष्टयन्तर्गत 'भक्तिपदतीर्थामृत' या ग्रंथाची दुसरी आवृत्ति श्रीबाबाजीमहाराज पंडित यांच्या विवरणासह प्रकाशित करण्याचा सुयोग आज जुळून येत आहे.

श्रीमहाराजांचे समग्र वाङ्मय पुस्तिकावृत्तिरूपाने प्रकाशित करण्याच्या प्रयत्नातील मधुर प्रकाशनाचा हा चवथा आविष्कार वाचकांच्या हाती सानंद देत आहोत.

विषयानुक्रम तयार करून श्री. ज्ञानेश्वर उद्धव मांदरे यांनी ग्रंथप्रकाशनाच्या कामी बहुमोल सहाय्य केले आहे. कृपा करून शुद्धिपत्रानुसार शुद्ध करून घ्यावे.

विजयादशमी

कलिवर्ष ५०६५

: प्रकाशक

# आमची प्रकाशने

## आविष्कार

१ : अलौकिक व्याख्यानमाला २=००

२ : नित्यतीर्थ आळंदीमहिमा (सार्थ) ०=२५

३ : मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराज

चरित्र पूर्वार्ध ३=५०

,, उत्तरार्ध ३=७५

४ : भक्तिपदतीर्थामृत (सार्थ) १=५०

प्राप्तिस्थाने :

१– मधुर प्रकाशन,
बडकस चौक महाल,
नागपूर, २.

२– श्रीज्ञानेश्वर मंदिर
दहिसाथ,
अमरावती, (विदर्भ.)

# विषयानुक्रम

## तरंग शोभा ९—१६

## तरंग १ –

## भक्ति उपक्रम ....पृ. १ ते १९ ....ओव्या ४७


| | |
|---|---|
| गुरुपरंपरा स्मरण, उपास्यपंचायतनाला नमन | पृष्ठे |
| व वाचकलेखकांच्या पंचकाला नमस्कार | १ |
| तीन योगसूत्रांचे ग्रहण | २ |
| अनध्यस्तविवर्त श्रीगुरूंची स्तुति व ते | ओव्या |
| सगुण होण्याची चार कारणे ... | १ – ६ |
| ग्रंथनिर्मितीचा आशीर्वाद ... | ७ – १० |
| भक्तिपेठेला नेण्यासाठी ग्रंथउपक्रम .. | ११ – १२ |
| ज्ञानाने वासनाउपाधीचा नाश होत | |
| नाही, (जास्वंदाचा दृष्टांत) ... | १४ – २८ |
| भक्तीनेच उपाधीचा नाश होतो ... | २९ – ३० |
| ज्ञान व कर्माचा निषेध–गीतेचे प्रामाण्य ... | ३१ – ३२ |
| भक्तीनेच त्रिगुणरहितत्व ... | ३३ |
| भक्ताच्या वासनाहि ब्रह्मरूप ... | ३४ – ३६ |
| भक्तीचा अधिकारी ... | ३७ |
| भक्तिलक्षण ... | ३८ – ४३ |

| | | |
|---|---|---|
| विरहिणीरूपा भक्तिच महावाक्यात प्रतिपाद्य | ... | ४३ – ४५ |
| संतांना विनंति | ... | ४६ |
| श्रीज्ञानेश्वर महाराजांना अध्यायसमर्पण | ... | ४७ |

## तरंग २ –

## तत्पदार्थ निरूपण ....पृ. २० ते ४७ ....ओव्या ७९

| | | |
|---|---|---|
| विश्वाचे अधिष्ठान श्रीगुरुच | .. | १ |
| सांख्य, योग व वेदान्ताचा समन्वय | ... | २ |
| जीवाचे लक्षण (कनकबीजाचा दृष्टान्त) | ... | ३ – ४ |
| जीवाच्या उद्धाराकरिता श्रीगुरुचे करुणेने अवतार धारण | ... | ५ – ९ |
| सद्‌गुरुला नमन | ... | १० |
| तत्वमसि महावाक्यांतून भक्ति बोध सिद्धि | ... | ११ – १२ |
| गुरुप्रेमापुढे ब्रह्माचे न्यूनत्व | ... | १३ |
| महावाक्याचा अर्थ | ... | १४ |
| 'तत्त्वमसि' श्रेष्ठ कां ? | ... | १५ – १६ |
| तत्पदनिरूपणाचे कारण | ... | १७ – १८ |
| महावाक्याचा विषय | ... | १९ |
| 'तत्'ची दोन लक्षणे | ... | २० |
| १–तटस्थ लक्षण | ... | २१ – २४ |

२–स्वरूप लक्षण ... २५

ईश्वराचे तटस्थ लक्षण स्वरूप वर्णन ... २६ – २७

प्रतिबिंबवाद निराकरण ... २७ – ३०

भक्ताला जगदाभासहि नाही (मृग–मनुष्य–चक्रवाकाचा व पतिव्रता–वेश्येचा दृष्टान्त) ... ३१ – ३३

गुरुकृपेनेच महावाक्यातील भक्तिप्रतीति ... ३४

भगवंताच्या भजनाच्या वाच्यांशाचा पहिला प्रकार ... ३५ – ३९

" " दुसरा प्रकार ... ४० – ४२

त्वंपदाचा लक्ष्यांश जाणणारा हाच अधिकारी व त्याचेच 'असि'पदी ऐक्य ... ४३ – ४८

स्वरूपगुणांची सिद्धी ... ४९ – ५५

भयदाते तटस्थ–लक्षण ... ५६ – ५७

प्रेमरूप स्वरूपलक्षण ... ५८ – ५९

गोपींचा व्यापक अनुभव ... ६०

सगुणाचे सत्यत्व (सर्परज्जु व सुवर्णालंकारांचे दृष्टान्त) ... ६१ – ७४

लययोगाने सगुणाची सिद्धी ... ७५ – ७६

सगुणावर पतिव्रतेप्रमाणे प्रेमस्थापन व अध्याय समर्पण ... ७७ – ७९

## तरंग ३ –

त्वंपदनिरूपण ....पृ. ४८ ते ६५ ...ओव्या ४९

श्रीगुरु महिमा वर्णन व स्तुति ... १ ते १३
महावाक्याचा अधिकारी ... १४
भक्त्यनुसार त्वं पद निरूपण ... १५
मलीन त्वं पदवाच्यांश ... १६ – १७
शुद्ध त्वंपदवाच्यांश ... १७ – १८
ईश्वर व जीव दोन्ही आभासच,
पण सामर्थ्य दृष्टचा दोहोत फरक ... १९ – २०
परमार्थात द्वैताद्वैत नाहीं ... २१
त्वंपद वाच्यांश वर्णन ... २२ – २६
त्वंपद लक्ष्यांश वर्णन ... २७ – २९
भक्तिशिवाय ज्ञान व्यर्थ कां
याची मीमांसा (स्वामिनीचा आणि
सुवर्णबेडीचा दृष्टांत) ... २९ – ४३
'त्वं'पदाने तत्पदाचे भजन ... ४४
स्वरूप भजनाची खूण ... ४५
मुक्तीला वेश्येची उपमा ... ४७
आत्मनिवेदनपूर्वक माऊलीला
अध्यायसमर्पण ... ४८ – ४९

## तरंग ४ –

### असिपद विवरण ....पृ. ६६ ते ८८ ....ओव्या ६७


श्रीज्ञानेश्वर गुरुमाऊलीची स्तुति ... १ – ७

ऐक्यभजनाचे, स्त्रीच्या तीन अवस्थांप्रमाणे तीन प्रकार ... ८ – ९

१ अलंकार भजन ... १० – १३

२ स्वरूप भजन ... १४ – १७

३ ऐक्यभजन ... १८ – २१

सगुणभक्तीसाठीच निर्गुणब्रह्माची गोडी ... २२

सत् चित् व आनंदाचा अर्थ ... २३

खरे पारमार्थिक ऐक्य भजन ... २४ – २५

सत्, चित् व आनंदाचे ऐक्य ... २६ – ३२

भक्ताची दुःखासंबंधी वृत्ति ... ३३

भक्तांना व्युत्थान नाही ... ३४

भगवंताचे नाम, रूप आणि प्रेम यांचे ऐक्य ... ३५

तस्य त्वं तदेव त्वं, तत्वमसि यांचे नाविन्यपूर्ण अर्थ ... ३६ – ३७

ब्रह्म निर्गुण नसून सगुणच आहे ... ३८

सगुणता ब्रह्मालाच अर्पण करावी व आपण दास व्हावे ... ३९ – ५१

(गृहिणी, दिवा, सूर्य यांचे मार्मिक दृष्टांत;
भक्तीने प्रारब्धदु:खाची निवृत्ति–४६;
जाणीवेने सच्चिदानंदत्व आणि कृष्णरूप
दोन्ही मिळत नाही–४९)

भक्तींत ... ५२ – ५९
शृंगार वीर, करुण
शान्त, हास्य, भयानक
अद्भुत, बीभत्स, रौद्र, माधुर्य
इत्यादि सर्व रसांची प्रतीति
रसरूप रसग्राहक व रसाधिष्ठान
श्रीकृष्णाला प्रेमरस अर्पण करावा ... ६० – ६२
प्रेमरसाचा तात चरणी अभिषेक आणि
जन्मोजन्म सेवेची मागणी ... ६३ – ६७

## तरंग ५ –

## भक्तिफल निरूपण ....पृ.८९ ते ११० ....ओव्या ७५

श्रीगुरुस्तुति व नमन ... १ – ५
भक्तींतील अन्वयात सगुणाचीच प्रतीती ... ६ – ९
अन्वयांत गौणी व परा असा भेद नाही ... १० – १२
प्रेमरूप भक्तींत ऐक्य ... १२ – १३
भक्ताचे सर्व व्यापार प्रेममय व
सर्व आश्रम संन्यासरूप ... १३ – १८

अन्तर्बाह्य प्रेमच ... १९

प्राणायाम–प्रत्याहार–धारणा–ध्यान–
समाधी सर्व प्रेमात एकवटतात ... २० – २१

प्रेमाने द्वैताद्वैताचा नाश व
राधेसहित हरिप्राप्ति ... २२

प्रेम शब्दापलीकडचे असून विश्वाच्या
अविरोधी आहे. ... २३

श्रीकृष्णप्रेमाची आतुरता ... २४ – २५

गोपींना जारपणाचा दोष नाही
किंबहुना त्यांचा कामच मोक्ष
सुखापेक्षा श्रेष्ठ ... २६

गोपींना व श्रीकृष्णाला नमन ... २७ – २९

श्रुतीरूप सखीच्या साह्याने श्रीकृष्ण भक्ती ... ३० – ३२

परमप्रेमाचे स्वरूप श्रीकृष्ण कां ?
याची मीमांसा ... ३३ – ३६

प्रेमांत भोळा व ज्ञानवान समान ... ३७

प्रेमांतच महावाक्याचा अर्थ
व्यापक व दृढ होतो ... ३८ – ४३

वेदांचा निषेधच स्तवनरूप होतो ... ४४ – ४५

संधीस्थितीत श्रीकृष्ण प्रतीती ... ४५

श्रीकृष्णावर वृक्षाचे रूपक आणि
अर्पणरूपी प्रेमाचे वर्णन ... ४६ – ५०

श्रीकृष्ण सच्चिदानंदस्वरूप व षडगुणैश्वर्याने
युक्त असून रासामध्यें प्रगट आहे ... ५१ – ५२
गोपींना नमन केल्याने रासाची प्राप्ति ... ५३
वाचाऋणमोचन भक्तीनेच ... ५४
भक्तिअभिमानमोचन ऐक्य प्रेमाने ... ५५
ग्रंथपठनाने नित्यसुखदात्री
हरिसेवा प्राप्ति ... ५६ – ५९
अमृतानुभवपठनाचे पुण्य आणि जीव प्राण
ईश्वरपणादि सर्व श्रीमाऊलीच्या चरणी
अर्पण व प्रेमपान्हा पाजण्याची विनंति ... ६० – ६४
गुरुपरंपरास्मरण, त्यांना नमन
आणि मागणे ... ६५ – ७४
ग्रंथाचा अर्थ ... ७५

# मधुराद्वैताचार्य
# श्रीगुलाबराव महाराज

93866

विदर्भात अमरावतीजवळ माधान नावाच्या लहानशा खेड्यात शके १८०३ च्या आषाढ शुद्धात श्रीगुलाबराव महाराजांनी जन्म घेतला. चवथ्या महिन्यात अर्भकावस्थेतच डोळे आल्याचे निमित्त करून त्यांनी आपले डोळे मिटून घेतलेत. आम्ही डोळस त्यांना अंध म्हणू लागलो. तरीपण प्रज्ञाचक्षुत्वादि अलौकिक दिव्यतेमुळे अज्ञानांधःकारात चांचपडणाऱ्या आम्हा तथाकथित डोळसांना परमप्रेमरूप भगवद्भक्तीचा अखंड तेवणारा नंदादीप त्यांनी दाखविला.

अगदी लहानपणापासून त्यांच्या अलौकिक आणि चमत्कारांनी भरलेल्या दिव्य लीला होऊ लागल्या, तरीपण जोरजोराने हात फिरविणे व सारखी मान हालविणे वगैरे त्यांच्या उन्मत्तवत् लीलांनी ते सामान्य लोकांना उन्मत्त वाटत. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव वगैरे ग्रंथावर त्यांची सोपी, प्रभुत्वपूर्ण आणि भक्तिरसाने ओथंबलेली प्रवचने होऊ लागली. पंधराव्या वर्षाच्या आधीपासूनच त्यांची अभंग-वाणी त्यांच्या गोड गळ्यातून लोकांना ऐकू येऊ लागली. त्यांची ओवीबद्ध प्रवचने एकदा सुरु झालीत की तासन् तास सारखी चालत. त्यांच्या ओघवती ओव्या आणि प्रेमळ अभंग ऐकताना श्रीज्ञानेश्वरमहाराजादि संतांनी इतका मोठा ग्रंथविस्तार कसा निर्माण केला असेल, याची यथार्थ कल्पना डोळ्यासमोर साकार होत असे. त्यांच्या ओघवती वाणीला इतका वेग असे की चार चार जण जरी लिहून घेण्यास बसले तरी लिहिल्या जात नसे.

आज आपल्या सौभाग्याने त्यांचे जे पंचवीसेक ग्रन्थ उपलब्ध आहेत ते सर्व त्यांनी ‘ चला लिहा, मी आता हळूहळू सांगतो.’ असे म्हणून लिहवून घेतलेले आहेत. आपल्याला दिपवून टाकणारी ही ग्रन्थसंपत्ति म्हणजे त्यांच्या वाङ्मयीन मूर्तीच्या अलौकिक प्रभेचा एक लहानसा कवडसा आहे.

श्रीमहाराज स्वतःला श्रीज्ञानेश्वरमहाराजांची कन्या आणि श्रीकृष्णपत्नी म्हणत. त्यांच्या गळ्यात मंगळसूत्र, कपाळाला कुंकू, आणि वेणी ही सौभाग्य चिन्हे धारण केलेली असत. श्रीआदिनाथशंकर, मच्छिन्द्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, निवृत्तिनाथ, आणि श्रीज्ञानदेव ही त्यांची गुरुपरंपरास्मरणी आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी त्यांना साक्षात् अनुग्रह दिला. त्यांनी स्थापन केलेला मधुराद्वैतसंप्रदाय नाथसंप्रदाय असून वारकरी पंथाची एक शाखा आहे. त्यांनी श्रीशंकराचार्यांचा अद्वैत वेदान्त आणि संतांची भगवद्भक्ति यांचा उत्कृष्ठ समन्वय करून, श्रुति-स्मृति-पुराणे-इतिहास आणि संतवचने या सर्वांची पूर्ण एकवाक्यता दाखवून, भागवतादि ग्रंथात आणि वैदिक वाङ्मयात आलेला ज्ञानोत्तर भक्तीचा चरम सिद्धान्त सद्युक्तिपूर्वक प्रतिपादन केलेला आहे. या मधुराद्वैताचे ध्येय ‘ अद्वैत ज्ञानानंतर अनध्यस्तविवर्त भगवंताचे ठिकाणी व्रजगोपिकांप्रमाणे सतत माधुर्यप्रेम लागणे ’ हे आहे.

या भागवतधर्माचे पुनःसंस्थापन करताना, आनुषंगिकरित्या स्पेन्सर, डार्विन वगैरे सर्व पाश्चात्य मतांच्या अनुपपत्त्या दाखवून वैदिक विचारसरणीचे त्रिकालाबाधित श्रेष्टत्व सिद्ध करणे आवश्यक होते. त्याप्रमाणे सर्व परमतखंडन-पूर्वक वेदान्तसिद्धान्ताचे सर्वश्रेष्ठत्व सिद्ध केलेले आहे.

या अनुपपत्त्या वाचताना त्यांचे एक वैशिष्ठ्य प्रकर्षाने जाणवते. ते असे की, एखाद्या अवैदिक परमताचा चुकून जरी स्वीकार केला गेला तरी

आपल्याला अभिप्रेत नसलेल्या अपसिद्धान्तांची मालिका आपल्याच गळ्यात कशी येऊन पडते, हे पहाताना आपण गोंधळून जातो, बिचकतो आणि शेवटी नतमस्तक होतो.

आपल्या अवघ्या चवतीस वर्षांच्या आयुष्यात 'संतांचे भाष्यकार' श्रीगुलाबरावमहाराज यांनी केलेल्या कार्याकडे पहाताना श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या ओवींची आठवण येते. " तैसी दशेची वाट न पाहतां । वयसेचिया गांवा न येतां । बाळपणीच सर्वज्ञता । वरी तयाते ।। तयांचे ते बिसाट शब्द । कां न म्हणो येती वेद ।।" इत्यादि ओव्या जणु त्यांनी आपल्या या कन्येकरताच खास केल्या आहेत की काय, असे वाटते.

श्रीज्ञानेशनंदिनीच्या परमार्थातील अधिकाराकडे आणि ग्रंथातील काव्यगुणांकडे पाहिले असता, मराठीच्या सिंहासनावर अभिषिक्त असलेल्या सार्वभौम सम्राट श्रीज्ञानेश्वरमहाराजांची कन्या म्हणून जी ज्ञानेशनंदिनी अगदी यथार्थाने शोभत आहे त्या श्रीज्ञानेश्वरकन्येला अत्यंत प्रिय असलेल्या श्रीज्ञानेश्वरमाऊलीच्या नामघोषात आमची वाणी निमग्न होवो !

# शुद्धीपत्र

| पान-ओळ | अशुद्ध | शुद्ध |
| --- | --- | --- |
| २ – १४ | द्वेष | द्वेष आणि अभिनिवेश |
| ७ – १० | ब्रह्मप्रापीलाच | ब्रह्मप्राप्तीलाच |
| ७ – १९ | ॥ १६ ॥ | ॥ १५ ॥ |
| १५ – १३ | विधवत् | विषवत् |
| २२ – १५ | त्याला आपले | त्याला कृपेने आपले |
| २७ – १९ | निार्ण | निर्माण |
| २९ – २ | अनिवचनीय | अनिर्वचनीय |
| ३४ – १८ | आत | आता |
| ४० – २ | बिग्रहाचारी | विग्रहाधारी |
| ४० – १३ | भगवंत | भगवत् |
| ४५ – १० | परब्रह्माला किंवा | परब्रह्माला मनाने आकलन करता येत नाही |
| ४६ – २० | शर्खी | शेर्खी |
| ५१ – ४ | अंग | अंगें |
| ५८ – १२ | ये नाही | येत नाही |
| ६१ – ६ | पाडले | पाउलें |
| ६२ – १४ | न्यतिरेकें | व्यतिरेकें |
| ६३ – ११ | त्या त्वंपदलक्ष्यांशाचे | (हे शब्द गाळावे) |
| ६३ – १२ | भक्तिकरणे ही प्राप्त झालेल्या ब्रह्मज्ञानाची | (हे शब्द गाळावे) |
| ३ – १५ | दासपणा | दासपण |
| ६७ – १५ | कोंडकौतुकाच्या | कोडकौतुकाच्या |
| ८२ – ४ | त्या भक्ति सुखाची | ह्या भक्ति सुखाची |
| ९९ – १० | रसामध्ये | रासामध्ये |

जन्मांध संतश्रेष्ठ



मधुराद्वैताचार्य
श्रीगुलाबराव महाराज

अनुक्रम ..... वि: ..... नोंद दि: .....

# भक्तिप्रदतीर्थामृत*

## अध्याय पहिला

## *भक्ति - उपक्रम*

नमः श्रीआदिनाथाय नमो मत्स्येन्द्ररूपिणे ।
गोरक्षप्रभवे गैनीनाथायाथ निवृत्तये ।।१।।
परं ब्रह्म परं धाम सच्चिदानंदविग्रहम् ।
ज्ञानेश्वरमितिख्यातं प्रणमामि गुरुं हरिम् ।।२।।
ज्ञानेशो भगवान् विष्णुर्निवृत्तिर्भगवान् हरः ।
सोपानो भगवान् ब्रह्मा मुक्ताख्या ब्रह्मचित्कला ।।३।।
श्रीमान् ज्ञानेश्वराचार्य उमा माता शिवः पिता ।
पतिः कृष्णो राधिकाद्या भगिन्यो गोपिका मम ।।४।।

ऱ्हीं नारायणाय नमः ऱ्हीं ।
ऱ्हीं हरये नमः ऱ्हीं ।
ऱ्हीं दत्तात्रेयाय नमः ऱ्हीं ।
ऱ्हीं व्यंकटेशाय नमः ऱ्हीं ।
ऱ्हीं लक्ष्मणाय नमः ऱ्हीं ।

वाचकं लेखकं वन्दे गुरुं नारायणं हरिम् ।
दत्तात्रेयं व्यंकटेशं पुनर्लक्ष्मणमाभजेत् ।।५।।
नमो अन्येभ्यो लक्ष्मीनायक कृष्ण पर्यायादिपालकेभ्यः।।

---

* भक्तिमातेचे चरणतीर्थरूपी अमृत.

॥ सर्वत्र यशस्वी श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

**मोक्षो यत्प्रणिधानेन प्रणवो यस्य वाचक: ।**
**क्लेशकर्मविपाकाद्यैरविमृष्टं हरिन्नुम : ॥**

**अर्थ :**–भगवान पतंजलींनी योगशास्त्र प्रतिपादन करतांना योगसिद्धि ज्या ईश्वरप्रणिधानांनी सांगितली, ती तीन सूत्रे ग्रहण करून चवथी आमची उपास्य देवता श्रीकृष्ण त्याप्रत वंदन करतो.

**१) ईश्वरप्रणिधानाद्वा ।**

**२) तस्य वाचकः प्रणव :।**

**३) क्लेशकर्मविपाकाशयैरपरामृष्ट: पुरुषविशेष ईश्वर : ।** (योगसूत्र–समाधिपाद.)

**अर्थ :**–(१) ज्या ईश्वराच्या प्रणिधानाने योग सिद्ध होतो.

(२) आणि ॐ हेच ज्याचे नांव आहे.

(३) अविद्या, अस्मिता, राग, द्वेष, हे पांच क्लेश; संचित क्रियमाणादिकर्म, शरीरादि विपाक; व सुख-दु:खादि आशय या सर्वांहून रहित; "आकाश" म्हणजे "दहर" : 'अग्नि' म्हणजे "ज्ञान व सूर्य" : "लक्ष्मी" म्हणजे "भगवच्छक्ति" : "काम" म्हणजे "प्रीति" : "चंद्र" म्हणजे "आल्हाद"– "मन" : "शिव" म्हणजे "परमानंद" : हे

सर्व मिळून झालेले "हरि" नाम त्या देवाप्रत आम्ही स्तवितो. 'हरि' शब्दाचा उद्धार अथर्ववेदोक्त मातृका यंत्रातून केला आहे व वेदाच्या आरंभीहि 'हरि:ॐ' असे स्मरण करावे ('हरि:–' ह म्हणजे आकाश, र्– अग्नि, इ–लक्ष्मी, विसर्ग :– आनंद)

॥ श्रीसद्गुरु ज्ञानेश्वरायनमः ॥

श्रीगणेशायनमः

**ॐ नमः श्री आचार्या । ब्रह्मोपदेशक गुरुवर्या । जी! जी! स्वामी आत्मचर्या । कारणकार्या विरहिता ॥१॥**

हे सद्गुरो आपणाला वंदन असो ! आपण परब्रह्माचा उपदेश करणारे आचार्य असून आपण आत्मस्वरूपाचेच ठिकाणी रममाण होणारे आहात – म्हणजे आपले सर्व व्यापार आत्मस्वरूपच आहेत. आपण कशापासून उत्पन्न होत नाही व आपणापासून दुसरे काही उत्पन्न होत नाही ॥१॥

**सर्वांसी द्यावें आपुलें सुख । निवृत्त करावें त्रिविध दु:ख । यालागीं सगुणात्मक । जाह्लेती देवा ॥२॥**

सर्व जनांना आपले परब्रह्मस्वरूपाचे सुख प्राप्त करून देऊन त्यांच्या आध्यात्मिक, आधिदैविक व आधि-

भौतिक या तिन्ही प्रकारच्या दुःखांचा समूळ नाश करावा, या उद्देशाने आपण सगुणस्वरूप धारण केले आहे ॥२॥

**साचा पोहणार असोनी भला । मृगजळडोहीं बुडाला । हें जाणोनि कर दिधला । काढावया ॥३॥**

हा संसारसमुद्र मृगजळाप्रमाणे खोटा आहे-म्हणजे तो अस्तित्वांतच नाही. म्हणून जीव हा खरोखर बुडालेला नाही; पण नसत्याच संसारसमुद्राच्या अस्तित्वाची कल्पना करून तो आपल्याला त्यांत बुडालो, असे समजतो. हे जाणून त्याला वर काढण्याकरितां आपण आपला हात दिला ॥३॥

**कां अमृतें न होवोनी तृप्त । लाळ घोटी क्षुधार्थ । तयाच्या प्रेमदुग्धदानार्थ । आगमन कीं ॥४॥**

किंवा अविनाशी अशा निर्गुण आत्मस्वरूपाच्या प्राप्तीनेहि समाधान न होता सगुण स्वरूपाच्या प्रेमाच्या भुकेने तळमळणाऱ्या जीवाला भक्तिप्रेमरूप दुग्ध पाजण्याकरितां आपण प्रगट होत असता ॥४॥

**तरी तुमच्या कृपाबळें । परम प्रीतीच्या कल्लोळें । पतिपत्नीभक्तीचे डोहळे । कीं सोहळे स्वानंदसुखाचे ॥५॥**

म्हणूनच तुमच्या कृपेने अन्तःकरणांत परमप्रेमरूप वृत्तीची लाट उसळून पतिपत्नीसंबंधाने भगवंताचे प्रेम करावे किंवा स्वानंदसुखाचे सोहळे भोगावे, अशी तीव्र इच्छा उत्पन्न झाली आहे ॥५॥

**तें आपण एकोची न भोगावें । कांहीं दुजियासही द्यावें । हें उदारपण स्वभावें । तुमचा प्रसादू ॥६॥**

आपण एकट्यानेच ते सुख न भोगता दुसऱ्यालाहि ते प्राप्त करून द्यावे असे जे वाटते, ते औदार्य, तुमच्या कृपाप्रसादाचेच फळ होय ॥६॥

**तो उल्हासरूपें चित्तीं । अधिष्ठाता होवोनि ग्रंथीं । प्रारंभ करी महावाक्यार्थी । भक्तिपदतीर्थामृत नामें ॥७॥**

तो प्रसाद अंतःकरणांत उल्हासरूपाने प्रगट होऊन या ग्रंथाला अधिष्ठाता–म्हणजे ग्रंथ करण्यास कारण–होऊन महावाक्याचा अर्थ स्पष्ट करणारा " भक्तिपदतीर्थामृत" नामक हा ग्रंथ प्रारंभ करीत आहे ॥७॥

**तरी माये आतां । माझी ग्रंथकर्तेपणाची वार्ता । नेवोनि, कृपाकर माथां । ठेविजे स्वामी ॥८॥**

तरी हे सद्गुरु आई ! "मी ग्रंथकर्ता आहे" हा कर्तृत्वाभिमान उत्पन्न होऊ न देता–अशी ख्याति उत्पन्न होऊ न देता–माझ्या मस्तकावर कृपाहस्त ठेऊन आपण ग्रंथसिद्धी करावी ॥८॥

**इया बोबडिया बोला । प्रभू तात संतोषला ।**
**मग ग्रंथीं आश्रयो दिधला । उठी म्हणे ॥९॥**

असे हे बोबडे बोल ऐकून माझे तात श्रीज्ञानेश्वर महाराज परम संतोष पावले व मग त्यांनी अभय देऊन "उठ, ग्रंथ कर" असे म्हणून ग्रंथाला आश्रय दिला ॥९॥

**श्रीज्ञानेश्वर गुरु माउली । करूनी कृपेची साउली ।**
**प्रेमप्रसादें पान्हावली । मुखीं स्तन घाली स्नेहवशें ॥१०॥**

श्रीगुरु श्रीज्ञानेश्वर माउलींनी मजवर आपल्या कृपेची सावली केली व माझ्याविषयीं प्रेमप्रसादाचा पान्हा येऊन माझ्या मुखांत अत्यंत स्नेहाने तिने आपला स्तन दिला ॥१०॥

**तें दुग्ध पिऊनि गोमटें । जन न्यावया भक्तिपेठें ।**
**ग्रंथ जहाज प्रकटें । पंचकें केलें ॥११॥**

माउलीच्या स्तनातील ते सुंदर प्रेमदुग्ध पिऊन लोकांना संसारसमुद्रातून भक्तिसाम्राज्यात नेण्याकरिता

हा जहाजरूपी पंचअध्यायात्मक ग्रंथ प्रगट करीत आहे ।।११।।

**तेथ प्रथम अध्यावो । भक्त्युपक्रम नांवो ।**
**बोलिजे सावेवो । संतकृपा ।।१२।।**

त्यात " भक्तीचा उपक्रम " या नांवाचा पहिला अध्याय संतकृपेने निश्चित सुस्पष्टरीतीने सांगितला जाईल ।।१२।।

**तरी हे जीवाप्रती । व्हावी कीं ब्रह्मप्राप्ती ।**
**याचि नांव श्रुती । मोक्ष वदती ।।१३।।**

तरी जीवांना ब्रह्मप्राप्ति व्हावी, हा या ग्रंथाचा उद्देश आहे आणि या ब्रह्मप्रातीलाच वेदाने " मोक्ष " असे म्हटले आहे ।।१३।।

**जीव आणि ब्रह्माचें । अत्यंत ऐक्य साचें ।**
**परी जीवा संसाराचें । दृढबंधन ।।१४।।**

जीव आणि ब्रह्माचे खरोखर मुळांत अत्यंत ऐक्यच आहे; पण जीवाने (ब्रह्माशी असलेले ऐक्य विसरून) आपल्याला संसाराशी जखडून घेतले आहे ।।१४।।

**तो संसार उपाधिकृत । केवळ ज्ञानें नाही जात ।**
**उपाधि नासलियावीण त्वरित । ऐका दृष्टान्त, ये विषयीं ।।१६।।**

तो संसार उपाधिजन्य असल्यामुळे उपाधीचा नाश झाल्यावांचून नुसत्या ज्ञानाने संसाराचा नाश होत नाही. या विषयी दृष्टान्त सांगतो, ऐका ॥१५॥

**दर्पणाच्या समोर । जपाकुसुमाकार ।**
**धरितां रक्तप्रकार । दर्पणीं उठे ॥१६॥**

आरशा समोर जास्वंदाचे फूल ठेवले असता त्याचे आरशांत लाल प्रतिबिंब पडते ॥१६॥

**तें दर्पण नेत्रें पाहतां । तरी न जाय रक्तता ।**
**यासी उपाय तत्वतां । एकचि आहे ॥१७॥**

आता आपण आरसा पाहून आरसा लाल नाही, तो स्वच्छ आहे, असे जरी जाणले तरी त्या आरशातील दिसणारा रक्तवर्ण नाहीसा होत नाही. तो रक्तवर्ण न दिसण्याकरता एकच उपाय आहे ॥१७॥

**दर्पण फोडोनि टाकावें । अथवा जपाकुसुम वेकावें ।**
**किंवा संबंधीं न राखावें । एकमेकां ॥१८॥**

( तो उपाय म्हणजे ) आरसा फोडून टाकावा किंवा जास्वंदाचे फूल चोळामोळा करून फेकून द्यावे अथवा त्या दोहोंना एकमेकांसमोर ठेवू नये ॥१८॥

**यांतून एक केलियाविण । मूळरूपा नये दर्पण ।**
**रक्तभ्रांति तेही जाण । निवृत्त नव्हे ॥१९॥**

यांपैकी कोणता तरी एक उपाय केल्यावांचून आरशातील रक्तवर्णाचा प्रतिभास नाहीसा होऊन आरशाचा मूळचा स्वच्छपणा अनुभविता येणार नाही ॥१९॥

**या दृष्टान्तावरोनी आतां । निश्चय साधूं दार्ष्टान्ता । श्रुती याचि सिद्धान्ता । प्रतिपादिती ॥२०॥**

या दृष्टान्तावरून आता निश्चित सिद्धान्त काढू. श्रुतीनेहि हाच सिद्धांन्त सांगितलेला आहे । २०॥

**विपरीतज्ञानोपाधि गाढी । जीवासी बंधन वासनाबेडी । ते ज्ञानें निवृत्त नव्हे फुडो । साधक म्हणोनि ॥२१॥**

'मी देह आहे' हे दृढ विपरीत ज्ञानच जीवाची उपाधि असून देहसुखाची वासना हीच जीवाला बांधणारी बेडी आहे. ज्ञानानच ती कळते म्हणून ज्ञान तिला साधक होते. अर्थात् ज्ञानांने ती निश्चित् निवृत्त होऊं शकत नाही ॥२१॥

**ज्ञानें उपाधि मात्र कळे । परि न निरसे कोणे काळें । येथ उपाधि उपाधेय वेगळे । करितांही न येती ॥२२॥**

ज्ञानाने उपाधि जाणली जाते; पण ती कधीहि निवृत्त होत नाही; (ज्ञानाने 'उपाधि आहे' हे कळते. जर ती ज्ञानाने नाहीशी झाली असती, तर ती कळलीच नसती म्हणजे कळते तेव्हा–ज्ञानकालीहि–ती राहते, हे सिद्ध आहे.

अर्थात् ज्ञानाशी तिचा विरोध नाही.) आणि उपाधि म्हणजे विपरीत ज्ञान व उपाधेय म्हणजे ब्रह्म हे दोन्ही एकमेकांपासून अलगहि करता येत नाहीत ॥२२॥

**सर्वसत्तास्फुरण आत्मा । तयाची नाशरूप नाहीं प्रमा ।**
**विपरीतज्ञान वासना गरीमा । तत्संबंधही सुटेना ॥**

(कारण) आत्म्याची सत्ता सर्वत्र व्यापक आहे. तो कोठे नाही असे नाही; म्हणून विपरीत ज्ञान व दृढ वासना यांचा आत्म्याशी असलेला संबंध सुटू शकत नाही ॥२३॥

**आणि उपाधी नाशिलियावीण । न प्रकाशे सत्-सुख-ज्ञान । उपाधी तंव वासनागहन । ती ज्ञानेकरून नाशेना ॥२४॥**

आणि उपाधि नाहीशी झाल्याखेरीज शुद्ध सच्चिदानंद स्वरूपाचा प्रत्यय येत नाही. आणि दृढ वासना ही उपाधि ज्ञानाने तर नाहीशी होत नाही ॥२४॥

**"भिद्यते हृदयग्रंथि च्छिद्यन्ते सर्व संशयाः ।**
**क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे ॥"**

(मुं. उ. २–२–८)

**"यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा येऽस्य हृदि स्थिताः ॥"**

(कठो. २–६–१४)

**या सर्व स्फुटश्रुती । स्वयें ऐशा बोलती ।**
**कीं हृदयांतील जाती । वासना जेव्हां ॥२५॥**
**तेव्हांचि तो जीवन्मुक्त । अन्यथा पांडित्यावृत ।**
**येणें बोलें अनुमित । उपाधी नाश ॥२६॥**

या सर्व श्रुती असे सांगतात की हृदयांतील विषयवासना निःशेष नाहीशा झाल्यानंतरच जीवन्मुक्त होतो. नाही तर तो केवळ पांडित्याची बडबड करणारा होय. या बोलण्यावरून उपाधि निःशेष नाहीशी होते असे अनुमान करतां येते ॥२५–२६॥

**केवळ ज्ञानेंकरून । उपाधीसीं नाहीं मरण ।**
**आणि उपाधी मेलियावीण । अपवर्ग नाही ॥२७॥**

सारांश, केवळ ज्ञान झाल्याने उपाधीचा निःशेष नाश होत नाही व उपाधीचा नाश होत नाही तोपर्यंत मोक्ष किंवा ब्रह्मप्राप्ति होत नाही ॥२७॥

**हा शुद्ध सिद्धान्त । तरी उपाधी नाशावया निश्चित ।**
**अन्य कारण यथार्थ । शोधिलें पाहिजे ॥२८॥**

असा हा शुद्ध सिद्धान्त असल्यामुळे उपाधीचा नाश करण्याकरिता ज्ञानाशिवाय दुसरे यथार्थ कारण शोधणें भाग आहे ॥२८॥

**ते कारण ईश्वरभक्ती । निष्कामरूपा अलौकिकी प्रीती । देवगुरूंचे ठायीं रीती । समानची ॥२९॥**

**"यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।**
**तस्यैते कथिताह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः ॥"**

(श्वेताश्वतरोपनिषद अ. ६.)

ते कारण म्हणजे सगुण परमेश्वराची भक्ति हे होय. परमेश्वरापासून विषयसुख मिळविण्याची यत्किंचित् इच्छा न धरता परमेश्वर व मी एक आहे, असे जाणून त्याचे आत्मप्रेमवत् म्हणजे स्वाभाविक निःसीम प्रेम करणे याला भक्ति म्हणतात. ही भगवान व श्रीगुरु यांचे ठिकाणी सारखीच असायला पाहिजे ॥२९॥

**जैसी परमप्रीती ईश्वरीं । तैसीचि गुरुचरणावरी । तेणें तत्प्रतिप्रादित अविकारी । अर्थ प्रकाशू होय ॥३०॥**

ज्याचे भगवंताचे व श्रीगुरूंचे ठिकाणी निःसीम प्रेम आहे त्याच्याच बुद्धीत वेदाने प्रगट केलेले अर्थ जसेच्या तसेच यथार्थ प्रकाशित होतात.

**आणि गीतेमाजीं भगवंत । स्वयें भक्त्युत्कर्ष सांगत । ज्ञानकर्मादि समस्त । निषेधुनी ॥३१॥**

आणि गीतेत स्वतः भगवानहि ज्ञान–कर्म–योग यांच्यापेक्षा भक्ति श्रेष्ठ आहे असेच सांगतात ॥३१॥

" तत्र सत्वं निर्मलत्वात् प्रकाशकमनामयम् ।
सुखसंगेन बध्नाति ज्ञानसंगेन चानघ ॥६॥
रजो रागात्मकं विद्धि तृष्णासंगसमुद्भवम् ।
तन्निबध्नाति कौंतेय कर्मसंगेन देहिनम् ॥७॥
तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्व देहिनाम् ।
प्रमादालास्य निद्राभिस्तन्निबध्नाति भारत ॥८॥"

(गीता अध्या. १४)

**सत्वगुणपाशें बांधी ज्ञान । रजोगुणपाशें कर्मबंधन ।**
**तमोगुणपाशें व्यर्थ मरण । येत देहा ॥३२॥**

याप्रमाणे सत्वगुणाच्या पाशाने ज्ञानाहंकाराचे बंधन होते, रजोगुणाच्या पाशाने कर्माचा बंध होतो आणि तमोगुणाच्या पाशामुळे जीवाला व्यर्थ दुःखे भोगावी लागतात ॥३२॥

मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते ।
स गुणान् समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते ॥

भगवद्गीता अ. १४–श्लो. २६.

**एवं हे सकळ बांधिती । म्हणोनी अव्यभिचारिणी भक्ति । माझी करितां, त्रिगुणाप्रती । वेगळा होय ॥३३॥**

याप्रमाणे हे सत्वादि तिन्ही गुण जीवाला बद्ध करणारे आहेत; म्हणून माझी अनन्यभक्ति केली असता पुरुष त्रिगुणरहित होतो ॥३३॥

**त्याच्या ब्रह्मरूप वासना । तोचि ब्रह्मप्रापक जाणा ।**
**कीं जीवन्मुक्तीच्या गृहीं पाहुणा । तोचि एक ॥३४॥**

मग त्याच्या सर्व वासना ब्रह्मरूपच होऊन जातात. तोच परब्रह्माच्या प्राप्तीला पात्र होतो. आणि तोच जीवन्मुक्तीच्या घरी पाहुणा होतो. म्हणजे त्याला जीवन्मुक्तस्थिति प्राप्त होते ॥३४॥

**जीवन्मुक्तीही जालियावरी । निरपेक्ष कृष्णसेवा करी ।**
**तयाचा विकला श्रीहरी । जीवें भावें ॥३५॥**

ही जीवन्मुक्त स्थिति प्राप्त झाल्यावरहि जो भगवंताची निष्काम प्रेमभक्ति करतो, भगवान्, मनापासून सर्वस्वी त्याच्या स्वाधीन होऊन राहतो ॥३५॥

**एवं हरिभक्त्युत्कर्ष भला । नारद शांडिल्यें निरूपिला ।**
**तोचि अवलंबूनि वहिला । सांगिजेल ॥३६॥**

याप्रमाणे "सर्व मार्गापेक्षा भक्ति श्रेष्ठ आहे," असा जो भक्तीचा उत्कर्ष भगवान नारदांनी व शांडिल्य ऋषींनी सांगितलेला आहे, त्याचाच आधार घेऊन येथेहि भक्तीचा उत्कर्ष सांगितला जाणार आहे ॥३६॥

## "अथातो भक्ति जिज्ञासा"

**जेणें करूनि कर्मयोगज्ञान । अलंबुद्धी पावला जाण । तो अधिकारी भक्तिकारण । तें भक्तिलक्षण ऐकावे ॥३७॥**

"कर्म–योग–ज्ञान या मार्गांचें अनुष्ठान करून या मार्गांनी खरोखर पूर्ण निर्विकल्प ब्रह्मप्राप्ती होत नाही, म्हणून या मार्गांचे अनुष्ठान आता पुरे झाले" असे ज्याला वाटत असेल तोच या भक्तीचा अधिकारी होय, असे "अथातो भक्तिजिज्ञासा" या सूत्राने सांगितलें आहे. आतां शांडिल्यांनी त्या भक्तिचे जे लक्षण सांगितलें तें श्रवण करू ॥३७॥

## "सा परानुरक्तिरीश्वरे"

**फलाशा गौणी प्रीती । ती विधवत् त्यागूनि चित्तीं । नित्य राखणें परानुरक्ती । या नांव भक्ती शांडिल्य म्हणे ॥३८॥**

विषयसुख प्राप्तीच्या इच्छेने ईश्वराचें प्रेम किंवा भजन करणे हे जे गौण प्रेम आहे, ते विषाप्रमाणे निःशेष सोडून देऊन निष्काम चित्ताने केवळ एका भगवंताचेच अखंड प्रेम करणे यालाच शांडिल्य मुनि "भक्ति" म्हणतात ॥३८॥

**आणि नारदाचें मत । ऐसेंचि असे विख्यात ।**
**असाध्य स्वयंफलरूप निश्चित । अनिर्वचनीय ॥३९॥**

आणि भगवान श्रीनारदाचार्यांचेहि असेच निश्चित मत प्रसिद्ध असून भक्ति ही "स्वयं फलरूपत्वात्" स्वत: फलरूप आहे. ती कोणत्याहि साधनांनी साध्य होणारी नाही. तशीच ती शब्दानी न सांगता येण्याजोगी प्रेमरूप आहे, असे ते म्हणतात ॥३९॥

**"सात्वस्मिन् परमप्रेमरूपा"** (नारद भ. सू.)

**गौणी परा त्यागूनि निश्चितीं । जे अखंड संयोगीं, वियोगप्रीती । ती प्रेमलक्षणा पूर्ण भक्ती । श्रीनारदोक्ती अनुवादू ॥४०॥**

( विषयसुख प्राप्तीच्या इच्छेने भगवंताचे प्रेम करणे किंवा निष्कामचित्ताने भगवंताचे आत्मवत् प्रेम करणे, असे) भक्तीचे गौणी व परा हे दोन्ही भेद टाकून देऊन भगवंताचा अखंड संयोग असतानाहि भगवंताचे वियोग प्रेम असणे याला भगवान नारदांनी प्रेमलक्षणा पूर्ण भक्ति म्हटले आहे ॥४०॥

**प्रेमाचें कैसें लक्षण । प्रभु सूत्रें वदती आपण ।**
**तेंचि येथें प्रमाण । बोलिजेल ॥४१॥**

या प्रेमभक्तीचे लक्षण काय, हे भगवान् श्रीनारदांनी स्वतः आपल्या सूत्रांत सांगितले आहे. तेच प्रमाण येथे आम्ही सांगणार आहो ॥४१॥

**" अनिर्वचनीयं प्रेमस्वरूपम् "** (ना. भ. सू.)

**अज्ञानकाळीं देहप्रीती । ज्ञानकाळीं अहंब्रह्मासक्ती । दोहीं त्यागें अन्वयें शुद्ध प्रीती । त्या नांव भक्ति अनिर्वाच्य ॥४२॥**

" प्रेमरूप भक्तीचे स्वरूप सांगण्याजोगे नाही–म्हणजे केवळ अनुभविण्याजोगे आहे."

अज्ञान असेतोपर्यंत स्थूलदेहाचे प्रेम असते आणि आत्मज्ञान झाल्यावर "मी ब्रह्मस्वरूप आहे" अशी वृत्ति धरून ठेवण्याचे प्रेम असते. हे दोन्ही प्रकार टाकून देऊन नामरूपाने एक सच्चिदानंद परमात्माच नटला आहे, असे समजून नामरूपासह सच्चिदानंद परमात्म्यावर स्वाभाविक प्रेम असणे, याला अनिर्वचनीय प्रेमरूप भक्ति म्हणतात ॥४२॥

**जारिणीचें परपुरुषीं मन । कीं विरहिणीचा विरह गहन । तो विषयभाव वेगळा करून । हरिरूपीं प्रेमयोजन ते भक्ती ॥४३॥**

जारिणी स्त्रियेचे परपुरुषावर जे प्रेम असते किंवा पतिव्रता स्त्रियेचे ठिकाणी स्वपतिविषयी जो थोर विरह असतो, त्या दोहोतील वैषयिकभाव नाहीसा करून जी केवळ शुद्ध प्रेमवृत्ति उरते, तशी शुद्ध प्रेमवृत्ति सगुण भगवंताचे ठिकाणी जडणे, याला भक्ति म्हणतात ॥४३॥

**पुत्रादिरूपा गौणीभक्ती । विरहिणीरूपा परम प्रीती ।**
**ही नारदीयभक्ती । महावाक्यार्थी स्थित असे ॥४४॥**

पुत्रादिरूपाने असे प्रेम असणे हीहि भक्ति गौणच असून अत्यंत भगवद्विरहात्मक परमप्रेमरूप भक्ति हीच सर्व श्रेष्ठ आहे. आणि हीच भगवान् श्रीनारदांनी सूत्रांत सांगितली असून 'तत्त्वमसि" या महावाक्यातूनहि तीच परम भक्ति सांगितली आहे ॥४४॥

**तो महावाक्योपदेशू । ज्ञानेश्वरकृपा सौरसू ।**
**पुढिलिये प्रसंगीं विशेषू । ओसंडेल ॥४५॥**

तो 'तत्त्वमसि' महावाक्यातील परमप्रेमरूप भक्तीचा उपदेश, श्रीसद्गुरु श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या कृपेने पुढील अध्यायात अत्यंत सुरस व सुखरूप असा प्रगट केला जाईल ॥४५॥

**तो संतीं सेविजे सुखें । मज अवधान द्यावें निकें ।**
**आपुलें जाणोनि कृपाटकें । पहावें मज ॥४६॥**

कृपादृष्टीने मजकडे पाहून, मला आपला समजून व माझ्या निरूपणाकडे लक्ष देऊन तो उपदेश संतांनी आनंदाने श्रवण करावा ।।४६।।

**असो या समस्त ओविया । विषयसूत्रीं गुंफोनियां ।**
**श्रीज्ञानेश्वराचार्यपायां । कुसुममाळ अर्पिली ।।४७।।**

असो. ही सर्व ओव्यारूपी फुलें "भक्ति उपक्रम" या विषयरूप सूत्रांत गुंफून ही फुलांची माळ श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या चरणांवर अर्पण केली ।।४७।।

**हरिः ॐ तत्सदिति श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे भक्तिपदतीर्थामृते श्रीगुरुस्तवनरूप मंगलाचरणपूर्वक भक्त्युपक्रम निरूपणं नाम प्रथमस्तरंगः ।।१।।**

भक्तिमातेच्या चरणतीर्थरूपी अमृतसागरांतील गुरुस्तवनाने केलेल्या मंगलाचरणपूर्वक भक्त्युपक्रम निरूपण नामक हा पहिला तरंग होय ।।१।।

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थल
अनुक्रम ......३६८७५...... वि: ....काव्य
क्रमांक ........१६२८........ नों दि: १५/

।। श्रीसद्‌गुरुज्ञानेश्वरायनमः ।।

## अध्याय दुसरा

# 'तत्' पदार्थ निरूपण

।। श्रीगणेशायनमः ।। श्रीकृष्णायनमः ।।

**नमो श्रीसद्‌गुरुमाये । प्रेमें वंदोनिया पाये ।**
**हा बाल्यपणाची होये । विश्वाधिष्ठाता ।।१।।**

हे सद्‌गुरु आई ! तुझ्या चरणांना प्रेमाने नमस्कार करतो. तूं या सर्व विश्वाला आधार झाली आहेस, हा तुझा बालपणा म्हणजे खेळ आहे किंवा तुझे विश्वाला आधार होणे हे अज्ञान्याच्या दृष्टीनेच म्हटले जाते ।।१।।

**सांख्याचिया आळणी । योगाचिया पाणी ।**
**वेदान्ताचिया तरुवनीं । वसंत तूं ।।२।।**

सांख्यशास्त्ररूपी आळयात योगशास्त्ररूपी पाणी घालून वेदान्तशास्त्ररूपी वृक्षांचे वन टवटवित करणारा वसंत ऋतु तूच आहेस ।।२।।

**सांख्याचिया आळणी** :—ज्याप्रमाणे झाडाला केलेले आळे पाणी धरून ठेऊन झाडाला वाढविण्यास पोषक होते,

त्याप्रमाणे श्रीगुरु सांख्यशास्त्रातील प्रकृति–पुरुष विवेकरूप सिद्धान्ताचे निरूपण करून शिष्याच्या बुद्धीला " तू संपूर्ण प्रकृतीहून अगदी निराळा आहेस" हे पटवून देतात. अशा रीतीने सांख्यशास्त्र हे झाडाच्या आळयाप्रमाणे आत्मानात्म-विवेक करण्यापुरते वेदान्तशास्त्राला पोषक आहे.

**योगाचिया पाणी** :—ज्याप्रमाणे रोपट्याला आळे केल्यानंतर त्यांत पाणी घातल्या खेरीज ते जमिनीत मूळ धरत नाही, त्याप्रमाणे ब्रह्मप्राप्तिरूप रोपट्याला प्रकृति-पुरुषरूप सांख्यशास्त्राचे आळे केल्यानंतर त्यात अनुभवाचे पाणी घातल्याखेरीज ब्रह्मप्राप्तिरूप रोपटे मूळ धरून दृढ होत नाही. हे योगाचे अनुभवरूप पाणी श्रीगुरुच घालतात.

**वेदान्ताचिया तरुवनी । वसंत तूं** :— वसंतऋतूच्या आगमनाने सर्व झाडे जशी तरुण व टवटवित होतात, त्याप्रमाणे श्रीगुरूच्या मुखाने वेदान्त श्रवण होऊन शिष्याला सर्वत्र एक परब्रह्मच भरले आहे असा अनुभव येतो.

**कनकबीज सेवितां । आपणा स्वयें विसरतां ।**
**ब्राह्मण असोनि तत्त्वतां । शूद्र मी म्हणे ॥३॥**

धोत्र्याचे बी खाल्ले असता खाणाऱ्याचा मतिभ्रंश होऊन तो आपण ब्राह्मण असून स्वतःला शूद्र समजतो ॥३॥

**तेवीं आत्मयाच्या विस्मृती । जे जे देखे द्वैतापत्ती ।**

**ती अविद्या, तेथ आरूढ चिती । तो जीव बोलती मलबद्ध ॥४॥**

त्याप्रमाणे आपल्या अद्वैतस्वरूपाचे विस्मरण होऊन जे द्वैत भासू लागले त्याला अविद्या म्हणतात. आणि त्या अविद्येचा अभिमान धारण करून त्या अविद्यादोषाने युक्त असलेल्या चैतन्याला अशुद्ध जीव म्हणतात ॥४॥

**तिये अविद्येचा चुरा । करावया दातारा ।**
**धरूनि आलेती अवतारा । कारुण्ययोगें ॥५॥**

हे सद्‌गुरो ! जीवाच्या त्या अविद्येचा नाश करण्या-करिता आपण करुणेने सगुण साकार स्वरूप धारण करून प्रगट झाले आहात ॥५॥

**आणि आपुलें म्हणोनि मग । मोक्षाचे तंडूल सुरग ।**
**भोजनयोगें अनुराग । वाढिसी कृपें ॥६॥**

आणि मग त्याला आपले बाळ समजून मोक्षरूपी सुंदर भाताच्या भोजनाच्या मिषाने नू त्याला आपले प्रेमच वाढतेस ॥६॥

**तुझिया कृपादृष्टीपुढें । बंधासी मोक्षपण रोकडें ।**
**चैतन्याचैतन्य फुडे । एकवट होय ॥७॥**

आई ! तुझ्या कृपादृष्टीने बंधच मोक्षरूप होऊन

जातो आणि जड-चेतन हा भेद नाहीसा होऊन त्यांचे, एका चैतन्यरूपाने ऐक्य झालेले स्पष्ट अनुभवाला येते ॥७॥

**मोक्ष द्यावया उदार । न पाहसी कोणाचा अधिकार । पाहता पाहणें हा विचार । नसे तंव ठायी ॥८॥**

मोक्ष देण्यात तू इतकी उदार आहेस की पात्रापात्र-तेचा विचारच तू करीत नाहीस; कारण तुझ्या ठिकाणी पाहणारा व पाहणे हे दोन्ही भाव नाहीत ॥८॥

**नाहीं तें जेव्हां आहे वाटे । तेव्हां विस्मृती हे थाटे । माये तूं भेटलीस जरी वाटे । तरी हें गोमटें परब्रह्म ॥९॥**

मुळीच अस्तित्वांत नसलेले हे जड–विनाशी विश्व "आहे" असे जेव्हा वाटते तेव्हा ते आत्मस्वरूपाचा विसर होऊनच वाटते. अशा स्थितीत म्हणजे या संसार मार्गात तुझी प्राप्ति झाली असता तुझ्या कृपेने हे विश्वच सुंदर परब्रह्मरूप होऊन जाते ॥९॥

**ऐसिया वो मायबहिणी । जीवभाव तनुमन चरणीं । वाहिले, आतां कृपा करोनी । अवधान द्यावें ॥१०॥**

हे सद्गुरु मायबहिणी ! तूं अशी समर्थ असल्यामुळे जीव–मन–देहादि हे सर्व तुझ्या चरणाचे ठिकाणी मी समर्पण केले आहे. आता कृपा करून अवधान दे ॥१०॥

**मागां उपक्रमू बोलिला । जो भक्तिबोधू आला ।**
**तो पाहिजे कीर झाला । महावाक्योपदेशू ॥११॥**

मागील अध्यायांत जो भक्तीचा उपक्रम केला गेला त्यावरून भक्तीच्या स्वरूपाचा बोध झाला. तोच भक्तीचा बोध 'तत्त्वमसि' महावाक्याच्या पदातून सांगितला गेला आहे, असे सिद्ध करावयाचे आहे ॥११॥

**तेथ गुरुचेनि कृपें । महावाक्यही सोपें ।**
**भक्तीचेनि आटोपें । रूपासी ये ॥१२॥**

तेथे तुज सद्गुरुनाथाच्या कृपेने "तत्त्वमसि" महावाक्य हे भक्तिप्रतिपादन करणारे आहे, हे सहज कळून येते ॥१२॥

**असो हें काय बोलणें। सद्गुरुभक्तीचिया पुढें वाणें ।**
**परब्रह्महि न्यून होणें । निःसंशय ॥१३॥**

असो हे काय बोलावयाचे ? सद्गुरूच्या भक्तीपुढे परब्रह्म स्थितीचेहि वाणणे(वर्णन करणे) निःसंशय कमी प्रतीचे वाटते ॥१३॥

**तरी तो महावाक्यार्थू । सद्गुरूकृपास्फूर्ति परमार्थू ।**
**ज्ञानेश्वरनामें प्रेमार्थू । फळला ठाके ॥१४॥**

तरी तो महावाक्याचा, सद्गुरुकृपेने स्फुरलेला,

भक्तिरूप अर्थच खरा असून तोच "ज्ञानेश्वर" या नामाच्या प्रेमरूपाने अनुभवाला येतो ॥१४॥

**हे चारी वेदांचे चार । असती पैं साचार ।**
**त्यामाजीं मुख्य परिकर । तत्त्वमसि ॥१५॥**

चार वेदांची जी चार महावाक्ये आहेत, त्यात 'तत्त्वमसि' हे मुख्य आहे (१) "तत्त्वमसि"-सामवेद, (२) "अहंब्रह्मास्मि" यजुर्वेद ३) "प्रज्ञानं ब्रह्म"–ऋग्वेद, (४) "अयमात्मा ब्रह्म"–अथर्वणवेद. अशी ही चार वेदांची चार महावाक्ये आहेत ॥१५॥

**वेदानां सामवेदोऽस्मीति । स्वयें मत्कान्तोक्ती ।**
**म्हणोनी त्या वेदीचें निश्चितीं । वाक्य श्रेष्ठ ॥१६॥**

" वेदामध्ये सामवेद मी आहे" असे माझे पति भगवान् श्रीकृष्ण यांनी गीतेत सांगितले असल्यामुळे त्या सामवेदांतील "तत्त्वमसि" महावाक्य हे बाकीच्या तीन महावाक्यांपेक्षा श्रेष्ठ आहे ॥१६॥

**तेथ तत्पद विवरण । करावें हें उपपन्न ।**
**लागे म्हणोनी निरूपण । अवश्य वाटे ॥१७॥**

तेथे आधी "तत्त्वमसि" महावाक्यातील 'तत्' पदाचे विवरण करणे प्राप्त झाले; म्हणून प्रथम त्याचे निरूपण करणे अवश्य वाटते ॥१७॥

**जंव ज्ञात नाहीं पदार्थ । तंव न कळे महावाक्यार्थ ।**
**यालागीं तत्पदार्थ । निरूपिजेल ॥१८॥**

जोपर्यंत 'तत्त्वमसि' महावाक्यातील सर्व पदांचे ज्ञान होत नाही तोपर्यंत त्या महावाक्याचा अर्थ समजणे शक्य नाही; म्हणून आधी त्यातील 'तत्' पदाचे निरूपण करतो ॥१८॥

**अखंड सच्चिदानंद ब्रह्म । हा महावाक्य-विषय परम ।**
**वाच्यांशलक्ष्यांशतः उपरम । अर्थ कीजे ॥१९॥**

परब्रह्म अखंड सच्चिदानंदस्वरूप आहे. तोच महावाक्याचा प्रतिपाद्य विषय आहे. तेच 'तत्' या पदाने सांगितले असल्यामुळे तत्पदाचा वाच्यांशाने व लक्ष्यांशाने वेगवेगळा अर्थ सांगतो ॥१९॥

अखंड :– सत्, चित्, आनंद, या तीन पदांचे तीन अर्थ नसून "सत तेचि चित । चित तोचि आनंद । वस्तु नोहे त्रिविध । एकपद निजानंदे" या नाथ वचनाप्रमाणे तिन्ही पदे एकपदरूप असून त्या सर्वांचा एक परब्रह्मच अर्थ आहे.

**'तत्'पदार्थाचें द्विविध लक्षण । 'ताटस्थ्य' आणि**
**'स्वारूप्य' जाण । वाच्यांश तें तटस्थ लक्षण ।**
**स्वरूपलक्षण लक्ष्यांशू ॥२०॥**

तत्पदाने संबोधल्या जाणाऱ्या सच्चिदानंद परब्रह्माचे "तटस्थ" आणि "स्वरूप" असे दोन प्रकारचे लक्षण आहे. वाच्यांशाला 'तटस्थ' लक्षण म्हणतात आणि लक्ष्यांशाला 'स्वरूप' लक्षण म्हणतात ।।२०।।

**तटस्थलक्षणाचेनि योगें । ईश्वरा बंधन नाहीं अंगें ।**
**गौणभजनमार्गें । त्यालागीं विवरिजे ।।२१।।**

तटस्थलक्षणाच्या योगाने ईश्वर बद्ध झालेला नाही; म्हणूनच गौण भजनाच्या मार्गाने त्याच्या स्वरूपाचे विवरण केले पाहिजे ।।२१।।

**जैसे प्रधानादि रणीं झुंजतां । जय आणिती प्राप्ता ।**
**परी जयश्री तत्वतां । रायासीचि वरी ।।२२।।**

ज्याप्रमाणे राजाचे मंत्री, सेवक इत्यादि लोकच युद्ध करतात व त्यांनाच जय प्राप्त होतो; पण राजाला जय प्राप्त झाला असेच म्हटले जाते ।।२२।।

**तैसें मायेने निर्मिलें । आणि हरीवरी कर्तृत्व आलें ।**
**परी स्वयें नाहीं केलें । म्हणोनि तटस्थ ।।२३।।**

त्याप्रमाणे खरोखर कल्पनारूप मायेने हे जड–विनाशी जगत् निर्माण केले असताना अज्ञानी लोक त्याचे कर्तृत्व ईश्वराकडे देतात; पण भगवंताने स्वत: हे जग नि णि केले नसल्यामुळे भगवान साक्षीरूपाने तटस्थच राहतो ।।२३।।

**हें तटस्थलक्षण निर्गुण । तो वाच्यांश निरसोन ।**
**स्वरूपलक्षण सगुण । लक्ष्यांशें घेईजे ॥२४॥**

या तटस्थलक्षणाने जाणले जाणारे भगवंताचे स्वरूप निर्गुण असते. या तटस्थवाच्यांशाचा निरास करून लक्ष्यांशाने स्वरूपभूत सगुण परमात्मा घेतला पाहिजे ॥२४॥

**सच्चिदानंद अखंडलीला । षड्‌गुणैश्वर्य आनंत्यमाला ।**
**अभिमानरहित स्वातंत्र्याला । स्वरूपलक्षणाश्रितत्व ॥२५॥**

या सच्चिदानंद स्वरूपलक्षणात्मक सगुण लीलाविग्रहाची अखंड अवतार लीला, त्याचे अमर्याद ऐश्वर्य व अभिमानरहित स्वातंत्र्य हे सर्व त्याच्या स्वरूपलक्षणभूत सच्चिदानंदाचाच आश्रय करून राहतात. (मायेचा आश्रय करून राहत नाहीत) ॥२५॥

(श्रीमद्भागवत दशमस्कंध वेदस्तुतीतील ३८ व्या श्लोकावर टीका करताना श्रीधराचार्यांनीहि, जे जे मायाजन्य ते ते सर्व मर्यादित व अपूर्ण राहत असल्यामुळे परमेश्वराचे अमर्याद ऐश्वर्य मायाजन्य नाही, ते अपरिमित सच्चिदानंदस्वरूपाला धरून असल्यामुळेच अपरिमित आहे. असे म्हटले आहे.)

**कार्याहूनि जिचे । वेगळेपण न बोलवे वाचे ।**
**तें स्वरूप मायेचें । सदसद्विलक्षण ॥२६॥**

जिचे कार्याहून निराळे स्वरूप शब्दांनी सांगता येत नाही असे मायेचे अनिर्वचनीय-म्हणजे खोटेहि म्हणता येत नाही (कारण तिचे कार्य दिसते) व खरेहि म्हणता येत नाही (कारण तिचा विचार केला असता तिचे अस्तित्वच सिद्ध होत नाही.) असे खरेखोटयाहून विलक्षण स्वरूप-आहे ।।२६।।

**तेथ आभासे अधिष्ठान । तें ईश्वराचें तटस्थ लक्षण**
**येथ आभासवादें करून । प्रतिबिंब न घेईजे ।।२७।।**

या मायेत भासणाऱ्या अधिष्ठान चैतन्याला ईश्वर म्हणतात व हेच ईश्वराचे तटस्थलक्षण होय. येथे जो आभासवाद स्वीकारला आहे त्याचा प्रतिबिंब असा अर्थ करूं नये ।।२७।।

**सत्योपाधिसंयोगें । सत्याधिष्ठानाचेनि संगे । जे असत्**
**प्रतीती होऊं लागे । त्या नांव प्रतिबिंबता ।।२८।।**

कारण सत्य उपाधि व सत्य अधिष्ठान यांचा संबंध होऊन जो खोटा भास होतो त्याला प्रतिबिंब म्हणतात ।।२८।।

**आणि रज्जूवरी सर्पाध्यास । तो विवर्तभ्रम आभास ।**
**सर्पाभासें रज्जूनाश । कदापि नोहे ।।२९।।**

आणि दोरीवर जो सर्पाचा भ्रम होतो, तो विवर्तरूप भ्रम असून त्याला आभास म्हणतात. त्या सर्पाभासाच्या योगाने दोरी नाश पावत नाही. किंबहुना दोरीचेच लांबी वगैरे धर्म सर्पाच्या ठिकाणी दिसतात ।।२९।।

**आणि प्रतिबिंबवादें तत्त्वतां । उपाधीसि येत सत्यता ।**
**आणि उपाधि सत्य होतां । द्वैतचि नित्य ।।३०।।**

आणि तेथे प्रतिबिंबवाद मानला असता उपाधि सत्य होऊन कायमचेच द्वैत मानणे गळी येते ।।३०।।

**म्हणोनि ऐसें येथ नाहीं । हा मृगजलवत् आभास पाहीं । मृगाप्रती बंधनही । मानवां दर्शन नुसुधे ।।३१।।**

पण तसा प्रकार येथे नाही. हा मृगजलासारखा केवळ खोटा आभास आहे. मृगजलाने मृग बद्ध होतो म्हणजे त्याला खरेच पाणी आहे, असे भ्रमाने वाटते व मनुष्याला नुसत्या जलाचा भास आहे असे वाटते; म्हणून तो बद्ध होत नाही ।।३१।।

**आणि चक्रवाकांप्रती । कांहींच नसे प्रतीती ।**
**तेवीं भगवद्भक्तांप्रती । नाहींच विश्व ।।३२।।**

आणि चक्रवाकपक्षाला जलाचा भासहि होत नाही. (त्याला केवळ प्रकाशच दिसतो.) त्याप्रमाणे भगवद्भक्तांना जड-विनाशी जगताचा भासच होत नाही ।।३२।।

( अज्ञानी जनांना मृगाची उपमा दिली, कारण त्यांना मृगाप्रमाणे जड–विनाशी जगत् सत्य वाटते व ते त्यात बद्ध असतात. ज्ञानी पुरुषांना जगताचा भास राहतो म्हणून त्यांना मनुष्याची उपमा दिली आणि भगवद्भक्तांना जगताचा भासच नसतो. त्यांना सर्वत्र एक सच्चिदानंद श्रीकृष्णरूपच दिसते; म्हणून त्यांना चक्रवाकाची उपमा दिली आहे.)

**कां सत्य पतिव्रतेच्या ठायीं । वेश्यास्त्रीपणाची कल्पना नाहीं । तेवीं भगवद्भक्तां कांहीं । उमटेचिना हे ।।३३।।**

किंवा ज्याप्रमाणे खऱ्या पतिव्रतेला वेश्यापणाची कल्पनाच येत नाही, त्याप्रमाणे भगवद्भक्ताचे चित्तात जगताची कल्पनाच उठत नाही ।।३३।।

**ती यावया भगवद्भक्ती । सद्गुरुकृपाचि उपपत्ती । तन्मुखें महावाक्योपदेशप्राप्ती । भजन प्रतीती तैं लाहे ।।३४।।**

ती भगवद्भक्ति प्राप्त होण्याकरिता श्रीगुरूची कृपा हेच एक साधन आहे. श्रीगुरूच्या मुखाने ‘ तत्त्वमसि ’

महावाक्याच्या भक्तिपर अर्थाची उपदेशप्राप्ति झाली असतांच भगवंताच्या भजनाचा अनुभव येतो ॥३४॥

**द्विविध भजनाचें शीळ । मर्यादा आणि प्रेमळ ।**
**मर्यादा ते वाच्यांश केवळ । प्रेमळ तो लक्ष्यांश कीं ॥३५॥**

या भगवद्भजनाची मर्यादापूर्वक व प्रेमपूर्वक अशी दोन प्रकारची रीति आहे. मर्यादापूर्वक भजन भगवंताच्या वाच्यांशाला धरून होते व प्रेमपूर्वक भजन भगवंताच्या लक्ष्यांशाला धरून होते ॥३५॥

**ईश्वर आहे जगत्कर्ता । तोचि कर्मफळदाता ।**
**तयासी आपण न भजतां । तरी शिक्षा देईल ॥३६॥**

भगवान् जगत्कर्ता असून तोच आपल्या कर्माचे फळ देणारा आहे; म्हणून आपण त्याचे भजन केले नाही, तर तो आपल्याला शिक्षा करील ॥३६॥

**ऐसें मानोनि करणें भजन । तेथ मायारूप भय अधिष्ठान । आणि ईश्वर जरी जाहला प्रसन्न । तरी तटस्थ राहे ॥३७॥**

अशा प्रकारच्या भजनाचे, चित्तांतील अज्ञानजन्य भय कारण असते आणि या भजनाने ईश्वर प्रसन्न झाला

तरी तो तटस्थ राहून जीवाच्या कर्माप्रमाणेच फळ देतो ॥३७॥

**कां भानूचिया साह्याकारें । यज्ञयागादि कीजेती द्विजेंद्रें । परी भानू आपुलेनि आकारें । तटस्थ असे ॥३८॥**

किंवा ज्याप्रमाणे ब्राह्मण यज्ञयागादि कर्मे सूर्य-प्रकाशाच्या साहाय्याने करीत असतात पण सूर्य तटस्थच राहतो ॥३८॥

**तेविं आपुलेनि विसरें । शरीरभय वाटे दुसरें । तदर्थ जें भजन बा रे । तें मायाव्यापारें तटस्थ ॥३९॥**

त्याप्रमाणे आपल्या खऱ्या आत्मस्वरूपाचा विसर पडून व 'मी देहच आहे' असे समजून व त्या देहाला दु:ख-प्राप्ति होईल या भीतीने जे भगवंताचे भजन केले जाते, ते भजन मायेचाच व्यापार असल्यामुळे आत्मरूप भगवान तेथे तटस्थच राहतो किंवा ते भजन म्हणजे तटस्थलक्षणात्मक भगवंताचे भजन करणे होय ॥३९॥

(ओवी ३६ ते ३९ पर्यंत भगवंताच्या भजनाच्या वाच्यांशांचा पहिला प्रकार सांगितला) हे रजोगुणी भजन होय.

**ऐसा हा वाच्यांशु पहिला । आतां दुजा पाहिजे ऐकिला । जेणे मोक्षकाम चित्तीं धरिला । तदर्थें**

**भजन करी ॥४०॥**

वरील भजन हे भगवंताच्या वाच्यांश भजनाचा पहिला प्रकार होय. आता दुसरा प्रकार ऐका. मनांत मोक्षप्राप्तीची इच्छा धरून जो भगवंताचे भजन करतो ते त्याचे भजन करणे वाच्यांश भजनाचा दुसरा प्रकार होय ॥४०॥

**आधीं आपणां बंधन कल्पिले । मग मोक्षासाठीं हरीस पुजीले । तें सात्विक मायारूप जाहलें । तटस्थ भजन ॥४१॥**

आपल्या ठिकाणी संसाराची व त्याच्या आसक्तिरूप बंधनाची कल्पना करून त्यातून मुक्त होण्याकरिता भगवंताचे भजन करतो; म्हणून हे सात्विक मायारूप भजन भगवंताच्या तटस्थ लक्षणाचेच होय ॥४१॥

**ऐसें तटस्थ युक्त भजन । तें वाच्यांश मिथ्या जाण । आतां लक्ष्यांश स्वरूपलक्षण । निरुपिजेल ॥४२॥**

याप्रमाणे तटस्थलक्षणयुक्त परमेश्वराचे भजन वाच्यांशाचे होत असल्यामुळे ते मायिक व मिथ्या आहे. आत स्वरूपलक्षणात्मक लक्ष्यांश अशा सगुण भगवताच्या भजनाचे निरूपण करतो ॥४२॥

**जाणोनि आपल्या स्वरूपासी । भेद कांही न ठेवी**

**मानसीं । मग द्वैत तेचि अद्वैत विशेषीं । होऊनि राहे ।।४३।।**

आपल्या अद्वैत स्वरूपाला जाणून सर्व द्वैताचा निरास केला असता तेच भेदरूप द्वैत अद्वैत अशा आगळचा (म्हणजे अद्वैताला यत्किंचितहि विरोधी न होता ) स्वरूपानें राहते ।।४३।।

**हा त्वंपदाचा लक्ष्यांश विचार । तो पुढील प्रसंग प्रकार । प्रस्तुत सगुण साक्षात्कार । लक्ष्यांश कीजे ।।४४।।**

हा 'त्वं' पदाचा लक्ष्यांश विचार होय. त्याचे विवेचन पुढील अध्यायात केले जाईल. प्रस्तुत 'तत्' पदाचा लक्ष्यांश जो सगुण साकार परमात्मा त्याचेच निरूपण येथे करीत आहे । ४४।।

**'त्वं' पदलक्ष्यांशें आपण उमजला । तो येथ अधिकारी जाहला । जयाचा समूळ गेला । विपरीत भावो ।।४५।।**

आपल्या 'त्वं' पदाचा लक्ष्यांश जाणून ज्यांनी स्थूळ, सूक्ष्म, कारण या तिन्ही देहाचा असलेला ऐक्यभाव निःशेष सोडला, तोच या लक्ष्यांशरूप परमेश्वराच्या भजनाचा अधिकारी होतो ।।४५।।

**जेव्हा देहाभिमान गळे । तेव्हांचि कर्में आटलीं सकळें । मग सुखदु:खरूपें फळें । बांधतीचि ना ।।४६।।**

तिन्ही देहाचा अभिमान जेव्हा नाहीसा होतो, तेव्हाच कर्तृत्वाचा नि:शेष निरास होऊन संपूर्ण कर्माचा संबंध सुटतो. मग कर्मामुळे मिळणारी सुखदु:खरूप फळे बंधन करीत नाहीत.

(तिन्ही देहाचा निरास झालेल्या ज्ञान्याच्या अंत:-करणांत मी सुखी, मी दु:खी अशी भोगवृत्ति उठत नाही, असा अर्थ) ।।४६।।

**जेवि पतींगृहीं राहणे । तैं मातृगृहाभिमान त्यागणें । तरीचि ऋतुसमयीं भोगणें । कान्तसुखा ।।४७।।**

ज्याप्रमाणे पतीच्या घरी नांदावयाचे असल्यास आईबापांच्या कुलाचा अभिमान सोडून पतीच्याच कुलाचा अभिमान धरावा लागतो. तेव्हाच ऋतुकाली पतीचे सुख भोगता येते ।.४७।।

**तैसा 'तत्पद' लक्ष्यांश घेणें । तरी 'त्वंपदे' कामना सोडणें । आपणा उमजूनीं होणें । 'असि' पदीं प्रीती ऐक्य ।।४८।।**

त्याप्रमाणे 'तत्पद' लक्ष्यांश अशा सगुण परमेश्वराला अंत:करणात साठवावयाचे असल्यास 'त्वंपद' अशा जीवाने इह–पर संपूर्ण विषयांची नि:शेष वासना सोडून प्रथम

आपले 'लक्ष्यांश' स्वरूप जाणले पाहिजे व नंतर 'असि' पदाचे ठिकाणी परमेश्वराशी प्रेमाने ऐक्य पावले पाहिजे ॥४८॥

(लक्ष्यांश असे 'चित्' पद व 'आनंद' पद ही दोन्ही वृत्तिरूप म्हणून सगुण साकार असल्यामुळे तदधिष्ठानभूत 'तत्पद' लक्ष्यांशहि सगुण–साकारपणानेच अनुभवाला येतो.)

**रज्जुवरीं सर्प भासला। तरी रज्जू सर्प नाहीं जाहला। तैसा मायागुणें हरी कर्ता वाटला। परी अकर्ता तो ॥४९॥**

दोरीवर सर्प भासला तरी दोरी सर्प होऊन जात नाही. ती दोरीच राहते, त्याप्रमाणे परमेश्वर जगदुत्पत्ति–स्थिति–लयकर्ता आहे, असे मायाभ्रांतीने वाटले तरी तो खरोखर अकर्ताच आहे ॥४९।

**सापाचे पिळादिक धर्म। तें दोरीतही उपलब्ध परम। तैसे स्वातंत्र्यादिक उत्तम धर्म। स्वरूपें सत्यचि हरीपायीं ॥५०॥**

ज्याप्रमाणे दोरीवर भासणाऱ्या सर्पाचे ठिकाणी दोरीचेच पीळादि धर्म दिसतात, त्याप्रमाणे लक्ष्यांशाला धरून असणारे स्वातंत्र्यादि स्वरूपभूत उत्तम धर्म हे भगवंताचे ठिकाणी खरेच असतात ॥५०॥

**यालागीं शिक्षा देईल मातें। ऐसिया धरूनि भयातें।
राखों पाहणें शरीरातें। नीच भजनातें हा ठावो ।।५१।।**

म्हणून भगवान मला शिक्षा करील या दुःखाच्या भयाने देहाचे संरक्षण करणे. येथेच भगवंताचे वाच्यांशरूप कनिष्ठ भजन होते ।।५१।।

**आणि कर्मफळें होतु कांहीं। तयातें आश्रयोचि नाहीं।
हें जगचि भासे लवलाही। सगुणाकारें ।।५२।।**

आणि कर्माची फळे कांहीहि होवोत, त्यांना आश्रयच नाही कारण हे सर्व नामरूपात्मक जगत् सगुण सच्चिदानंद-स्वरूपच आहे, असा प्रत्यय असतो ।।५२।।

**जैसा सर्पाभास गेला। तरी रज्जू वर्तुळ नाहीं झाला।
तो पीळरूपें पसरला। जैसा तैसा ।।५३।।**

ज्याप्रमाणे दोरीवर भासणारा सर्प नाहीसा झाला तरी दोरी सर्पाभासकाली वर्तुळाकार झाली नव्हती. ती मूळच्या पीळरूपाने जशीच्या तशीच होती ।।५३।।

**तेंवि जग हें मिथ्या वाटलें। तरी हरीचें साकारपण नाही मोडिलें। तें सत्य म्हणोनि राहिलें। लीला-विग्रहें ।।५४।।**

त्याप्रमाणे हें जगत् मिथ्या झाले तरी भगवंताचे साकारपण नाहीसे होत नाही. ते प्रभूच्या ठिकाणी लीला-विग्रहरूप असल्यामुळे जसेच्या तसेच राहते ।।५४।।

(लीला विग्रह :- भक्ताशी प्रेमक्रीडा करण्याकरिता मायारहित घेतलेला विग्रह)

**मग गंगेचा बिंदू मुखीं घेतां। श्लेष्में जेवीं गंगारूपता। तेवीं एकदेशीय ही मूर्ति तत्वतां । पवित्र करी ॥५५॥**

ज्याप्रमाणे गंगेचा एक बिंदू मुखात पडला असतां श्लेष्माच्या साहाय्याने सर्वांगाला (गंगेप्रमाणे) पवित्र करतो, त्याप्रमाणे भगवंताची सगुणसाकार लीलाविग्रही मूर्ति एकदेशीय असली तरी संपूर्ण जगाचा उद्धार करते ।५५॥

**जोवरी नाही ऋतुप्राप्ती । तोंवरी कान्तभय चित्तीं । आणि एकवेळ अनुभविलिया प्रीती । मग दर्शनीं भीती नाकळे ॥५६॥**

जोपर्यंत ऋतुप्राप्ति होऊन पतिसमागम होत नाही, तोपर्यंतच त्याची भीति वाटते, मग त्याच्या प्रेमाचा अनुभव आल्यावर दर्शनाने भीति वाटत नाही ॥५६॥

**तेविं जंव नुमटे श्रीहरी-भजन । जंव स्वरूपसाक्षात्कार नव्हे गहन । तोंचि हे तटस्थलक्षण । भयदाते ॥५७॥**

त्याप्रमाणे जोपर्यंत भगवंताची भक्ति आंगी बाणत नाही व स्वरूपसाक्षात्कार व्यापक आणि दृढ होत नाही, तोपर्यंतच भगवंताचे तटस्थलक्षणाचे भजन भय उत्पन्न करणारे होते ॥५७॥

**श्रवणापासोनि आत्मनिवेदनावरी । स्वरूपसाक्षात्कार कुसरी । चढतां लीलाविग्रहाचारीं । ऐश्वर्यमंदिरी सुख ठाके ।।५८।।**

श्रवणभक्तिपासून आत्मनिवेदनभक्तिपर्यंत लीला-विग्रह अशा सगुण स्वरूपाच्या आधाराने प्रेमकौशल्याने चढत असता, भगवंताच्या षड्गुणैश्वर्य संपत्तिरूप मंदिरात निःसीम सुख प्राप्त होते ।।५८।।

**मग स्वतंत्र षड्गुणैश्वर्यसंपन्न । साकार अखंड सच्चिदानंदघन । हें तत्पदलक्ष्यांशस्वरूपलक्षण । प्रत्यया ये तत्कृपें ।।५९।।**

मग सच्चिदानंद स्वरुपलक्षणात्मक-तत्पदलक्ष्यांशभूत-मायारहित–स्वतंत्र–षड्गुणैश्वर्यसंपन्न–अखंड सच्चिदानंदघन असा सगुणसाकार परमात्मा भगवंत–कृपेनेच अनुभवाला येतो । ५९।।

**मग विषय जे जे दिसती । ते ते साकार श्रीपती । ही व्रजगोपींची प्रतीती । वाखाणिली ।।६०।।**

मग जे जे विषय दिसतील ते ते सगुण साकार श्रीकृष्ण स्वरूपानेच दिसू लागतात. अशी व्रजातील गोपींची अनुभव स्थिति होती. भक्तिसूत्रकारांनी व भागवतकारांनी तिचेच गोडवे गायिले आहेत ।।६०।।

**जेवी आपुलें धन देतां । अलंकारी सोन्याची वार्ता । सोनार पाहे त्याची अर्था । येथहि ठावो ।।६१।।**

ज्याप्रमाणे अलंकाराच्या इच्छेने सोनाराला द्रव्य देऊन आपण सोन्याचा अलंकार घडवितो; पण सोनाराचे प्रेम नुसते सोन्याकडे असते व अलंकर घडविणाऱ्याचे प्रेम अलंकाराकडे असते, तसाच प्रकार येथेहि असतो ।।६१।।

**आधीच सोन्याचें प्रियपण । वरी अलंकार सुंदर पूर्ण । दोहीं दृष्टीं पाहतां जाण । सौंदर्यचि पिकलें ।।६२।।**

आधीच सोने प्रिय असते. त्यावरहि आवडीचा अलंकार घडविला असता अलंकारामुळे ते अधिक प्रिय होते; म्हणून सोने व अलंकार या दोन्ही दृष्टीने पाहता आवडीच वाढते ।।६२।।

**तेवीं स्वरूपें स्वतंत्र श्रीहरी । वरी चतुर्भुज सगुणाकारी । दोहीं दृष्टीं निर्विकारी । लीलाचि तें ।।६३।।**

त्याप्रमाणे केवळ सच्चिदानंद अशा निर्गुण स्वरूपाने भगवान–मायास्वतंत्र असून आणखी तोच सगुण साकार अशा चतुर्भुजाने प्रगट होतो; म्हणून निर्गुण व सगुण ही दोन्ही प्रकारची भगवंताची निर्विकार मायारहित लीलाच आहे ।।६३।।

**एवं चिन्मय लीला मात्र । हें विश्वचि झालें स्वतंत्र ।**
**आतां द्वैताद्वैतवाद अणुमात्र । प्रत्यया न येती ।।६४।।**

याप्रमाणे संपूर्ण नामरूपात्मक विश्व हे केवळ भगवंताची स्वतंत्र म्हणजे मायारहित चिन्मय लीलाच आहे. ते सच्चिदानंद परमेश्वराहून भिन्न आणि जडविनाशी नाही असा अनुभव येतो. तेव्हा द्वैत अद्वैत असे वाद-किंचितहि उरत नाहीत ।।६४।।

**रज्जू सर्पाभासीं पाहतां । सर्पभय वाटे तत्वता ।**
**म्हणोनी तो निरसन करितां । सुख बहू ।।६५।।**

दोरीवर सर्प भासला असता तो सत्य वाटून त्याची भीति वाटते; म्हणून त्याची निवृत्ति झाली असता फार सुख होते ।।६५।।

**आणि सुवर्णाचे अलंकार । चित्ता वाटती मनोहर ।**
**ते मोडावे हा विचार । मूर्खही नाणी ।।६६।।**

आणि सुवर्णाचे अलंकार पाहिले असता चित्त प्रेमाने वेधले जाते; म्हणून ते अलंकार मोडून आटून टाकावे अशी मूर्ख देखील इच्छा करीत नाही ।।६६।।

**जोंवरी सुवर्ण तोंवरी पाही । अलंकारासी मिथ्यता नाहीं । कोणती तरी अवस्था ही । घडलीच राहे ।।६७।।**

म्हणून जोपर्यंत सोने आहे तोपर्यंत अलंकाराला खोटेपणा नाही आणि अलंकाराची उपेक्षा करून ते मोडले तरी देखील कोणत्या तरी आकारात सोने राहीलच ।।६७।।

**तैसा नोहे सर्पाभास । दीप आणितां मिथ्यता त्यास ।**
**तेवींचि या सिद्धांतास । अबाध्यता ।।६८।।**

दोरीवर भासणाऱ्या सर्पाची गोष्ट तशी नाही. दिवा आणून पाहिल्याबरोबर सर्प नाहीसा होऊन नुसती दोरीच अनुभविली जाते. पण सुवर्णालंकाराच्या या दृष्टान्ताप्रमाणे भगवंताच्या सगुणसाकार सच्चिदानंदघन लीलाविग्रहाचा सिद्धान्त अबाधित आहे । ६८।।

**'मी देह' हा अविद्या भुजंग । तेणें भय वाटे चांग ।**
**तो निरसणें हा राग । सहजची ।।६९।।**

सच्चिदानंद आत्मस्वरूपाला विसरून "मी देह आहे" ही झालेली विपरीत समजूतच अविद्यारूपी महासर्प असून तीच सर्व प्रकारच्या दु:खभयाचे कारण आहे; म्हणून त्या विपरीत समजूतरूप अविद्येची निवृत्ति व्हावी असे साहजिकच वाटते ।।६९।।

**परी अधिष्ठान सुवर्णी । चतुर्भुज चक्रपाणी ।**
**तो निरसावा हें मनीं । आणी तो मूर्ख ।।७०।।**

पण चतुर्भुज सगुण साकार परमात्मा, हा अधिष्ठानभूत सच्चिदानंदघन अशा परब्रह्माचा विसर न पडताच साक्षात् त्याच्यावरच त्याच्याच विवर्तरूपाने भासतो म्हणून त्याच्या निरसनाची इच्छा करणारा अज्ञानी मूर्ख होय ॥७०॥

**न मानलिया एकमूर्ती । तरी काय मोडे लीलाकीर्ती ।**
**आणि साकारत्वचि तयाप्रती । भूषणावह ॥७१॥**

एखाद्या अज्ञानी मूर्खाने भगवंताच्या लीलाविग्रही सगुणसाकार विग्रहाचा आदर केला नाही तरी त्या लीला विग्रहाची कीर्ति नाहीशी होत नाही. उलट चैतन्य व परमप्रेमरूप स्वभावामुळे भगवंताला सगुण साकार असणें हेच योग्य आणि भूषणावह आहे ॥७१॥

**केवळ मन हरणें । हें तो नव्हे सुवर्णें ।**
**तें कार्य करणें । अलंकारेंचि ॥७२॥**

प्रेमाने मनाला वेधून घेण्याचे कार्य नुसत्या सोन्याने होत नाही. ते अलंकारानेच होते ॥७२॥

**अलंकार मोडतां दृष्टी । सोन्यासी कोणी तरी आकार शेवटी । तरी मोडणियाच्या हठीं । पडावें कां ॥७३॥**

आणि अलंकार नाहीसा केला तरी सोन्याला कोणता

तरी आकार राहणारच; कारण आकारावाचून सोने पाहता येत नाही–(अनुभविता येत नाही) मग अलंकार नाहीसा करण्याचा हट्ट कां धरावा ? ॥७३॥

( श्री नाथांनी हाच अभिप्राय "म्हणे म्यां सोने पहावे दृष्टी । तरी समोर ठेविजेल खोटी । खोटीवाचून सोने दृष्टी । न पडे कदा " या ओवीने स्वात्मसुखांत दाखविला आहे )

**तैसे मनासी अस्पर्शन । नयनासी अदर्शन ।**
**तेथ जीवभाव लीन । करितांचि नये ॥७४॥**

त्याप्रमाणे ज्या निर्गुण परब्रह्माला किंवा डोळ्याने पाहता येत नाही त्या परब्रह्माचे ठिकाणी जीवभाव किंवा अहंवृत्ति मुरविता येत नाही ॥७४॥

**आणि वास्तवपणें पाहतां । प्रभूसी सत्यचि साकारता ।**
**'लययोगें' या शब्दार्था । जाणती संत ॥७५॥**

आणि भगवंताचे ठिकाणी सगुणसाकारपणा हा खरोखर अविनाशी व सत्य स्वरूपानेच आहे, ज्ञानेश्वरीतील ६ व्या अध्यायात सांगितलेल्या लययोगाने सत्पुरुष याचा प्रत्यक्ष अनुभव घेतात ॥७५॥

**मग परमाणूंचा पुंज । कां लययोगीं रूपकंज । तो हा तत्पदलक्ष्यांश निकुंज । स्वरूपें श्रीकृष्ण ॥७६॥**

मग हा लीलाविग्रही सगुण साकार परमात्मा, निर्गुण निराकार अशा परमाणूंच्या पुंजाप्रमाणे किंवा लय-योगात अनुभवाला येणाऱ्या रूपकमलाप्रमाणे तत्पद-लक्ष्यांशाच्या म्हणजे सच्चिदानंदाच्या गुंफेप्रमाणे अनुभवाला येतो ।।७६।।

**तेथ पातिव्रत्याची वार्ता । मिळवोनिया परमार्था । चरणीं वाहिली समर्था । ज्ञानेश्वरांचिया ।।७७।।**

अशा श्रीकृष्णरूप भगवद्विग्रहाचे ठिकाणी परमार्थाकरिता पतिव्रता स्त्रियेची मनोवृत्ति स्थापन करून सर्व समर्थ अशा श्रीज्ञानेश्वर महाराजांचे चरणी ती समर्पण केली ।।७७।।

**श्रीज्ञानेश्वर सद्गुरु आई । आत्मा निवेदिला तव पायीं । आतां 'त्वं' पदार्थभक्तिकथनीं देई । अवधान पुढे ।।७८।।**

हे श्री सद्गुरु ज्ञानेश्वर आई ! तुझ्या चरणावर मी आपला आत्मभाव समर्पण केला आहे. आता पुढच्या तरंगात 'त्वं' पदाचा अर्थ जी भक्ति तिचे निरूपण करविण्याकडे लक्ष दे ।।७८।।

**तुझेनि कृपें करून । जननी हा ग्रंथ हो पूर्ण । आणि शेखीं अर्पण । ज्ञानेश्वर माय तव चरणीं ।।७९।।**

हे ज्ञानेश्वर आई ! तुझ्या कृपेकरून हा ग्रंथ पूर्ण होवो व शेवटी तो तुझ्याच चरणाचे ठिकाणी समर्पण असो ।७९।।

**हरि ॐ तत्सत् इति श्रीसद्गुरुज्ञानेश्वर कृपाप्रसादे ओवीछंदबद्धे भक्तिपदतीर्थामृते तत्पदार्थलक्षणद्वय निरूपणानुरूप श्रीकृष्णसाक्षात्कारजन्य भक्त्युपदेशो नाम द्वितीयस्तरंगः ।।२।।**

।। श्री सद्गुरु ज्ञानेश्वरार्पणमस्तु ।।

॥ श्रीसद्‌गुरु सर्वत्र यशस्वी ज्ञानेश्वर महाराज की जय ॥

## अध्याय – तिसरा

# 'त्वं' पद निरूपण

**जय जय वो स्वानंदसिद्धे । स्वसुखोदारे प्रसिद्धे ।**
**माये तुझिया अविरोधें । विश्व राहे ॥१॥**

हे सद्‌गुरु जननीये ! तू ब्रह्मानंदाचा विग्रह धारण करणारी असून आपले ब्रह्मसुख दुसऱ्याला देण्यासहि अत्यंत उदार आहेस. तुझा जयजयकार असो. हे संपूर्ण विश्व तुझे ठिकाणी असून ते तुझ्या स्वरूपाशी विषमसत्ताक आहे ( म्हणजे तू कधी नाश न पावणारी अशी सत्स्वरुप असून विश्व हे, जीवाने अज्ञानाने कल्पिलेले असल्यामुळे विरोधी नाही ) ॥१॥

**जंव जव तुझें पदकमळ । हृदयीं राहती केवळ ।**
**तंव हें मायाजळ । पाहिलेंच नाही ॥२॥**

तुझे चरणकमळ जसेजसे ध्यानाने हृदयात दृढ ठसतात तसेतसे हे विश्वरुपी मायाजळ अनुभवालाच येत नाही ॥२॥

**तूं स्नेहाची खोली । निगमफळें भरिलीं ।**
**परमकृपेची साउली । आपुलिया ॥३॥**

तुझ्या प्रेमाला अंत नाही. वेदांनी सांगितलेल्या फळांनी तू भरली आहेस. म्हणजे वेदोक्त फळे तू आपल्या

सामर्थ्याने देऊ शकतेस व तू आपल्या भक्तावर अखंड कृपेची सावली करतेस ।।३।।

**वेदाचा निरसावया अभिमान । तयाचा नियम टाकिला मोडोन । आपुली अन्यथाकर्तुंशक्ति पूर्ण । उघड जनां दाविली ।।४।।**

"माझ्याद्वारा तीन वर्णासच ज्ञान प्राप्त करून घेता येईल" हा वेदाचा अभिमान नाहीसा करण्याकरिता श्रोतव्यः मन्तव्यः निदिध्यासितव्यः हा वेदाचा नियम मोडून टाकला व मला वेदश्रवण न करता ज्ञान प्राप्त करून दिलेस आणि आपली अन्यथाकर्तुंशक्ति लोकांना प्रगट करून दाखविलीस ।।४।।

**सखे, जे शीणले संसारीं । ते तुझिया नामधारीं । नाहींच या प्रत्ययाकारी । सुखावले ।।५।।**

हे सखे ! जे कोणी संसारतापाने तप्त होऊन तुला शरण आले, ते तुझ्या नामस्मरणाचा आश्रय करून संसार मुळी अस्तित्वातच नाही असा अनुभव घेऊन परम सुखाला प्राप्त झाले ।।५।।

**तरी जे कां ज्ञान । तंव कृपेचें आसन । किंबहुना तव अनुग्रहाविण । ज्ञान तें अज्ञान निश्चयें ।।६।।**

४

तरी पण हे ब्रह्मज्ञान प्राप्त होण्याला तुझी कृपाच पाहिजे किंबहुना तुझ्या कृपेवाचून प्राप्त होणारे ज्ञान हे ज्ञान नसून अज्ञानत्व होय. (गुरुकृपेवाचून ज्ञान स्थिति बाणण्याऐवजी अज्ञानजन्य नुसता ज्ञानाहंकारच आंगी बळावतो, असा अर्थ) ।।६।।

**जरी तव अनुग्रह जाहला जननी । तरी ज्ञान अज्ञानचि वाटे स्वमनीं । एवं दोन्ही दिठीं अज्ञान काहणी । मिथ्या जाहाली ।।७।।**

हे जननी ! आणि तू कृपा केली असता ज्ञान देखील अज्ञानच वाटते. म्हणून या दोन्ही दृष्टीने अज्ञानाची वार्ता मिथ्या ठरते. (अखंड, अफुट, पूर्ण सच्चिदानंदस्वरूप राहणाऱ्या जीवाची, मी बद्ध होतो आता मुक्त झालो ; पूर्वी मी अज्ञानी होतो आता ब्रह्मज्ञानी झालो ही जाणीव, अशी दोन्ही प्रकारची जीवाची अविद्या भ्रांतिच होय. हेच श्रीज्ञानेश्वर माउलींनी "जिती अविद्या ऐसी । अन्यथाबोधाते गिंवसी । तेचि यथाबोधेसी । निमाली उठी" (अमृ. प्र. ३–१०) या ओवीत सांगितले आहे.) ।।७।।

**तरी आतां ज्ञानाची चाड । उगीच कां करावी झळपड । म्हणोनि तंव भक्तीच गोड । वाटे माये ।।८।।**

९३५८८

तेव्हा अज्ञानाचा नाश करण्याकरिता ज्ञानाची खटपट व्यर्थ वाटत असून, हे आई, मला तुझी प्रेमभक्तीच गोड वाटते ॥८॥

**अंग पूर्ण ब्रह्म जाहला । आणि तव पायां विसरला । तरी त्या ब्रह्मत्वाहुनि वहिला । नरक मानिला श्रेष्ठ आम्ही ॥९॥**

स्वतः पूर्ण ब्रह्म होऊन जर तुझ्या चरणाला विसरला म्हणजे तुझ्या सगुण स्वरूपाची प्रेमभक्ति करणार नाही, तर आम्ही त्या ब्रह्मस्थितीपेक्षा निश्चयेकरून नरकच श्रेष्ठ मानतो. (व्यतिरेकब्रह्मज्ञानी स्वतः ब्रह्मरूप होऊनहि नामरूपाना मिथ्या पदार्थ मानून द्वैतच शिल्लक ठेवीत असल्यामुळे व व्यवहारकाली ब्रह्मानंद भोगू शकत नसल्यामुळे त्याची ती व्यतिरेक ब्रह्म स्थिति तुच्छच होय, असा अर्थ) ॥९॥

**जंव तुझी भक्ति घडे । तरी ब्रह्म तें पायां पडे । हें जाणोनि रोकडें । तुजचि नमिलें ॥१०॥**

जर तुझी प्रेमभक्ति केली तर ब्रह्मस्थिति पायावर लोळते, हे स्पष्ट जाणून आम्ही ज्ञानाची खटपट सोडून केवळ तुझ्या चरणांवर मस्तक ठेविले ॥१०॥

**ऐंसिया वो कृपाळे । ज्ञानेश्वर माते स्नेहाळे । तव पदसेवाप्रेमसोहळे । जन्म जन्म देईं कां ॥११॥**

हे ज्ञानेश्वर आई ! अशी तू कृपाळू व प्रेमळ आहेस, म्हणून आपल्या चरणाच्या सेवेचे सुखच जन्मोजन्मी आम्हाला दे ॥११॥

**यावीण अन्य कांहीं । सर्वथा मागणेंचि नाही । आणि प्रोत्साहन देईं । तूंही यातें ॥१२॥**

यावाचून दुसरे काही एक मी तुला मागत नाही आणि तूहि या माझ्या मागणीला अनुमोदन देऊन प्रोत्साहन दे ॥१२॥

**तुझेनि बोलें हा ग्रंथ । तव दास करो अखंडित । आणि ग्रंथकर्तृत्व हें जावोनि त्वरित । तव दास्ययुत मी होवो ॥१३॥**

हा तुझा दास तुझ्या आशीर्वादाने ग्रंथ पूर्ण करो ! आणि ग्रंथकर्तृत्वाचा अभिमान नाहीसा होऊन मी अखंड तुझ्या सेवेत रत होवो ॥१३॥

**मागें 'तत्' पदलक्ष्यांश निरूपणाआधीं । निरूपिलें या शब्दीं । कीं त्वंपद जाणें तोचि अवधीं । अधिकारी येथ ॥१४॥**

मागील अध्यायात तत्पद लक्ष्यांशाचे निरूपण करण्यापूर्वी येथे अधिकारी होण्यास 'त्वंपद' जाणणे हीच मर्यादा आहे. असे सांगितले ॥१४॥

**माते त्वंपद वाच्य-लक्ष्यें । निरूपिजेल भक्त्यपेक्षें ।**
**आणि श्रीगुरुकृपापक्षें । आश्रवूनि स्वयें ॥१५॥**

आई ! मी स्वत: तुज सद्‌गुरुच्या कृपापक्षाचा आश्रय करून भक्तीच्या अपेक्षेने त्वंपदाचे वाच्यांश आणि लक्ष्यांश कोणते याचे निरूपण करतो ॥१५॥

**कर्मफळांची कामना मनीं । आणि दृढ देहाभिमानी ।**
**या अविद्येचा आश्रय करोनी । राहे जीव ॥१६॥**

देहाचा अभिमान व कर्माने प्राप्त होणाऱ्या विषय-सुखरूप फळाची मनात दृढ इच्छा, या अविद्येचा आश्रय करूनच जीव राहत असतो ॥१६॥

**हा मलिन त्वंपद वाच्यपक्ष । आतां शुद्ध बोलिजे प्रत्यक्ष । जो आपणा इच्छी मोक्ष । संसार तोडूनी ॥१७॥**

हा त्वंपदाचा "अशुद्ध वाच्यांश" होय. आता त्वंपदाचा शुद्धवाच्यांश स्पष्ट सांगतो. संसाराचा निरास करून आपणाला मोक्ष प्राप्त व्हावा, अशी इच्छा असणे, हा त्वंपदाचा शुद्ध वाच्यांश होय ॥ १७ ॥

**तो जीव त्वंपदवाच्य सात्विक । आभासरूपें सकलंक ।**
**परी हा अनादि कटक । बद्ध आहे ।।१८।।**

या शुद्ध वाच्यांशाचा वाच्य होणारा सात्विक जीव होय. पण तो अविद्येत आभासरूप असल्यामुळे कलंकयुक्त असून कामक्रोधादि अनादि षड्विकाररूप शत्रुसैन्यांनी वेढला आहे ।। १८ ।।

**ईश्वर आभास तटस्थलक्षणें । जीव आभास आरूढ-पणें । यालागीं श्रुती ऐसी म्हणे । आभास दोन्ही ।।१९।।**

ईश्वर मायेत आभास असला तरी तो मायेहून निराळा असा तटस्थ राहतो आणि जीव अविद्येत आभास असून तो अविद्यारूढ आहे; म्हणूनच ईश्वर व जीव या दोघांनाहि श्रुतीने आभास ठरविले आहे ( ऐक्याभिमान न धरता केवळ आश्रय होणे ही तटस्थता होय. ईश्वर मायेशी आपले ऐक्य करीत नाही – म्हणजे मायेच्या स्वाधीन होत नाही; म्हणून ईश्वर तटस्थलक्षणात्मक होय.

जीव आपले अविद्येशी ऐक्य करून देहाभिमानी होतो–म्हणजे अविद्येच्या स्वाधीन होऊन राहतो. हेच जीवाचे अविद्यारूढ होणे होय) ।।१९।।

**स्वरूपें जीवहि परब्रह्म । चेतनैक्यत्वें परम ।**
**परी सामर्थ्यदृष्टया उपरम । दोघांमाजीं ।। २० ।।**

स्वरूपतः जीवहि परब्रह्मच आहे; कारण तो चेतन-स्वरूप असल्यामुळे त्याचे चेतन परब्रह्माशी पूर्ण ऐक्यच आहे; पण सामर्थ्याच्या दृष्टीने मात्र जीव व ईश्वर यांचा भद आहे. ( उपरम – म्हणजे निराळेपणा ) ।। २० ।।

**हें द्वैतचि परी अद्वैत । आणि परमार्थीं नाहीं द्वैताद्वैत । तें अकृत्रिम-भक्ति-प्रतीत । तैंचि घडे ।। २१ ।।**

खरोखर परमार्थ दृष्टीने द्वैत, अद्वैत असे कांहीच नसल्यामुळे हे द्वैतासारखे दिसत असले तरी पूर्ण अद्वैतच असल्यामुळे अकृत्रिम भक्तीची प्रतीति यानेच येत असते ।। २१ ।।

**कर्मफळकामना धरूनि भजन । तें त्वंपदाशुद्धत्वें मिथ्या जाण । आणि मोक्ष इच्छा ही पूर्ण । तेवींचि असे ।। २२ ।।**

कर्माच्या फळांच्या प्राप्तीची म्हणजे विषयसुखाच्या प्राप्तीची इच्छा धरून परमेश्वराचे भजन करणे हे त्वंपदाचे अशुद्धवाच्यांशाने भजन होत असल्यामुळे खोटे म्हणजे कपटी प्रेमभजन होय. आणि मोक्षाच्या इच्छेने भजन करणे तेहि वाच्यांशानेच होत असल्यामुळे त्याचीहि गणना त्याच सदरात होते ।। २२ ।।

**राजा आणि भिकारी स्वप्नींचा । जागेपणीं अधिकार नाहीं दोहींचा । तेवींचि विपरीतज्ञानस्वप्नींचा । बद्धमुक्त हा ॥ २३ ॥**

मनुष्य ज्याप्रमाणे स्वप्नात राजा किंवा भिकारी झाला तरी जागा झाल्यावर त्या दोन्ही अवस्थांचा त्याच्याशी यत्किंचितहि संबंध नसतो, त्याप्रमाणे बद्धपणा व मुक्तपणा हे दोन्हीहि अविद्यात्मक विपरीत ज्ञानरूप स्वप्नातीलच प्रकार आहेत ॥ २३ ॥

**एक मृगजळीं बुडाला । दुसरा पार निघोनि गेला । या दोहीं शब्दाला । याथार्थ्य नाही ॥ २४ ॥**

मृगजळाच्या पुरात एक मनुष्य बुडाला किंवा मृग-जळाच्या पुरातून दुसरा मनुष्य तरून गेला या दोन्ही म्हणण्यात जसा काही एक अर्थ नाही ॥ २४ ॥

**तेविं बद्ध आणि मुक्त । हें कांहीं नसोनि निश्चित । मृग धांवतसे तैसा प्रतीत । विपरीत ज्ञानें धांवतसे ॥ २५ ॥**

त्याप्रमाणे आत्मस्वरूपाच्या ठिकाणी खरोखर अविद्या-भ्रम कालत्रयींहि, नसल्यामुळे तो कधी बद्ध होत नाही, म्हणून मुक्तहि होत नाही. सूर्यकिरणांचे कंपन हे जलाप्रमाणे दिसते. हे न जाणणारे मृग ज्याप्रमाणे ते जल समजून

त्याकडे धांवतात, त्याप्रमाणे आपली अखंड नित्यमुक्तता विसरून जीवहि भ्रांतीने आपल्याला बद्ध-मुक्त समजतो ॥ २५ ॥

**हा सकळ त्वंपदवाच्यांश । याहोनि वेगळा लक्ष्यांश । तो बोलिजेल आतां विशेष । सद्‌गुरुकृपें ॥ २६ ॥**

हा वर सांगितलेला दोन्ही प्रकारचा त्वंपदाचा वाच्यांश होय. आता याहून निराळा असलेला जो त्वंपदाचा लक्ष्यांश तो सद्‌गुरुकृपेने सांगतो ॥ २६ ॥

**व्यतिरेकें चारी देह सांडोनी । अन्वयें ब्रह्मत्व तेथें मांडोनी । बुद्धयादि व्यापार तटस्थपणीं । साक्षी राहे ॥ २७ ॥**

स्थूल-सूक्ष्म-कारण-महाकारण या चारी देहाविषयीची सत्यबुद्धि सोडून देऊन, अन्वयाने मीच ब्रह्मस्वरूपाने सर्वत्र व्याप्त आहे असे जाणून आणि साक्षीरूप होऊन बुद्धया-दिकांचा व्यापार तटस्थपणाने जो पाहत राहतो ॥ २७ ॥

**कामनेचा खेळ सांडी । संचिताची मोडी मुंडी । पुढे वंशजात न मांडी । क्रियमाणाची ॥ २८ ॥**

ज्याने विषयकामना नि:शेष सोडून देऊन संचित-कर्माचे [मुंडकेच] तोडून टाकले आणि क्रियमाण कर्माचाहि पुढील संपूर्ण वंशच्छेदच केला ॥ २८ ॥

**प्रारब्ध भोगीं उदार । हा त्वंपद लक्ष्यांश विचार ।
परी भक्तिविणें साचार । सकळही व्यर्थ ॥ २९ ॥**

आणि जो प्रारब्ध भोगण्यास आनंदाने तयार झाला, असा जीव त्वंपदाचा लक्ष्यांश होय. इतके झाले तरी भगवंताच्या भक्तिवाचून ही स्थितिदेखील व्यर्थ आहे ॥२९॥

**मातृकुळासी संबंध तुटला । स्वामिनीपणाचा ठावो लाधला । इतुक्यानेच न मानी पतीला । तरी पतिव्रता ते नव्हे ॥ ३० ॥**

मुलीचा विवाह झाल्याबरोबर मातृकुळाशी संबंध तुटतो व ती पतिघरची स्वामिनी होते. एवढ्यानेच जर पतीची सेवा करणार नाही, तर तिला पतिव्रता म्हणता येत नाही ॥ ३० ॥

**जरी वंदील पतीचे चरण । तरीच शोभे स्वामिनीपण ।
नातरी वेश्या हे बोलण । माथांचि ये ॥ ३१ ॥**

ती स्त्री पतीच्या आज्ञेत वागून पतीची सेवा करील तरच तिचे गृहस्वामिनीपण शोभते व सुखकर होते; नाही तर लोक तिच्या कपाळी वेश्यापणाचा शिक्का मारतात ॥ ३१ ॥

**मग भलताचि चालवी सत्ता । तेणें अनेक कष्टतत्वतां ।
आणि कष्ट करूनिही मधुरार्था । बोलती न कोणी ॥३२॥**

मग अशा स्त्रीवर कोणताहि भलता पुरुष आपली सत्ता चालवू शकतो व त्यामुळे दुःखपरंपरा भोगावी लागते. आणि इतके कष्ट करूनहि कोणाचे सुखाचे शब्द देखील ऐकण्याचा प्रसंग येत नाही ।।३२।।

**तैसा ज्ञानाभिमानें फुगला । 'मी ब्रह्म' पणें चवताळला ।**
**तो सर्वस्वी मुकला । भक्तिसुखातें ।।३३।।**

त्याप्रमाणे आत्मज्ञानाने "मी ब्रह्मस्वरूपच आहे" असे जाणून व ब्रह्मत्वाच्या केवळ अभिमानाने फुगून जाऊन जर कोणी भगवंताच्या सगुण स्वरूपाला तुच्छ लेखील तर तो भक्तिसुखाला सर्वस्वी अंतरला, असे समजावे ।।३३।।

**लोहशृंखला त्यागुनी । कनकशृंखला घातली चरणीं ।**
**तरी चोर नेतील या भयें करूनी । व्याकुळ चित्त ।। ३४ ।।**

(राजाने) लोखंडाची बेडी काढून सोन्याची बेडी घातली तर आणखी चोराचे भय उत्पन्न होऊन चित्ताला अखंड काळजी लागते ।।३४।।

**सोनेंहि आपलें नाहीं झालें । पाय दुखणें तैसेचि राहिले।**
**बंधन असोनिही उगेंचि आलें । रक्षकत्व माथां ।।३५।**

पुनः सोन्याची बेडी आपल्या मालकीची होत नाही व पाय दुखणे कायमच राहते. याप्रमाणे बंधन कायम

राहूनच पुनः त्या बेडीचा संरक्षक होण्याचा प्रसंग येतो ॥ ३५ ॥

**तैसा 'अहंब्रह्मास्मि' ज्ञानें फुगला । तो अभिमानबंधीं साच राहिला । आणि व्युत्थानभयें तयाला । व्याकुळता न सोडी ॥३६॥**

त्याप्रमाणे सगुण भगवंताची भक्ति न करता "मी ब्रह्म आहे" या ज्ञानाभिमानाने फुगून राहणारा ज्ञानाहंकाराच्या खरोखर बंधनात पडतो व त्यामुळे त्याची व्युत्थानाच्या भयाने-म्हणजे देहावर येण्याच्या भीतीने होणारी चित्ताची व्याकुळता सुटत नाही ।।३६।।

**प्रारब्धाचें दुखणें । न सुटे भोगल्याविणें । ब्रह्म होऊनी जगीं विचरणें । लाजिरवाणें हें हा एक ॥३७॥**

असे व्युत्थान झाल्यावर प्रारब्धाचे भोग भोगल्या-वाचून सुटत नाहीत आणि ब्रह्मरूप होऊनहि अशा प्रकारे प्रारब्धाचे भोग भोगत जगणे, हे तर अत्यंत लाजिरवाणे होय ॥३७॥

**न भजतां व्रजराजबिडा । तो सर्वदेशीं काळतोंडा । आम्ही ऐसिया भांडा । पुढें न राहूं ॥३८॥**

म्हणून व्रजभूमीत प्रगट झालेला अखिल सौंदर्याचा पुतळा जो श्रीकृष्ण त्याचे भजन न करणारा सर्व जगात काळतोंडा समजावा. आम्ही अशा वितंडवाद्याच्या तोंडाला तोंड देऊ इच्छित नाही ।।३८।।

**ज्याच्या वेदोपदेशें वहिले । ब्रह्मज्ञानी पूर्ण झाले । शेखीं तयाचें सोडितां पाडलें । तरी ऋणदार जाहले हरीचे ।।३९।।**

ज्या भगवंताच्या वेदोपदेशाने जीव निश्चयेकरून संसारापासून मुक्त होऊन पूर्ण ब्रह्मस्वरूप होतो त्या हरीच्या चरणाची प्रेमभक्ति न करणारे ते अकृतज्ञ लोक शेवटी त्याच्या ऋणातून कधी मुक्त होत नाहीत ।।३९।।

**आणि ज्ञानाभिमानें हा एक न मानी । तरी काय हरिसत्ता होतसे उणी । परि हाचि अभिमानीं । मेला ठाकें ।।४०।।**

आणि "मी ब्रह्म झालो" या ज्ञानाभिमानाने सगुण भगवंताला हा एक तुच्छ लेखीत असला म्हणून हरीची थोरवी कांही कमी होत नाही. उलट हाच ज्ञानाहंकाराच्या तडाख्यात सापडला जातो ।।४०।।

**जेणें कामें तारिल्या गोपिका । तें सामर्थ्य तुज नये लेंका । यालागीं तो भजावा निका । नंदनंदनू ।।४१।।**

अरे लेका ! कामवासनेने जडलेल्या गोपिकांचा देखील ज्याने स्वसामर्थ्याने उध्दार केला, ते सामर्थ्य तुझ्या-ठिकाणी यणे शक्य नाही; म्हणूनच आत्मप्राप्तिनंतरहि नंदनंदन अशा श्रेष्ठ गोपालकृष्णाचे भजन केले पाहिजे ।।४१।।

**तूं जरी ब्रह्म जाहलासि आंगीं । तरी भौतिक देह न सोडी तुजलागीं । आणि हरिभक्ति करितां देहसंगी । ब्रह्मरूप होशील ।।४२।।**

बाबा तू स्वतः जरी आत्मज्ञानाने ब्रह्मस्वरूप झाल्यास तरी तुझा देह मात्र पांचभौतिकच राहील–तो बदलणार नाही–पण जर हरिभक्ति करशील तर त्या देहासह तू ब्रह्मस्वरूप होऊन जाशील ।।४२।।

**हरि असोनि ब्रह्म पूर्ण । ब्रह्मचि तनु ये घेऊन । तूं अन्वयव्यतिरेकें ब्रह्म होऊन । भौतिक तनु कैसी राहे ।।४३।।**

श्रीहरीचा देह पूर्ण ब्रह्मस्वरूप आहे म्हणून तूहि शरीरासह ब्रह्मरूप झाला पाहिजे. तेव्हाच तू हरिस्वरूप झालास असे म्हणता येईल. बरें तुझ्या म्हणण्याप्रमाणे जर अन्वय आणि व्यतिरेक हे दोन्ही करून तू ब्रह्मस्वरूप झाला आहेस तर मग तुझी तनु पांचभौतिक कशी राहिली ?

"मृद्रूपो हि यथा कुंभो तद्वद्देहोऽपिचिन्मयः ।
आत्मानात्म विभागोऽयं मुधैव क्रियते बुधैः" ॥६९॥

अपरोक्षानुभूति.

ज्याप्रमाणे पूर्ण घट मातीस्वरूप असतो, त्याप्रमाणे देहहि चिन्मय आहे, असा अन्वयाने अनुभव येतो. या आचार्य वचनाचा आधार घेऊन महाराजांनी ही ओवी दिली आहे.)

**तरी बापा । ऐसे न करी । ब्रह्मज्ञानशोभा निर्धारी । त्वंपदलक्ष्यांश जाणोनि हरी । तत्पदलक्ष्य भजावा ॥४४॥**

म्हणून, बापा ! असे करू नकोस. आपला त्वंपद-लक्ष्यांश जाणून त्या त्वंपदलक्ष्यांचे तत्पदलक्ष्यांश अशा भगवंताची भक्ति करणे ही प्राप्त झालेल्या ब्रह्मज्ञानाची भक्ति केली असताच ब्रह्मज्ञान शोभून दिसते ॥४४॥

**व्यतिरेकें टाकोनि देहाभिमान । अन्वयें साधावें दासपणा । हे स्वरूप भजनाची खूण । सद्‌गुरुकृपें ओळखावी ॥४५॥**

व्यतिरेकाने आपल्याला देहादिकाहून निराळे जाणन घेऊन देहाचा अभिमान सोडून द्यावा व सर्व नामरूपाने एक भगवानच नटला आहे, या अन्वयाने भगवंताची सेवा करावी. हे स्वरूप भजनाचे रहस्य असून सद्‌गुरुकृपेनेच ते समजू शकते ॥४५॥

**तो सद्गुरुकृपेचा विचार । 'असिपद' विवरण प्रकार ।**
**पुढिलिये प्रसंगीं सविस्तर । निरूपिजेल ।।४६।।**

महावाक्यातील 'असि' पदाचा विवरण प्रकार म्हणजे हा सद्गुरुकृपेचा विचार असल्यामुळे पुढल्या प्रकरणात तो विशेष रीतीने विस्तारपूर्वक सांगण्यात येईल ।।४६।।

**तेथ फिटेल सकळ भ्रांती प्रकाशेल शुद्ध भक्ति । वेश्येसारखी लाजोनि मुक्ती । उभी राहील तटस्थ ।।४७।।**

मग त्या 'असि' पद विवरणाने संपूर्ण संशयाचे निराकरण होऊन अंत:करणात सगुण श्रीहरीची प्रेमभक्ति प्रगट होईल व मुक्ति वेश्येप्रमाणे लाजून तटस्थ उभी राहील–म्हणजे ब्रह्मज्ञानाने झालेली मुक्ति आपला यत्किंचितहि मोठेपणा मिरविताना दिसणार नाही ।।४७।।

**तें सुख मिळावया समग्र । आधीं वंदावें ज्ञानेश्वर । सांडोनि सकळ अहंकार । शरण साचार रिघावें ।।४८।।**

ते भक्तीचे सुख प्राप्त होण्याकरिता सर्व देहादि अहंकार सोडून देऊन श्रीज्ञानेश्वर माउलीला शरण जावे व तिच्या चरणकमलाचे ठिकाणी दीन होऊन अत्यंत नम्रभावाने तिला नमन करावे ।।४८।।

**शरणागता अभयदात्री । ज्ञानेश्वर आई जगद्धात्री । तियेचिया अंगुष्ठपात्रीं । आत्मनिवेदन तंत्रीं राहूं ॥४९॥**

श्रीज्ञानेश्वरमाउली ही सर्व जगाची आई असल्यामुळे तिला शरण गेल्याबरोबर ती शरणागताला अभय देते, म्हणून तिच्या चरणांगुष्ठाचे ठिकाणीच आत्मनिवेदन करून –म्हणजे अहंताममता समर्पण करून–राहू ॥४९॥

**हरि: ॐ तत्सदिति श्रीमत्सद्गुरु श्रीज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे भक्तिपदतीर्थामृते 'त्वं' पद निरूपणपूर्वक ज्ञानगर्वनिषेधसहित हरिभक्त्युपदेशो नाम तृतीयस्तरंग: ॥३॥**

॥ श्रीसद्गुरु ज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वत्वपत्र
अनुक्रम ...... वि: ......
...... ......

॥ श्रीसद्‌गुरु सर्वत्र यशस्वी ज्ञानेश्वर माऊली समर्थ ॥

## अध्याय – चवथा

# 'आखि' पद निरुपण

**जय जय वो मायबहिणी । साष्टांग प्रणाम तव चरणीं । ज्ञानेश्वर आई कृपारूपिणी । सद्‌गुरुमाये ॥१॥**

हे सद्‌गुरु मायबहिणी ! हे कृपारूपिणी ज्ञानेश्वर आई ! तुझाच अखंड जयजयकार असून तुला माझा नमस्कार असो ॥१॥

**सखे तव कृपेची नवाई । हें ब्रह्म पडे ठायीं ।**
**आपुलें परावें कांहीं । नेणवेजे ते ॥२॥**

सखे ! तुझ्या कृपेने आपल्याच ठिकाणी परब्रह्माचा "मीच ब्रह्म आहे" असा अनुभव येतो व मग 'माझा आणि परका' अशा भावाची जाणीवच उरत नाही, असे तुझ्या कृपेचे नवल सामर्थ्य आहे ॥२॥

**पूर्ण प्रेमाचें सुख । तुझे कृपें निष्कलंक ।**
**मिळे हाचि एक । शुद्ध भाव ॥३॥**

तुझ्या कृपेने एका पूर्ण प्रेमाचेच शुद्ध सुख मिळते, असाच माझ्या अंतःकरणात शुद्ध भाव आहे ॥३॥

**म्हणोनि सखे आई । तुजविण कांहीं ।**
**न लगे हें ठायीं । ठेलेंचि आहे ॥४॥**

म्हणून सखे आई ! तुझ्यावाचून मला कांही एक नको, हाच अंत:करणाचा निश्चय करून बसलो आहे ।।४।।

**कां नवयौवनसुंदरींतूनी । आपुली जे जननी ।**
**ती काढी निवडुनी । तरीच बाळ ।।५।।**

ज्याप्रमाणे अनेक नवयौवन सुंदर स्त्रियातून आपल्या आईला ओळखेल तरच तो तिचा मुलगा होय ।।५।।

**तैसें धुंडतां त्रिभुवन । हेंचि लाधलें पूर्ण ।**
**श्रीज्ञानेश्वरजननी चरण । स्तनपान तेची ।।६।।**

त्याप्रमाणे सर्व त्रैलोक्यात फिरत असता मला श्रीज्ञानेश्वर आईचे चरण प्राप्त झालेत व तेच माझे स्तनपान होय ।।६।।

**तेथील पय पिऊनि गाढें । आणि तियेचेचि केलेनि कोडें । हें 'असि' पद फुडें । विवरिजेल ।।७।।**

त्या स्तनातील सामर्थ्य देणारे दुग्ध पिऊन तिने केलेल्या कोंडकौतुकाच्या साहाय्याने आता पुढे "असि" पदाचे विवरण करीत आहे ।।७।।

**'तत्त्वं' पदांचें ऐक्यकरण । या नांव 'असि' पद विवरण । आणि हेंचि ऐक्यभजन । सार सकळांचें ।।८।।**

'तत्' आणि 'त्वं' या दोन्ही पदांचे ऐक्य करणे यालाच 'असि' पदाचे विवरण म्हणतात आणि हेच ऐक्यभजन असून सर्व भजनांचे सारभूत भजन आहे ।।८।।

**तरी भजन त्रिविध असे । तें दृष्टान्तें सांगिजे आपैसे । तरी दृष्टान्त विवरण दिसे । करणें आधीं ।।९।।**

भगवंताचे हे भजन तीन प्रकारचे आहे. ओघानेच ते दृष्टांत देऊन सांगणे प्राप्त होते; म्हणून आधी दृष्टान्ताचे स्पष्टीकरण केले पाहिजे ।।९।।

**अहो कुमारवयापासुनी । कपाळीं कुंकू लावी कामिनी । तैसें तत्पदवाच्यांश स्मरणीं । अलंकार भजन ।।१०।।**

ज्याप्रमाणे स्त्री लहानपणापासूनच–म्हणजे पतीची कांही एक माहिती नसते तेव्हापासूनच–पतीच्या नांवाने कपाळाला कुंकू लावित असते. त्याप्रमाणे तत्पदवाच्यांश जो ईश्वर त्याच्या विशेष स्वरूपाचे ज्ञान नसतानाहि जगदुत्पत्तिस्थितिलयकर्ता परमात्मा आहे, येवढेच सामान्यतः समजन त्याचे नामस्मरण करणे, हे अलंकार भजन होय ।।१०।।

**आणि उपवर जैं होये । तैं लग्ननाम निघे स्वयें । पतिनाम ग्रहण होये । तेचि वेळीं ।।११।।**

**त्यानामें करूनि जाण । पतीसी ओळखे आपण ।**
**आतां दार्ष्टान्ता निरूपण । ऐसेचि कीजे ॥१२॥**

आणि नंतर मुलगी विवाह योग्य झाल्यावर विवाहाचे वेळी जेव्हा पतीचे नांव प्रगट होते, तेव्हाच तिला पतीची व पतीच्या नामाची ओळख होते. या दृष्टान्तावरून सिद्धान्ताचे निरूपण करू ॥११॥ ॥१२॥

**प्रेमळ पाहूनि सद्‌गुरुनाथ । द्वादशाक्षरी उपदेश करीत । तो जपतांचि अंतरस्थ । प्रकटे श्रीहरी ॥१३॥**

शिष्य प्रेमळ आहे, असे पाहून सद्‌गुरुनाथ त्याला द्वादशाक्षरी नामाचा उपदेश करतात व प्रेमळ अंत:करणाने शिष्य जेव्हा त्या मंत्राचा जप करू लागतो, तेव्हा त्या मंत्राचा वाच्य परमात्मा श्रीहरि अंत:करणात प्रगट होतो ॥१३॥

**येथवरी अलंकार भजन । आतां ऐका स्वरूप भजन ।**
**जेंवि झालियावरी लग्न ।**
**श्वशुराज्ञें करावी पतिसेवा ॥१४॥**

येथपर्यंत अलंकार भजनाचे स्वरूप आहे. आता स्वरूपभजन सांगतो. ऐका ज्याप्रमाणे लग्न झाल्यावर सासू-सासऱ्याच्या आज्ञेने ती पतीची सेवा करते ॥१४॥

**तैसें ध्यानीं भरता हरी । संतआज्ञें परम कुसरीं ।
सेवावा श्रीहरी । जगद्व्यापक ॥१५॥**

त्याप्रमाणे अंतःकरणात ध्यानाने हरि भरला असतानाच "परमात्माच एक सर्व जगद्रूप झाला आहे" या संताच्या आज्ञेचे परम रहस्य जाणून परमेश्वराचे भजन करावे ॥१५॥

**आणि जेव्हा होय ऋतुप्राप्ती । तेव्हां पहुडणें मंचकावरती । तैसा भावें सेवितां श्रीपती । सगुणाकृती पुढें ठाके ॥१६॥**

आणि ज्याप्रमाणे ऋतुप्राप्ति झाली असता पतीसह मंचकावर ती शयन करते त्याप्रमाणे सर्वत्र भगवद्भावनेने भगवंताची सेवा केली असता तो ( परमात्मा ) प्रत्यक्ष सगुण–साकार होऊन डोळ्यासमोर उभा राहतो ॥१६॥

**येथवरी स्वरूपभजन । आतां ऐकिजे ऐक्यभजन ।
हेंचि 'असि' पद विवरण । निरूपिजेल ॥१७॥**

येथपर्यंत स्वरूपभजनाची मर्यादा आहे. आता ऐक्य भजन सांगतो, ते ऐका. यालाच 'असि' पद विवरण म्हणतात

**कामें व्यापितां स्त्रीपुरुष । जेविं मीनती सुरतसुखास ।
तेविं अंतर्बाह्य श्रीहरीस । पाहणें घडे ॥१८॥**

ज्याप्रमाणे स्त्री–पुरुष कामासक्त झाले असता

सुरतक्रीडेस प्रवृत्त होतात, त्याप्रमाणे आंत–बाहेर एक सगुण–साकार भगवान श्रीहरीच अनुभविला जातो ।।१८।।

**दोहीं मधील एक काम । तैसा दोहीं मधील एक प्रेम ।**
**हें 'असि' पद परम । विवरण असे ।।१९।।**

सुरत–सुखात स्त्री व पुरुष या दोघात जशी एक भोगवासनाच अंतर्बाह्य व्यापून असते, त्याप्रमाणे भक्त व भगवान श्रीहरि या दोघात एक निष्काम प्रेमच राहते. हेच 'असि' पदाचे परम गुह्य विवरण आहे ।।१९:।

**तत्पदवाच्यांश तटस्थ श्रीपती । त्वंपदवाच्यांश कृत्रिम प्रीती । तत्पदलक्ष्यांश स्वरूपलक्षण मत्पती । आणि शुद्ध प्रीति त्वंपदलक्ष्यांश ।।२०।।**

'तत्' पदाचा वाच्यांश परमात्मा तटस्थ म्हणजे साक्षीभूत निर्गुण राहतो. 'त्वं' पदाचा वाच्यांश असलेल्या जीवाचे कामनिक प्रेम कृत्रिम–म्हणजे मायिक असते. माझा पति जो भगवान श्रीकृष्ण तो 'तत्' पदाचा लक्ष्यांश असून सच्चिदानंद स्वरूपलक्षणात्मक आहे, अशा 'तत्' पद लक्ष्यांश-सच्चिदानंदस्वरूपलक्षणात्मक भगवंताचे ठिकाणी असलेले जीवाचे निष्काम परम प्रेम हा 'त्वं' पदाचा लक्ष्यांश होय.

**या दोहींचें ऐक्यकरण । ते अकृत्रिम भक्तिलक्षण ।**
**सर्वांभूतीं सुंदर सगुण । सांवळे दिसे ।।२१।।**

विषयकामना निःशेष टाकून देऊन दोन्ही प्रकारच्या प्रेमाचे ऐक्य करून 'तत्' पदलक्ष्यांश असलेल्या भगवंताचे भजन करणे हे अकृत्रिम भक्तीचे लक्षण आहे. या भक्तीने मग सर्व भूते, सगुण–साकार–श्रीकृष्णस्वरूपानेच अनुभवाला येतात ॥२१॥

**अलंकारार्थ सोन्याची आवडी । तेंवि भक्तिसाठींच ब्रह्मगोडी । भक्तिनेच तुटे बेडी । पशुत्वाची ॥२२॥**

ज्याप्रमाणे अलंकाराकरिताच सोन्याचे प्रेम केले जाते त्याप्रमाणे भक्तिसुखाकरिताच परब्रह्माचे प्रेम असते भक्तीनेच विपरीत ज्ञानरूप व ब्रह्माभिमान ज्ञानरूप अशा (दोन पायांत असलेल्या) दोन शृंखला तुटल्या जातात. ("पाशैर्विवध्यते स पशुः" :– याप्रमाणे कालाग्निरूद्रोपनिषदांत आणि माधवकृत सूतसंहितातात्पर्यदीपिकेत सांगितल्यावरून अविद्या, काम, कर्म–पाशांनी बांधलेला तो पशु–जीव म्हणावा. ते जीवत्व आरूढ लक्षणी आहे म्हणून पशुत्व–त्याची बेडी–म्हणजे विपरीत ज्ञानरूप व ब्रह्माभिमान ज्ञानरूप अशा दोन्ही पायात असलेल्या दोन बेड्या) ॥२२॥

**सत्पदे जड जग भासे । चित्पदें जीव विलसे । आनंदपदें प्रत्यय असे । श्रीहरीचा ॥२३॥**

परब्रह्माच्या सदंशावरच अज्ञानभ्रांतीने जड–विनाशी अशा जगताचा भास होतो. चिदंशावर जीवत्वाचा प्रत्यय येतो आणि आनंदांशावर सगुण श्रीहरीचा प्रत्यय येतो । २३॥

**हें ऐक्य–भजन परी औपचारिक । याहूनि वेगळे पारमार्थिक । काम भोगतां न भोगतां देख । पति सेवा करणें हा पतिव्रता धर्मू ॥२४॥**

असे ऐक्य जाणुन केलेले भजन थोडे वरकरणीच होय खरे पारमार्थिक भजन याहून वेगळे आहे. ज्याप्रमाणे पतिव्रता स्त्री पतीपासून कामसुख प्राप्त होवो किंवा न होवो पतिसेवा करणे हा आपला धर्म आहे असे ती समजते

**तेविं हो न हो आनंद प्राप्ती । परी हरिपदी सहज प्रीती । ते पारमार्थिक भक्ती । अकृत्रिम ॥२५॥**

त्याप्रमाणे आनंदाची प्राप्तिं होवो किंवा न होवो, तरी सगुण परमेश्वराचे ठिकाणी सहज स्वाभाविक प्रेम असणे, याला खरी सहजभक्ति म्हणतात ॥२५॥

**पांढरें परिमळयुक्त नम्र । हे तिन्ही मिळूनि कापूर । तेविं सच्चिदानंद साचार । तिन्हीही एक ॥२६॥**

पांढरेपणा, सुवासिकता व नरमपणा हे तिन्ही मिळून जसा कापूर असतो, त्याप्रमाणे सत्–चित्–आनंद हे तिन्ही

मिळून एकरूप परमात्मा आहे ।।२६।।

**सत्पदें असे । चित्पदें भासे ।**
**आनंदपदें विलसें । एकत्वपणें ।।२७।।**

सत्पद हे त्याचे अस्तित्व असून चित्पद हा त्याचा अनुभव होय आणि आनंदपद हे त्याचे तिन्ही मिळून एकरूप झालेले सगुण स्वरूप होय ।।२७।।

**परी हें बोलणें काय । सच्चिदानंद हा ठाय ।**
**अस्ति, भाति, प्रियत्व होय । सहजचि जें ।।२८।।**

पण हे बोलणेहि योग्य नाही. ही स्वरूपस्थितिच आहे आणि ते स्वरूप सहज अस्ति–भाति–प्रियस्वरूप आहे

**जीभ आणि साखर । त्यांत रस एकचि मधुर ।**
**तेविं सेव्य सेवक द्वैताकार ।**
**परी प्रेम साचार एकरूप ।।२९।।**

ज्याप्रमाणे साखर आणि तिची गोडी चाखणारी जीभ या दोहोत गोडी ही एकच असते, त्याप्रमाणे भगवान् सेव्य व भक्त सेवक असा भेदासारखा प्रकार असला तरी त्या दोघात प्रेम मात्र एकच असते ।।२९।।

**सेव्य श्रीहरी तत्पदलक्ष्य । सेवकान्वयी जीव**
**त्वंपदलक्ष्य । दोहींचे ऐक्य जो प्रेमपक्ष ।**
**'असि' पद तें ।।३०।।**

सेव्य असलेला सगुण साकार श्रीहरि हा तत्पदलक्ष्य असतो आणि त्याची सेवा करणारा जीव हा 'त्वं' पदलक्ष्य असतो आणि ज्या प्रेमामुळे दोघांचे ऐक्य होते ते प्रेमच 'असि' पद होय । ३०॥

**सत्ता तेचि चैतन्य जाण । कीं चैतन्य तो आनंद पूर्ण।**
**एवं सच्चिदानंद मिळोन । एकचि वस्तू ॥३१॥**

सत्ता चैतन्याहून निराळी नाही, चैतन्यरूपच आहे आणि चैतन्य आनंदाहून निराळे नाही, आनंदरूपच आहे; म्हणून तिन्ही मिळून एक सच्चिदानंद घन वस्तुच आहे

**वृत्ति उठे तें सत्पद । वृत्ति मुरे तें चित्पद ।**
**अखंड हरि प्रीति तो आनंद । सच्चिदानंद स्वयंरूप ॥३२॥**

वृत्तीचे निराळेपण जेथे भासते त्याला 'सत्' पद म्हणतात. वृत्तीचे निराळेपण जेथे भासत नाही त्याला 'चित्' पद म्हणतात आणि अखंड हरिप्रेम तोच आनंद होय. असा हा हरि स्वयं सच्चिदानंदस्वरूप आहे ॥३२॥

**जेंवि पिता उत्तम शिकवी । तेंवि शिक्षार्थ हरि दुःख**
**दाखवी । येऱ्हवी हें ठेवी । स्वानंदाची ॥३३॥**

ज्याप्रमाणे मारणे हे उत्तम शिकविण्याकरिता म्हणजे बऱ्याकरिताच असते, त्याप्रमाणे सन्मार्गाला लावण्याकरिताच भगवान दुःख देतो. वास्तविक विचार करून पाहता हे दुःख स्वानंदाकरिताच आहे असे भक्त समजतात ॥३३॥

**केवळ 'अहंब्रह्मास्मि' म्हणता । व्युत्थान न चुके सर्वथा । तैसें नाहीं हरिभक्तां ।**
**म्हणोनि या पथा अनुसरावें ॥३४॥**

भक्ति न करता "अहं ब्रह्मास्मि' असेच केवळ चिंतन करीत राहिल्यास व्युत्थान म्हणजे प्रारब्धामुळे देहावर येणे हे चुकत नाही. तसे श्रीहरीच्या भक्ताचे व्युत्थान होत नाही; म्हणून सर्वांनी भक्तिमार्गानेच जावे, हे उत्तम ॥३४॥

**अहो 'सत्' पद तें नामस्मरण । 'चित्' पद तें रूप सगुण । एक प्रीतीसुख गहन । आनंद तोचि ॥३५॥**

अहो भगवन्नामस्मरण करणे हे भगवंताच्या संदेशाचे ग्रहण करणे होय. भगवंताच्या सगुण रूपाचा अनुभव हा चिदंशाचा अनुभव होय आणि भगवंताच्या अविरत निस्सीम प्रेमाचे सुख तोच ब्रह्मानंद होय ॥३५॥

**'त्याचा तूं आहेसी' हा मलिन गुण । 'तें ब्रह्म तूं आहेसी' हा सत्व गुण । 'हे हरी! तें सर्व तूंचि' हें स्तवन । शुद्धलक्ष्यांश महावाक्याचा ॥३६॥**

"त्याचा तू आहेस" हा भेदमूलक सेव्य–सेवक संबंध रजोगुणी असून 'ते ब्रह्म तू आहेस' हा ऐक्यसंबंध सत्वगुणी आहे आणि 'हे भगवता ! एक तूच सर्व आहेस' असे भगवताचे स्तवन हाच 'तत्त्वमसि' महावाक्याचा अहंकार-रहित शुद्ध लक्ष्यांश आहे ।।३६।।

**'तस्य त्वमसि' हें विपरीत ज्ञान । 'तदेव त्वमसि' हा ज्ञानाभिमान । 'तत्त्वमसि' रूप सगुण ।**
**हें ऐक्यभजन प्रेमरूप ।।३७।।**

'त्याचा तू आहेस' हे विपरीत ज्ञान होय. 'तेच तू आहेस' हा ज्ञानाहंकार होय आणि 'तत्त्वमसि' म्हणजे सर्व सगुणरूपाने एक परमात्माच आहे, हेच जाणीवरहित प्रेमरूप ऐक्यभजन होय ।।३७।।

**उपाधी उपाधेय कांहीं । सांडावया वेगळे नाहीं । म्हणोनि निर्गुणता नाहीं । सगुणचि हें ।।३८।।**

परमात्मसत्ता अमर्याद व्यापक असल्यामुळे नाम-रूपात्मक उपाधीचा व परमेश्वराचा संबंध सुटत नाही; म्हणून परमात्मा केवळ नामरूपरहित निर्गुण नसून सगुणच आहे. ( नामरूपरहित निर्गुण परमेश्वराला केवळ अनुमानानेच ग्रहण करावे लागते ) ।।३८।।

**तें मी म्हणतां अवघे सगुण । तरी येईल विराटा-**

**भिमान । यालागीं श्रीहरीसी अर्पून ।**
**द्यावें दासपण आपणाकडे ।।३९।।**

'ते सर्व नामरूपात्मक ब्रह्मच मी आहे' असे मानल्यास विराटाभिमान उत्पन्न होईल ; म्हणून सर्व नामरूपे परमेश्वराला अर्पण करून–म्हणजे सर्व नामरूपात्मक एक परमात्माच आहे असे समजून – आपण केवळ सेवकपण घेऊन राहावे ।।३९।।

**आपण आपुलें काम करितां । जेंवि संकोच न ये गृहिणी चित्ता । आणि पतिप्रार्थने जातां ।**
**लीन होय ।।४०।।**

ज्याप्रमाणे स्त्रियेला आपले घरांतील कोणतेहि काम करताना संकोच वाटत नाही व पतीपुढे भोगप्रार्थना करताना ती अत्यंत लीन होते ।।४०।।

**तैसा दास्यपणीं न लाजे । प्रभुपूजनीं अनुरजे ।**
**येरा सकळां विरजे । ज्ञानादिकां ।।४१।।**

त्याप्रमाणे ज्याला परमेश्वराचा सेवक होण्यात यत्किंचितहि संकोच वाटत नाही; उलट भगवंताचे पूजन करण्यात आनंद वाटतो आणि या व्यतिरिक्त आत्मज्ञानादिकापासून जो उपराम पावतो ।।४१।।

**मग तयाचिया दृष्टीं । अज्ञानाची नाहीं गाठी ।**
**तेथ ज्ञानाची उठाउठी । कां करावी ॥४२॥**

मग त्याच्या दृष्टीने अज्ञानग्रंथीच उरत नाही. तशा अवस्थेत त्याने आत्मज्ञानाची खटपट कशाला करायला पाहिजे ॥४२॥

**दिवसा लावितां दिवा । तरी शीणमात्र व्हावा ।**
**एरव्हीं कार्य ठेवा । कांहींच नोहे ॥४३॥**

ज्याप्रमाणे सूर्यप्रकाश असताना दिवा लावला असता त्याचा काहीच उपयोग होत नसल्यामुळे व्यर्थ श्रम होतात.

**तैसा हा संकेत पूर्ण । येथ जें अहंब्रह्मपण ।**
**तो उगाचि असे शीण । अकार्यरूप ॥४४॥**

त्याप्रमाणे ही अद्वैत ब्रह्मस्थिति मूळचीच परिपूर्ण आहे. ती कधीच भंगली नाही. अशा स्थितीत "मी ब्रह्म आहे" या जाणिवेचा काही उपयोगच नसल्यामुळे ती वागविणे, हा व्यर्थ शीण आहे ॥४४॥

**तरी ऐसें न करावें । दिवसां डोळां सूर्येंचि पाहावें ।**
**तैसें सकळहि अर्पूनि भजावें । पूर्ण हरीतें ॥४५॥**

म्हणून असे काही करू नये. जसे दिवसा सूर्यप्रकाशानेच पाहावे, हे योग्य; तसेच तन-मन-धन इत्यादि सर्व पूर्ण अशा भगवंताला अर्पण करून त्याचे भजन करावे,

हेच उत्तम ॥४५॥

**ज्ञानें हरवावें विपरीत ज्ञान । भक्तीनें सांडावे ज्ञानोत्थान । मग जें प्रारब्ध दुःखरूप जाण । लागतां हरिचरण सुखरूप ॥४६॥**

आत्मज्ञानाने अज्ञानजन्य विपरीत ज्ञान नाहीसे करावे आणि भगवद्भक्तीने ज्ञानानंतर होणारे व्युत्थान नाहीसे करावे. असे केले असता दुःखरूप प्रारब्ध देखील भगवद्भजनाने सुखरूप होते ॥४६॥

**जें जें विश्वीं असे कांहीं । तें तें अवघे शेषशायी । तयाचे सुखग्राही । व्रजराज तो ॥४७॥**

जेवढे काही विश्वात आहे ते ते सर्व भगवान श्रीहरिच असून त्या सर्वांच्या सुखाचा साक्षी तो श्रीकृष्ण परमात्माच आहे ॥४७॥

**अमृताचां बिंदु घेतां । सिंधु सामर्थ्य चढे हाता । आणि सिंधुमांजीं बुडोनि जातां । घाबरतां बिंदुही घेववेना ॥४८॥**

ज्याप्रमाणे एक थेंबभर अमृत मिळाले तरी अमृताच्या सागराचे अमर करण्याचे संपूर्ण सामर्थ्य आपल्या हाती येते —म्हणजे आपण अमर होतो; पण अमृताच्या सागरात बुडाल्यास घाबरून गेल्यान एक बिंदूहि मुखात जात नाही

व आपण अमर होत नाही ॥४८॥

**तेंवि भजतां कृष्णरूपडें । सच्चिदानंदत्व हातां चढे ।**
**आणि सच्चिदानंद बोलतां कोरडे ।**
**दोन्ही न मिळे ॥४९॥**

त्याप्रमाणे सगुण साकार श्रीकृष्ण विग्रहाचे भजन केले असता पुरुष पूर्ण निर्विकल्प सच्चिदानंदस्वरूप होतो; पण "मी सच्चिदानंद ब्रह्म आहे" असे कोरडे शब्द घोकल्याने सगुण स्वरूपाची प्राप्ति तर होत नाहीच पण निर्गुण स्वरूपाची प्राप्तिहि होत नाही ( ब्रह्मस्थितिऐवजी नुसता अहंकारच हाती येतो, असा अर्थ ) ॥४९॥

**एवं हे सकळ । जाणोनि भजे घननीळ ।**
**तोचि गा प्रेमळ । पूर्ण भक्त ॥५०॥**

हे सर्व जाणून जो सगुण साकार भगवान श्रीहरीचे भजन करतो तो प्रेमळ भक्तच पूर्ण होय ॥५०॥

**मग मर्यादा करी पालन । तरी तो प्रेमचि जाण ।**
**एवं पदद्वय वाच्य-लक्ष्य मिळोन ।**
**भक्तीचि उरे ॥५१॥**

मग मर्यादेने म्हणजे शास्त्ररूप भगवदाज्ञेचे पालन करून तो भगवंताचे भजन करीत असला तरी तेहि

भगवत्प्रेमच होय. याप्रमाणे वाच्यांश व लक्ष्यांश या दोन्ही प्रकाराने भजन करीत असताना त्यांत एक भगवत्प्रेमच ओतप्रोत भरलेले असते ।।५१।।

**त्या भक्तिसुखाची नवाई । सकळ रसांची आई ।**
**करुणा दाखवी ठायीं । शान्ति गुणें ।।५२।।**

या भक्तिसुखाचे असे नवल आहे की, ही भक्ति सर्व रसांची जननी असून–म्हणजे या भक्तीत सर्व रसांची प्राप्ति होत असून–ही भगवद्भक्ति चित्ताला निर्वासिन करून ( शांतरसाचा स्थायिभाव जे वैराग्य त्याने वासनारहित करून ) करुणासंपन्न करते ।।५२।।

आता या भक्तीने सर्व रसांचा अनुभव कसा येतो, ते सांगतात –

**विश्वीं सच्चिदानंद प्रतीती । या नांव 'शृंगाररस'**
**भक्ती । उल्हासें विश्व न भासे चित्तीं ।**
**या नांव "वीररस" ।।५३।।**

**शृंगार रस : –**

सगुण साकार परमेश्वराच्या भक्तीने संपूर्ण विश्व सगुणसाकार सच्चिदानंदस्वरूप असे चिद्विलासरूपाने अनुभवाला येऊन त्या रूपाने तेथे प्रेम बसणे हाच भक्तींतील "शृंगार रस" होय.

**वीररस :–**

पूर्ण अद्वैत ब्रह्मप्राप्तीने झालेल्या आनंदामुळे जड-विनाशी व दु:खरूप अशा जगताची प्रतीतिच न येणे हा भक्तीत येणारा "वीर" रसाचा अनुभव होय ॥५३॥

**जगदर्पणीं जळभरी नयन। हें 'कारुण्य' असे गहन।**
**जग चळे हरि न चळे, हा अनुभव पूर्ण।**
**'शान्ति' रस जाण या नांव ॥५४॥**

**कारुण्य रस :–**

एक परमात्माच कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् असा समर्थ असून तोच जगदुत्पत्ति–स्थिति–लयकर्ता आहे, असे दृढ जाणून अश्रुपूर्ण नयनांनी भगवंताला जगत् समर्पण करणे; हा भक्तीत येणारा करुण रस होय.

**शांतरस :––**

जग हे क्षणभंगुर असून एक भगवानच अखंड, अविनाशी, अचल आहे या अनुभवाने भक्ताचे चित्त निर्वासन होते; म्हणून हा भक्तीत येणारा शांतरसाचा अनुभव होय ॥५४॥

**अखंड प्रेमानंद उन्मादस्थिती। या नांव 'हास्य'रस भक्ती। मर्यादा-पालनरूपप्रीती।**
**'भयानक' स्थिती या नांव ॥५५॥**

**हास्यरस :—**

भक्तीने प्राप्त होणाऱ्या अखंडानंदाने भक्ताची उन्मत्तासारखी लोकबाह्य स्थिति असणे, हा भक्तीत येणारा हास्यरसाचा अनुभव होय.

एवं व्रतः स्वप्रियनामकीर्त्या जातानुरागो द्रुतचित्त उच्चैः। हसत्यथो रौदिति रौति गायत्युन्मादवन्नृत्यति लोकबाह्यः ॥४०॥ (भाग स्कं ११ अ. २)

असे भागवतांतहि म्हटले आहे.

**भयानक रस :—**

शास्त्ररूप भगवदाज्ञेचे उल्लंघन न करता त्याचे भीतीने पालन करणे. हाच भक्तींतील भयानक रस होय ॥५५॥

**भगवन्महात्म्यज्ञान। हा 'अद्भुतरस' पूर्ण। तिटकरोनि पळे ज्ञानाभिमान। 'बीभत्सरस' जाण या नांव ॥५६॥**

**अद्भूतरस :—**

भगवान् श्रीकृष्ण पूर्ण सच्चिदानंद परब्रह्म असून सर्वज्ञ सर्वशक्तिमान् व अपरिमित षड्गुणैश्वर्यसंपन्न आहे. या माहात्म्यज्ञानाने अद्भुतरसाचा अनुभव येतो.

**बीभत्स रस :—**

आणि अशा सगुण परमेश्वराच्या प्रेमभक्तिपुढे 'मी ब्रह्म आहे' हा ज्ञानाभिमान लाजून नाहीसा होतो हा

भक्तींतील बीभत्सरस होय ॥५६॥

**प्रणय कोपाची रीती । ही 'रौद्ररसाची' ख्याती । परम हरि-विरहासक्ती । "माधुर्यभक्ति" हा रसू ॥५७॥**

**रौद्ररस :--**

भक्त भगवंतावर प्रेमाने रागावतात, हा रौद्ररसाचा अनुभव होय.

**माधुर्य रस :--**

श्रीहरीचा अत्यंत विरह-म्हणजे क्षणभराच्या विरहाच्या कल्पनेने युगविरहाचे दुःख होणे, हा भक्तीतील "माधुर्य रसाचा" अनुभव होय. "क्षणमपि युगमिव यासां येन विना भवेत्" (भागवत द. स्क.)

**जैसा आम्रवृक्षाचा सार । फळामाजींच अवघा साचार । तैंवि रासक्रीडेमाजीं निर्धार । रसलीला सकळही ॥५८॥**

आंब्याच्या झाडाचे सारभूत तत्व म्हणजे मुख्यत: गोडी, ज्याप्रमाणे त्याच्या फळात सर्वच्या सर्व आलेली असते; त्याप्रमाणे भगवंताच्या रासक्रीडेत वर वर्णन केलेले दहाहि रस सहज लीला करीत असतात. प्रत्येक रसाने येथून जाणार नाही' असा निर्धार केलेला असतो ॥५८॥

**'सर्व गंधः सर्व रस' इति । हरिविषयींच बोले श्रुती । आणि 'रसंह्येवायं लब्ध्वाऽऽनंदी भवति' । हे भक्त्या परमानंद प्राप्ती श्रुती सांगे ।।५९।।**

'तो सर्व सुगंधमय व सर्व रसमय आहे' हे श्रुतीचे म्हणणे सगुण साकार भगवंताविषयीच आहे. आणि 'हा रस प्राप्त करून घेऊन जीव आनंदस्वरूप होतो' ही श्रुतीहि भक्तीने परमानंद प्राप्त होतो, असेच सांगत आहे ।।५९।।

**रसरूप रसात्मा श्रीहरी । प्रेमरस द्यावा त्या माझारीं । मग रस पावूनि अविकारी । सुखाकारी नांदावे ।।६०।।**

भगवान् श्रीहरि रसरूप असून तोच रसाचे-अधिष्ठानहि आहे; म्हणून त्याला भक्तिप्रेमरस समर्पण करून-आपणहि परमसुख प्राप्त करून घेऊन अखंड सुख स्वरूप होऊन राहावे ।।६०।।

**हें 'तत्-त्वं' ऐक्य 'असि' पद विवरण । रसरूप रसग्राहक रसाधिष्ठान । प्रेमें निर्भय ऐक्यपण । परी स्वामी श्रीकृष्ण स्वतंत्र सेव्य ।।६१।।**

हेच 'तत्' व 'त्वं' या दोन पदांचे ऐक्यरूप 'असि' पदाचे विवरण आहे. परमात्माच रसरूप असून तोच रसाचा भोक्ता आहे व रसाला अधिष्ठानहि आहे. प्रेमानेच

भगवंताशी निर्भय ऐक्य होते. पण भगवान श्रीकृष्ण कशाच्याहि साहाय्यावांचून केवळ एका प्रेमाने सेवा करण्याजोगा आहे ॥६१॥

**हें द्वैतचि पूर्ण अद्वैत । हाचि शुद्ध भगवत्पंथ ।**
**येणें ज्ञानेश्वरचरणीं विश्रान्त । व्हावें संतीं ॥६२॥**

हे द्वैतासारखे दिसत असले तरी हेच पूर्ण अद्वैत आहे. हाच खरोखर शुद्ध भगवत्प्राप्तीचा मार्ग आहे; म्हणून या मार्गानेच श्रीज्ञानेश्वर महाराजांचे चरणांचे ठिकाणी संतांनी लीन होऊन विश्रांति घ्यावी ॥६२॥

**ही भक्तिरसाची कावडी । अभिषेकावया परवडीं ।**
**ज्ञानेश्वर मातृचरणीं गोडी । धरूनि वाहिली ॥६३॥**

अंतःकरणात ज्ञानेश्वर माउलीच्या चरणांची अखंड गोडी धरून त्या चरणांवर या भक्तिरसाच्या कावडीचा अभिषेक करावा, या उत्कट इच्छेने ती कावड समर्पण केली ॥६३॥

**तें चरणाभिषेक तीर्थ । उत्तर प्रसंगीं बोलिजेत ।**
**सावधान श्रोते संत । होवोनि अवधान देईजे ॥६४॥**

ते ज्ञानेश्वर माउलीच्या चरणाभिषेकाचे तीर्थ पुढील पांचव्या अध्यायांत सांगितले जाणार आहे. श्रोते सज्जनांनी एकाग्र चित्त देऊन श्रवण करावे ॥६४॥

**सर्व सुखाची पुरवणी । सखे ज्ञानेश्वर माय बहिणी । जीवभाव वाहिला चरणीं । कृपाकर जननी शिरीं ठेवी ।।६५।।**

सर्व सुखाची पुरवणी करणारी सखे ज्ञानेश्वर माय बहिणी ! मी आपला संपूण जीवभाव तुझ्या चरणाचे ठिकाणी वाहिला आहे. हे आई ! आता माझ्या मस्तकावर आपला कृपाहस्त ठेव ।।६५।।

**सख्या सद्गुरु मायबापा । ज्ञानेश्वरप्रभो ! करूनि कृपा । तुमचा चरण मार्ग सोपा । सर्वदा मिळो ।।६६।।**

हे सख्या सद्गुरुनाथ मायबापा ! हे ज्ञानेश्वर प्रभो ! आता आपल्या कृपेने आपल्या प्राप्तीचा सोपा मार्ग मला सर्वदा मिळो ।।६६।।

**तरी जन्म जन्म आतां । द्यावें याचि परमार्था । यावीण अन्य सर्वथा । न लगे कांहीं ।।६७।।**

तरी आता जन्मोजन्मी मला हाच परमार्थ द्यावा याशिवाय दुसरें कांहीहि नको ।।६७।।

**हरिः ॐ तत्सदिति श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर कृपाप्रसादे ओवीछंदबद्धे भक्तिपदतीर्थामृते संकेतदृष्टिमय परमगुह्य 'असि' पदविवरणपूर्वक त्रिविधभजन शुद्धभजनरूप भक्त्युपदेशो नाम चतुर्थस्तरंगः ।।४।।**

हरिः ॐ तत्सत् श्रीसद्गुरु ज्ञानेश्वरार्पणमस्तु

## अध्याय–पांचवा

# भक्तिफल निरुपण

**ॐ नमोजी विश्वंभरा । सच्चिदानंदा करुणाकरा ।**
**भक्तवत्सला ज्ञानेश्वरा । स्वसुखोदारा सगुणरूपा ॥१॥**

सर्व जगाचे पोषण करणाऱ्या सच्चिदानंद करुणामूर्ते! स्वतःचे सुख देण्यात अत्यंत उदार असलेल्या भक्तवत्सल सगुणरूपा श्रीज्ञानेश्वर सद्‌गुरुनाथा ! आपणाला नमस्कार असो ! ॥१॥

**तूं आपुलिया माउली । पूर्ण प्रेमें पान्हावली ।**
**हे सकळही साउली । तुझीच माये ॥२॥**

तू आपल्या भक्तजनांची माउली असून त्यांच्याकरिता तू पूर्ण प्रेमाने पान्हावलीस. ही सर्व माझी झालेली तापरहित स्थिति तुझ्या या कृपेमुळेच आहे ॥२॥

**'एकाकी न रमते' या बोला । साच करावया लीला ।**
**प्रीतीवशें धरिला । सगुणाकारु हा ॥३॥**

'परब्रह्माला अत्यंत अद्वैत अवस्थेत राहणे सुखकर वाटत नाही' हे श्रुतीचे म्हणणे सत्य करून दाखविण्याकरिता आपल्या भक्तांच्या प्रेमाला वश होऊन आपण लीलेने सगुण साकार स्वरूप धारण करून प्रगट झालात ॥३॥

**जे एकचि नव्हे एकसरे । दोघा दोन्हीपण नाही पुरे ।**
**काय नेणो साकारे । स्वरूपे जिये ।।अमृ०।।**

असे माउलींनीहि अमृतानुभवात सांगितलें आहे.

**अन्वयें जाणावयाचें राहे । मग जाणणें अवघेंचि होये ।**
**तेही आटोनि सगुण पाय । फळले आम्हां ।।४।।**

अन्वय पूर्ण झाला असता जाणणें बंद पडून सर्व जाणीवस्वरूपच होऊन जाते. हा निर्गुण प्रत्ययहि आटला जाऊन आम्हांला त्याठिकाणी तुझ्या सगुण स्वरूपाच्या चरणांचा अनुभव आला ।।५।।

**ऐसिया निजजननी । मौनें सकळ वाहिले चरणीं ।**
**आतां नित्यचि नमनीं । ऐसें ठेवी ।।५।।**

हे माझे आई ! तू अशा प्रकारची असल्यामुळे वाचेला मौन पडून मी संपूर्ण आपल्याला तुझ्या चरणांवर समर्पण केले आहे. आता नित्यच तुझ्या चरणांचेठिकाणी मी नमून राहीन, असे कर ।।५।।

**पतिकामभोगाचें फळ । पतिवीर्यंचि उमटे बाळ ।**
**तरी पतीचें चरणकमळ । चिरंतन होती ।।६।।**

ज्याप्रमाणे पतीच्या कामभोगाचे पतिवीर्यापासून उत्पन्न होणारे बाळ हेच फळ मिळते व त्यामुळे स्त्रियेच्या अंतकरणांत पतीचे चरण दृढ होतात ।।६।।

**तेविं महावाक्योपदेशें भक्ती । करितां पति होय श्रीपती । मग प्रेमचि पुत्र प्रेमचि पती । प्रेमरूप युवति आपण ॥७॥**

त्याप्रमाणे 'तत्त्वमसि' महावाक्यातील भक्त्युपदेशाप्रमाणे भक्ति केली असता साक्षात् सगुण साकार षडगुणैश्वर्यसंपन्न भगवान् पतिरूपाने प्राप्त होतो व मग भक्त केवळ प्रेमरूप स्त्री बनतो. भगवान् केवळ प्रेमरूप पति होतो व त्याच्यापासून केवळ प्रेमरूप पुत्राची प्राप्ति होते ॥७॥

**कामनेची रात्र गेली । प्रेमाची पहाट फुटली । प्रखरता समूळ तुटली । ज्ञानसूर्य किरणांची ॥८॥**

तेव्हा विषयकामनारूप रात्रीचा अंधःकार नाहीसा होऊन निष्काम सुखावह प्रेमाची पहाट उजाडते आणि ब्रह्मज्ञानरूप सूर्याची "अहंब्रह्मास्मि" ही ज्ञानाहंकाररूप प्रखरताहि नि:शेष नाहीशी होते ॥८॥

**कोटीसूर्यासम सोज्वळ । कोटी चंद्रासम शीतळ । श्यामस्वरूप घननीळ । अंतर्बाह्य ॥९॥**

मग कोटी सूर्यांच्या तेजाप्रमाणे तेजस्वी, पण कोटी चंद्राच्या किरणाप्रमाणे शांत व आल्हादकारक अशी …ार घनसांवळी भगवंताची मूर्ति अंतर्बाह्य अनुभवाला

**प्रेमा**

॥९॥

**प्रेमळ**

**नवविधा ती गौणी । जिज्ञासु अर्थार्थी भेदें करूनी ।**
**आर्त जे कां सत्वगुणीं । तेही गौणी बोलिजे ॥१०॥**

आत्मज्ञान पूर्वीची श्रवणकीर्तनादिरूप जी नवविधा व आर्त, जिज्ञासू व अर्थार्थी यापैकी आर्तभक्ति सात्विक असली तरी ती तीन प्रकारची भक्ति गौणच आहे (आर्तभक्त अत्यंत दीन असतो, म्हणून तो सत्वगुणी म्हटला जातो) ॥१०॥

**करितां आत्मनिवेदन । तत्काळ तुटती त्रिगुण ।**
**'मी सच्चिदानंद' हा अभिमान ।**
**विरहभक्तीनें गळतसे ॥११॥**

आत्मनिवेदनरूप भक्तीने त्रिगुणाचे बंधन नाहीसे होते आणि "मी सच्चिदानंद ब्रह्म आहे" हा ज्ञानाचा अभिमान सगुण भगवंताच्या परमविरहरूप माधुर्यभक्तीने नाहीसा होतो ॥११॥

**मग गौणी आणि परा । या भेदासी नाही थारा ।**
**अवघीच एकाकारा । प्रेमलक्षणा ॥१२॥**

मग शेवटी गौणी भक्ति आणि पराभक्ति असा भेद नाहीसा होऊन एकरूप प्रेमलक्षणा पराभक्तिच होऊन राहते ॥१२॥

**श्रवणे हरिगुणश्रवण । मुखें हरिगुण कीर्तन । करें श्रीहरीअर्चन । चरणें पथगमन हरीगृहाचा ॥१३॥**

कानाने भगवंताचे गुण श्रवण करणे, मुखाने भगवंताचे गुण वर्णन करणे, हाताने भगवंताचे गंधपुष्पादि षोडशोपचारांनी पूजन करणे, पायांनी भगवंताच्या मंदिराचा मार्ग आक्रमण करणे—यात्रा करणे ॥१३॥

**घ्राणें निर्माल्यगंध । नेत्रें देखणें श्याम शुद्ध । मनबुद्धि ते सिद्ध । प्रेमामाजी ॥१४॥**

नाकाने भगवंताच्या निर्माल्याचा सुवास घेणे, डोळयांनी भगवंताची श्यामसुंदर मूर्ति पाहणे, मन आणि बुद्धि भगवंताच्या प्रेमात निमग्न असणे ॥१४॥

**प्रेमचि इंद्रियद्वारें उमटे । प्रेमचि बुद्धीं आत्मीं थाटे । परमात्ममाहात्म्यें एकवटे । प्रेमचि तो ॥१५॥**

अशा प्रकारे सर्व इंद्रियांच्या द्वारा हरिप्रेमच प्रगट होते. (कर्तृत्वबुद्धि उत्पन्न न होता केवळ हरिप्रेमानेच इंद्रियांचे सर्व व्यापार होऊं लागतात) आत्म्याचे ठिकाणी एक प्रेमच भरून राहते व परमात्म्याचे माहात्म्यज्ञान प्रेमात एक होऊन जाते ॥१५॥

**प्रेमाची पहावया परीक्षा । प्रेमचि प्रभू दे शिक्षा । प्रेमळ सख्याची प्रतीक्षा । प्रेमळातें ॥१६॥**

प्रेमाची परीक्षा पाहण्याकरताच परमात्मा विरह प्रेमदु:खाची शिक्षा देतो. प्रेमळ भक्त, भक्तसखा अशा परमात्म्याची व परमात्मा, आपल्या भक्तसख्याची नित्य सारखी वाट पाहत असतो ॥१६॥

**प्रेमळपणी दोनी । स्वयें गेले विरोनी ।**
**प्रेमळाचीच खाणी । सर्वेन्द्रियां ॥१७॥**

भक्त व भगवान यांचे परस्परांवर एकच नि:सीम प्रेम असल्यामुळे त्यांचे दोनपण विरून गेलेले असते. सर्व इंद्रियांचे ठिकाणी प्रेमच उमटलेले असते ॥१७॥

**बुडालें लौकिकाचरण । तुटलें वैदिक बंधन ।**
**जितुके दिसती आश्रमवर्ण । संन्यासचि ते ॥१८॥**

अशा प्रेमळ भक्ताला लौकिक व्यवहाराचे किंवा वैदिक आचरणाचे बंधन राहत नाही. त्याच्या दृष्टीने सर्व आश्रम धर्म हे संन्यासधर्मच असतात ॥१८॥

**कर्मफळांचा लाहो सुटला । कर्माचाही ठावो पुसला ।**
**अंतर्बाह्यें स्पर्शिला । श्रीकृष्णप्रेमा ॥१९॥**

प्रेमळ भक्तांची संपूर्ण विषयसुखरूप कर्मफळाची इच्छा नि:शेष नाहीशी झालेली असते, म्हणून कर्म व कर्तृत्व हेहि त्यांना मुळीच भासत नाहीत. ते अन्तर्बाह्य एक भगवत्प्रेमरूपच होऊन राहतात ॥१९॥

**प्रेमसद्गद प्राणयमन । प्रेमी प्रत्याहारे मन ।**
**प्रेमधारणा रूप सगुण । प्रेमचि ध्यान कृष्णसेवा ॥२०॥**

हरिप्रेमाने कंठ सद्गद होणे हाच भक्तांचा 'प्राणायाम' होतो. हरिप्रेमामुळेच त्यांची इंद्रिये विषयाकडे वळतच नाहीत, हाच त्यांचा 'प्रत्याहार' होय. सगुण स्वरूपाचे ठिकाणी सारखी चित्ताची प्रेमवृत्ति धावणे हीच त्यांची 'धारणा' होय. प्रेमामुळे अखंड भगवदाकार चित्त होणे, हेच त्यांचे 'ध्यान' होय. व हीच त्यांची सेवा होय ॥२०॥

**प्रेम ओसंडण समाधी । पूर्व यमनियमासनादी ।**
**आदिअंती त्रिशुद्धी । प्रेमचि एक ॥२१॥**

सतत प्रेम ओसंडून येणे, हीच 'समाधी' होय. प्रारंभीचे यम-नियम-आसनादि ही अंगहि प्रेममयच असतात. तसेच शेवटीहि प्रेमच उरते, हे त्रिवार सत्य आहे ॥२१॥

**प्रेमींच एकपणें द्वैत । प्रेमेंचि द्वैतीं अद्वैत ।**
**प्रेमेंचि नाशे द्वैताद्वैत । रासेश्वरीसहित हरि भेटे ॥२२॥**

असे भजन होत असताना द्वैत दिसत असले, तरी प्रेमामुळे अद्वैतच असते किंबहुना या प्रेमामुळे द्वैत आणि अद्वैत या दोहोंचेहि भाव राहत नसल्यामुळे दोन्ही नाहीसे होतात व त्या प्रेमात रासेश्वरी-राधेसह वर्तमान भगवान श्रीकृष्णाची भेट होते ॥२२॥

**ऐसा 'हा प्रेम' शब्दें । बोलतां न ये विनोदें ।**
**याच्याचि अविरोधें । सकळ हें ।।२३।।**

असो. हा प्रेम कौतुकानेहि शब्दाने सांगता येत नाही. याच्या अविरोधाने नामरूपात्मक संपूर्ण विश्व राहते (कारण विश्वातहि ते प्रेम दिसून पडते. विरोध समसत्ताक असतो. विषमसत्तेंत विरोध नसतो.)

**व्रजराज तात जया । आम्ही लंपट तत्पायां ।**
**कमळीं भ्रमरी होवोनिया । जये रीती ।।२४।।**

कमळाचे ठिकाणी जशी भ्रमरी लंपट होते, तसेच व्रजराज नंद हे ज्याचे पिता आहेत, त्या भगवान श्रीकृष्णाच्या चरणाचे ठिकाणी आम्ही लंपट झालो आहो ।।२४।।

**कां गोपिकांचो रजधूळ । आम्हांस करील प्रेमळ ।**
**हा विश्वास मनीं प्रबळ । धरोनि घननीळ चिंतितसे ।।२५।।**

किंवा गोपिकांच्या चरणधूलीप्रसादाने आम्हीहि भगवत्प्रेमाने प्रेमळ होऊ, असा प्रबळ विश्वास अंतःकरणात धरून आम्ही भगवंताचे चिंतन करतो ।।२५।।

**महात्मरूपें प्रेम पाही । जारपणही न ये देही ।**
**कामचि परी अधिक ठायीं । मोक्षाहूनि पैं केला ।।२६।।**

(सच्चिदानंदघन षड्‌गुणैश्वर्यसंपन्न असा एक परमात्माच सर्व विश्वात आहे, त्यावाचून दुसरे कोणी नाही,) हे महात्म्यज्ञानहि प्रेमच होय आणि याने जारपणाचाहि दोष येत नाही; म्हणून भगवद्विषयक कामच मोक्षसुखाहूनहि श्रेष्ठ केला आहे । २६॥

**ऐसी जियांची स्थिती । त्या गोपिकापदीं प्रीती ।**
**वंदनादि पुढतोपुढतीं । पन्नासो कीं ॥२७॥**

अशी ज्यांची स्थिति आहे, त्या गोपिकांच्या चरणी वारंवार प्रेमाने वंदनादिक सेवाच माझे ठिकाणी वृद्धि पावो ॥२७॥

**जया स्थळीं विरूपाक्ष । मृदंगवादन धरी पक्ष ।**
**तें सांवळें ब्रह्म प्रत्यक्ष । प्रीतीनें होऊं ॥२८॥**

ज्या रासामध्ये भगवान शंकरांनी स्वत. स्त्रीरूपाने मृदंग वाजविण्याची सेवा स्वीकारली त्या रासातील प्रत्यक्ष पूर्ण ब्रह्म असे श्रीकृष्णरूप तेच आम्ही होऊ ॥२८॥

**आणि ब्रह्म होणेंही सकळ । जयाच्या पायाहूनि केवळ ।**
**ओवाळिजे तो घननीळ । सबाह्यांतरीं पाहूं ॥२९॥**

अस्मत्‍आणि ब्रह्मरूप होणे हे देखील ज्याच्या पायावरून
॥३६॥ ग़ाकावे, तेच एक सांवळे परब्रह्म आम्ही अंतर्बाह्य

मुखाने ७

**'शिवो भूत्वा शिवं यजेदिति' । ही साह्य नेऊं सखी श्रुती । मग तीसचि प्रार्थोनि भक्ती । मागोनि घेऊं ॥३०॥**

"शिवस्वरूप होऊन शिवाचे भजन करावे" ह्या श्रुतिसखीचे साह्य घेऊ आणि तिचीच प्रार्थना करून तिच्या-पासून भक्ति मागून घेऊ ॥३०॥

**प्रेमाचा करूं कळस । हरीस अर्पू ब्रह्मरस ।**
**श्रीकृष्णपदीं सावकाश । सख्यांनो ! भृंगी होऊं चला ॥३१॥**

प्रेमाची परम सीमा करूं आणि परमप्रेमरूप ब्रह्मरस भगवंताला अर्पण करू. सख्यानो, चला ! आपण श्रीकृष्ण चरणारविंदाचे ठिकाणी अत्यंत स्वस्थ चित्त अशा भृंगी होऊन राहू ॥३१॥

**वाच्य लक्ष्य मिथ्या पक्ष । सर्वदेशी एकदेशी प्रत्यक्ष ।**
**स्वयें श्रीकृष्ण सगुण अपरोक्ष । अनुभवसाक्ष प्रीतीचा ॥३२॥**

वाच्य–लक्ष्य–मिथ्या इत्यादि पक्ष त्याचप्रमाणे ग्र्
व्यापक–एकदेशी प्रत्यक्ष इत्यादि सर्व, साक्षात्
श्रीकृष्णच आहेत. हीच परमप्रेमाच्या अनुभ्
आहे ॥३२॥

**केला ॥२६॥**

**परम प्रेमाचें रूप । तो हा व्रजींचा भूप ।**
**वेणुवादनसंकल्प । सत्यत्वें ठेला ।।३३।।**

व्रजाचा राजा भगवान श्रीकृष्ण हा परमप्रेमाने घेतलेले सगुण स्वरूप होय. वेणुवादनाचा संकल्प करून तो अविनाशी आहे ।।३३।।

**सनकादिकांची ध्येयमूर्ती । नारदप्रभूची गेय कीर्ती ।**
**रासमंडळीं प्रेम मूर्ती । चला पाहूं सख्यांनो ! ।।३४।।**

भगवान श्रीकृष्ण म्हणजे सनकादि ऋषींची, अखंड ध्येय-मूर्ति होय व नारदाचार्यांची, कीर्ती अखंड गायन करण्याची मूर्ति होय, अशी ही प्रेममूर्ति सख्यांनो! रसामध्ये पाहूं चला! ।।३४।।

**व्यापक सुख जें भरलें । तें संपुटीं एकवटलें ।**
**हें ब्रह्मुसें वोतलें । सांवळें रूप ।।३५।।**

जे ब्रह्मसुख सर्वत्र भरले आहे, ते दोन हाताच्या संपुटीत घेतले जाईल असे आपण स्वतःच एकवटून, तेच सच्चिदानंद ब्रह्ममुसेत सांवळे सगुण असे ओतले गेले आहे.

**जयाचें नाम घेतां वाणी । ब्रह्मरूपत्व शरीरालागुनि ।**
**अस्मत्कान्त ते प्रेमदानी । पदनिर्वाणी सेवूं त्यांचे ।।३६।।**

मुखाने ज्यांचे नामस्मरण केले असता जड शरीरही

ब्रह्मरूप होते, तेच आमचे पति श्रीकृष्ण परमप्रेम देणारे आहेत, म्हणून त्यांच्या चरणांची निःसीम सेवा करू ॥३६॥

**कल्पना आणि अभिमान । दोन्ही प्रेमरूप जाण ।**
**सच्चिदानंद हे खूण । प्रेमामाजीं ॥३७॥**

परमप्रेमात कल्पना आणि अभिमान हे दोन्ही प्रेमरूपच असतात आणि त्यात सच्चिदानंदाच्याच अनुभवाची खूण असते ॥३७॥

**भोळा आणि ज्ञानवंत । प्रेमीं समानचि निश्चित ।**
**हें फळ तोडतां महावाक्यार्थ । तरुसम झाला ॥३८॥**

प्रेमामध्ये भोळा आणि ज्ञानी दोघेहि सारखेच असतात. हे श्रीकृष्णरूप प्रेममय फळ हाती आले असता महावाक्याचा अर्थ वृक्षासारखा वाढतो म्हणजे दृढ व व्यापक होतो ॥३८॥

**वसंत शृंगार रती । मोह मन्मथ स्थिती ।**
**सकळही श्रीकृष्णप्रीती । रूपा आली ॥३९॥**

वसंत (उद्दीपन भाव), शृंगार (रस), रति (शृंगाररसाचा स्थायीभाव) मोह व मदन वगैरे सर्व हरिप्रेममय होऊन जातात ॥३९॥

**वृत्तींचें वृत्तिपण गेलें । जीवाचें जीवपण मेलें ।**
**मुक्तिबीजासी अंकुर आलें । भक्तिसुखाचे ॥४०॥**

93846



वृत्तीचे वृत्तिपण नाहीसे होते, जीवाचे जीवपणहि राहत नाही व मुक्तिबीजाला भक्तिसुखाचे अंकुर फुटतात

**हें काय गौण बोलणें । बीज आणि फल भक्तीच होणें ।**
**त्यांतील प्रेमरस चाखणें । नंदनंदनें मत्कांते ।।४१।।**

खरोखर, असे म्हणणेहि गौण आहे. बीज आणि फळ दोन्ही भक्तिच होऊन जाते आणि भक्तीतील प्रेमरस आमचे पति श्रीकृष्ण हेच सेवन करतात । ४१।।

**पडला अविद्येचा विसर । बुडाला विद्येचा अंकुर ।**
**अवघा झाला अविकार । श्रीकृष्ण प्रेम ।।४२।।**

अविद्येचा सर्वस्वी विसर पडतो, विद्येचा अंकुर राहत नाही म्हणजे ब्रह्मज्ञानाची जाणीवही राहत नाही, तर असे एक निर्विकार श्रीकृष्ण प्रेमच राहते ।।४२।।

**जळाली बंधनस्थिती । पळाली लाजोनि मुक्ती ।**
**आविष्करिली भक्ती । अकृत्रिम ।।४३।।**

बद्धस्थिति नाहीशी होऊन मुक्तस्थितिहि लाजून दूर पळते आणि एक अकृत्रिम स्वाभाविक प्रेमच प्रगट होते.

**हा आविर्भावो भला । परम गुह्य निरूपिला ।**
**दशोपनिषदां आला । निषेध भावो ।।४४।।**

हा परम गुह्य असा भक्तिप्रेमाचा आविर्भाव सांगि-

तला गेला. येथे दशोपनिषदांनीं केलेलें वर्णन निंदारूपच होते ।।४४।।

**तो निषेधचि स्तवनविधी ! श्रुतीपणें गोपी मांदी ।**
**प्रेम साधोनियां संधी । श्रीकृष्णपदीं उडी घाली ।**
**।।४५।।**

हा निषेध म्हणजे भगवंताचे स्तवनच होय ("निंदाची विशदें स्तोत्रें होतीं" ।। अमृ. प्र. ९–४९) त्या श्रुतीच गोपींचा मेळा होय. आणि त्या प्रेमवृत्तिरूप गोपींच्या संधीत असलेल्या श्रीकृष्णाच्या निःसीम प्रेमाने त्या, त्याच्या (श्रीकृष्णाच्या) चरणांवर उड्या घालतात ।।४५।।

**करुणेचे काढोनि कोंब । श्रीकृष्ण वृक्ष स्वयंभ ।**
**प्रेमतारूण्ये सप्रभ । टवटवीत ।।४६।।**

भगवान श्रीकृष्ण हा करुणारसाचे कोंभ काढून बनलेला स्वयंभू वृक्ष होय. प्रेमाच्या नित्य नूतन तारुण्याने तो सदा तेजस्वी व टवटवित असतो ।।४६।।

**लता गोपिका वेष्टित । रसपुष्पीं सुगंधित ।**
**ऐक्य फळभारें डोलत । प्रेमरसे ।।४७।।**

तो गोपीरूपी वेलींनी वेष्टित असून नवरसरूप पुष्पांनी अखंड सुगंधित आहे आणि प्रेमरसाने भरलेल्या अद्वैतरूप फळांनी लदबदून डोलत आहे ।।४७।।

**आम्हां पक्षियांतें सुख जाणा । घ्यावया प्रीतीरसरूप रसना । अचल तरूपति चरणा ।**
**करितां अर्पणा स्वानंदू ॥४८॥**

आम्हा पक्ष्यांना सुख घेण्याकरिताच ही प्रेमरसरूप जिव्हा असून ती अचल म्हणजे अविनाशी अशा वृक्षरूप श्रीकृष्णपतीच्या चरणांवर समर्पण केली असता आम्हांला स्वानंदाचा लाभ होतो ॥४८॥

**हा स्वानंद वाचाऋण । न फिटेचि उपायें करून ।**
**या लागीं मौनेंचि चरण । वंदिले प्रभूचे ॥४९॥**

ही स्वानंदाची जाणीव म्हणजे वाचाऋण असून ते कोणत्याहि उपायाने फिटत नाही; म्हणून आता काही एक न बोलता प्रभु श्रीकृष्णाच्या चरणांना मी वंदन करते ॥४९॥

**त्या चरणीं होतां ठावो । गेला सर्वही भावाभावो ।**
**सबाह्यान्तरीं लाधली ठेवो । कृष्णरूपाची ॥५०॥**

त्या श्रीकृष्णचरणांचे ठिकाणी अंतःकरण स्थिर होऊन वाणी विश्राम पावली असता सर्व प्रकारचे "असणे–नसणे" जाऊन आत–बाहेर एक श्रीकृष्ण रूपच घनदाट भरून राहते ॥५०॥

**सच्चिदानंदवंदनगर्भ । प्रेमशोभासुखसुरभ ।**
**एकचि परी पूर्णप्रभ । व्याप्यव्यापकवर्जित ॥५१॥**

श्रीकृष्णस्वरूप म्हणजे सच्चिदानंद स्वरूपाला प्रेमपूर्वक केलेला वंदनाचा गर्भ होय. तेथे होणारे सुंदर सुख हीच प्रेमाची शोभा आहे. हे दोन्ही एकच असून पूर्ण आहेत व व्याप्य–व्यापक वर्जित आहेत ।।५१।।

**षड्गुणैश्वर्ययुक्त । ऐश्वर्य तें विश्व समस्त ।**
**विश्वैक्यकरण तो सगुण भगवंत ।**
**परी प्रकट सिद्धान्त रासामध्यें ।।५२।।**

संपूर्ण विश्व हीच त्या भगवंताचे ठिकाणी असलेली षडगुणैश्वर्य संपत्ति होय. त्या सच्चिदानंदस्वरूपाचे व विश्वाचे ऐक्य करणे हाच सगुण भगवान होय. पण रासामध्ये मात्र तो सगुण साकार श्यामसुंदररूपाने प्रगट आहे ।।५२।।

**तें रासमंडळ गोपी प्रेमे । आम्हा दिधलें गुणोत्तमें ।**
**यालागी तत्पदप्रेमें । रसत्वें सेवूं ।।५३।।**

गोपींच्या चरणप्रेमामुळे ते रासमंडळ आम्हांला भगवंताने दिले; म्हणून त्यांच्या चरणांचे आम्ही रसरूपाने सेवन करूं ।।५३।।

**त्या रसाची प्रीती । तेंणें हृदयीं धरूं श्रीपती ।**
**साधोनियां अकृत्रिम भक्ती ।**
**वाचाऋण निश्चिती फेडूं ।।५४।।**

त्या रसाच्या प्रीतीने हृदयात भगवंताला धरून ठेवू आणि अशा रीतीने अकृत्रिम प्रेम भक्ति साधून निश्चयेकरून वाचाऋण (अविद्यालेश) फेडू ।।५४।।

**फिटलियाही वाचाऋण । न यावा भक्तिधनाभिमान ।**
**यालागीं ऐक्यत्वें श्रीकृष्णचरण । प्रीतीनें सेवूं ।।५५।।**

ते वाचाऋण फिटल्यावरहि भक्तिधनाचा अभिमान उत्पन्न होऊ नये म्हणून ऐक्य ठेऊनच श्रीकृष्णचरणाची प्रेमाने सेवा करू ।।५५।।

**तें सेवासुकृत जें कांहीं । निश्चयें घेवोनि सर्वंही ।**
**अर्पियलें पायीं । श्री ज्ञानेश्वर श्रीगुरूच्या ।।५६।।**

त्या सेवेचे जे कांही पुण्य उत्पन्न होईल ते संपूर्ण घेऊन श्रीगुरु श्रीज्ञानेश्वर माऊलीच्या चरणी समर्पण केले ।।५६।।

**हें करितांचि अर्पण । सद्गुरूनें दिधलें वरदान ।**
**हा ग्रंथ एकवीस वेळ पठण । संपुटीं लावूनी करावा ।।५७।।**

हे अर्पण केल्याबरोबर सद्गुरुंनी असे वरदान दिले की "हा ग्रंथ संपुटी लावून एकवीस वेळ पठन करावा ।।५७।।

**'ज्ञानेश्वर माऊली' अनुलोम । प्रेमे तोचि प्रतिलोम ।**
**पठण करितां प्रकाशे परम । नित्य सुखदाम्नी हरिसेवा ।।५८।।**

प्रत्येक ओवीच्या प्रारंभी व शेवटी 'ज्ञानेश्वरमाऊली' हा मंत्र योजून या ग्रंथाचे पठन केले असता अखंड सुख देणारी श्रेष्ठ अशी हरिभक्ति अंत:करणात प्रगट होईल ॥५८॥

**या श्रीगुरूवचनें भलें । आम्हां पठणचि फळलें ।**
**प्रेमें वंदिली पाउलें । वंदनचि असो ॥५९॥**

या श्रीगुरूंच्या आशीर्वचनाने आम्हाला नुसते ग्रंथाचे पठनच फलदायक झाले आहे; म्हणून त्यांच्या चरणांना प्रेमाने वंदन केले व वंदनच करीत राहू ॥५९॥

**'अमृतानुभव' संपुटी । 'ज्ञानेश्वर' पदसंपुष्टी ।**
**स्वप्रेम स्वानंदे गोष्टी । लाधल्या ज्या की ॥६०॥**

'ज्ञानेश्वर' पदाची संपुटी लावून अमृतानुभवाचे पारायण केल्याने आम्हांला ज्या कांही प्रेमाच्या आनंदाच्या रहस्य कथा श्रीगुरूपासून कळल्या ॥६०॥

**त्या आणि तन-मन-धन । जीव प्राण ईश्वरपण ।**
**पायीं अर्पोनि हृदयी चरण। वंदोनि स्थापिलें ॥६१॥**

त्या आणि तन-मन-धन-जीव-प्राण-ईश्वर पण हे सर्व त्यांच्या चरणी अर्पण करून व त्यांना वंदन करून आम्ही आपल्या हृदयांत तेच चरण स्थापन केलेंत ॥६१॥

**एकत्वें दोहींची पूजा । अर्चिलें श्रीगुरुराजा ।**
**अर्चनपुण्य वाहिलें वोजा । श्रीगुरुज्ञानेश्वरचरणीं ॥६२॥**

ऐक्यभावनेच दोन्ही चरणांची पूजा करून ती श्रीगुरूंना समर्पण केली व अर्चनाचे पुण्यहि उल्हासाने श्रीगुरूज्ञानेश्वर चरणीच वाहिले ॥६२॥

**चरण पाहतां विरालें मन। तेणें ग्रंथबोला पडलें मौन।**
**आता जयजयकार करून । ज्ञानेश्वर उत्कर्ष ॥६३॥**

त्यांचे चरण पाहतां क्षणीच मन विरून गेले; म्हणून पुढे ग्रंथनिरूपणालाहि मौन पडले. आतां श्रीज्ञानेश्वर महाराजांचा जयजयकार करून त्यांचाच उत्कर्ष वाढो ॥६३॥

**नमो ज्ञानेश्वर जगन्माते । कडिये घेवोनि मातें ।**
**पाजोनि स्तन प्रेमातें । पायींच ठेवी ॥६४॥**

हे ज्ञानेश्वर माउलीं ! तुला नमस्कार असो। मला कडेवर घेऊन स्तनातील प्रेमपान्हा पाजून आपल्या पायींच मला असूं दे ॥६४॥

**या विनंती आदिनाथ । कृपें तोषलें समर्थ ।**
**चरण वंदिता मच्छेंद्रनाथ । ओसंडलें प्रेमें ॥६५॥**

सद्गुरूंना अशी विनंति करताच समर्थ श्रीआदिनाथ शंकरांना कृपा उत्पन्न होऊन ते प्रसन्न झाले आणि त्यांच्या

चरणांना नमस्कार केल्याबरोबर मत्स्येंद्रनाथांचा कंठ गहिवरून आला ।।६५।।

**नमितां मच्छेन्द्र माउली । गोरक्षनाथा कृपासाउली ।**
**गोरक्ष नमितां माय माऊली ।**
**गहिनी पाउलीं शिर ठेवू ॥६६।।**

मत्स्येन्द्रनाथ माउलीला नमन करताच मजवर गोरक्षनाथांच्या कृपेची सावली झाली. माता गोरक्ष-माउलीला नमस्कार करीत गैनीनाथांच्या चरणांवर मस्तक ठेवले ।।६६।।

**श्री निवृत्तिनाथ शंकर । त्या लोटांगण वारंवार ।**
**तत्कृपे माय ज्ञानेश्वर । मिळाली आम्हां ।।६७।।**

साक्षात् शंकरस्वरूप असलेल्या श्रीनिवृत्तिनाथांच्या कृपेनेच आम्हाला ज्ञानेश्वर माउली सद्गुरु प्राप्त झाल्यामुळे त्यांच्या चरणांवर वारंवार लोटांगण घालतो ।।६७।।

**सोपान देव कृपाळू तात । मुक्ताबाई कृपावंत ।**
**चांगदेव, खेचर, नामयादि संत । जनी मीरा समस्त नमियेले ।।६८।।**

तात सोपानदेव, कृपावंत मुक्ताबाई, चांगदेव, विसोबा खेचर, नामदेवादि संत आणि जनाबाई, मीराबाई वगैरे सर्व संतांचे चरणकमली माझा नमस्कार असो ।।६८।।

**ज्ञानेश्वर प्रभूचिया करकमळें । हृदीं उदेलीं प्रेमफळें । म्हणोनिच नंदबाळें । अंगिकारीलें ॥६९॥**

सद्‌गुरु श्रीज्ञानेश्वर माउलीच्या करकमळानेच माझ्या हृदयात प्रेमरूपी फळे उत्पन्न झाली व म्हणूनच नंदकुमार श्रीकृष्णाने माझा अंगीकार केला ॥६९॥

**यापरी गुरुपरंपरास्मरणीं । प्रेमे राहोनी ज्ञानेश्वर-चरणीं । अंगुष्ठ चोखितां धणी । न पुरेचि हे ॥७०॥**

याप्रमाणे प्रेमाने गुरुपरंपरेचे स्मरण करीत श्रीगुरुज्ञानेश्वरमाउलीच्या चरणांचे ठिकाणी राहून त्यांचे चरणांगुष्ठ चोखीत असता माझी तृप्तिच होत नाही ॥७०॥

**यालागीं तें पदकमळ । हृदयी धरिलें नित्यकाळ । ज्ञानेश्वरनामें कल्लोळ । अन्तर्बाह्य ॥७१॥**

म्हणून ते ज्ञानेश्वर माउलीचे चरणकमळ मी अखंड हृदयात धरिले आहे आणि अन्तर्बाह्य ज्ञानेश्वरमाउलीच्या नामाचा गजर होत आहे ॥७१॥

**ज्ञानेश्वरगुरुमुख पिक प्रसाद । तेथें आटलें दु खानंद । शेखीं अर्पणरूपें शुद्ध । प्रेमचि उरला ॥७२॥**

श्रीसद्‌गुरुज्ञानेश्वर महाराजांच्या मुखातील पीकरुप प्रसाद प्राप्त झाल्यामुळे तेथे विषयापासून होणाऱ्या संपूर्ण सुखदु:खाची आटणी झाली आणि शेवटी अंत:करणात एक अर्पणरूप प्रेमच शिल्लक राहिले आहे ॥७२॥

**जयजय ज्ञानेश्वर माउली । सद्गुरुरूप कृपासाउली ।**
**आतां बळकट पाउलीं । हृदयीं राखी ।।७३।।**

हे सद्गुरु ! हे कृपासाउली ज्ञानेश्वरजननी ! तुझा जयजयकार असो ! आता माझ्या हृदयात तुझी पाउले दृढ असू दे ।।७३।।

**आणि हें मागणें मना । पायीं करो सुमना ।**
**प्रेमरसे रसना । अंगुष्ठ चाखो ।।७४।।**

आणि हे मागणे आहे की, माझ्या मनाने चरणाचे ठिकाणी वाहिलेल्या पुष्पाप्रमाणे होऊन राहावे आणि जिव्हेने प्रेमरसयुक्त होऊन तुझे अंगुष्ठ चोखावे ।।७४।।

**ज्ञानेश्वर सद्गुरुनाथ । हाचि येथ निघो अर्थ ।**
**सर्वत्र यशस्वी सद्गुरुनाथ । ज्ञानेश्वरमाउलीही ।।७५।।**

या संपूर्ण ग्रंथाचा "सद्गुरुनाथ श्रीज्ञानेश्वर" हाच एक अर्थ निघो- (म्हणजे 'ज्ञानेश्वर माउली' या नामस्मरणाने ग्रंथात निरूपण केलेला आहे तो सर्व अर्थ हाती येतो, असा अर्थ निघो). ही सद्गुरुनाथ ज्ञानेश्वर माउली सर्वत्र यशस्वी आहे.

**हरि:ॐ तत्सदिति श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर कृपाप्रसादे ओवीछंदबद्धे भक्तिपदतीर्थामृते फलानंत्यपूर्वक उर्वरित भक्त्युपदेशो नाम पंचमस्तरंग ।।५।।**

।। श्रीसद्गुरुज्ञानेश्वरार्पणमस्तु ।।

...ठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३६८८५ वि: काव्य
क्रमांक ९६२२ दि. २५।५८४

## वैदर्भीय संतश्रेष्ठ

# श्रीगुलाबराव महाराजांचे चरित्र

भा. १-२

द्वितीय आवृत्ति

मूल्य प्रत्येकी ३-५०

" महाराज बोलूं लागले कीं भक्तिप्रेमाचा नुसता पाऊस पडे! ते चर्चा करू लागले कीं त्यांची निर्दोष वादसरणी, विलक्षण ज्ञान व युक्तिवाद पाहून मन कुंठीत होई. ते प्रेमाने गाऊ लागले की मुलाच्या माधुर्यालाहि लाजविणारी त्यांची अत्यंत मधुरवाणी ऐकूण चित्त नागासारखे डोलूं लागे !......देवाच्या दयेने मला सत्संगति आणिकहि घडली आहे. पण श्रीगुलाबराव महाराजांच्या संगतीत जो 'अद्भुतं रोमहर्षणम्' असा भक्तिप्रेमानंद भोगायला सांपडला, तसा अन्यत्र कोठेहि मिळाला नाही."

(प्रस्तावना)

ल. रा. पांगारकर

वैदर्भीय संत श्रीगुलाबरावमहाराज विरचित

# अलौकिक व्याख्यानमाला

पृ. १८० ] चतुर्थ आवृत्ति [ २ रु.

भारतीय विचारसरणीचे त्रिकालाबाध्यत्व सिद्ध करण्यासाठी पाश्चात्य विचारधारांवर ' मुले कुठारः ' न्यायाने त्यांच्या मूलभूत सिद्धान्तांचे तर्कशुद्ध व सप्रमाण खंडण करणे आवश्यक आहे, हे लक्षांत घेऊन या ग्रंथात " अन्तस्फूर्ति-बहूपयोगिता-उत्क्रांतिवाद-परमाणुवाद-तर्कशास्त्र-स्वप्नविज्ञान " वगैरे अनेक विषयांचा तौलनिक विचार करून त्यांचा फोलपणा सुस्पष्ट दाखविला आहे.

मानसशास्त्राचा अभ्यास करणाऱ्यांना तर भारतीय मनोविज्ञान आणि परकीय मनोविज्ञान यांच्या तुलनेसंबंधी नवनवीन युक्तिवाद अनेकविध स्वरूपात सांपडतील. तसेच अध्यात्ममार्गातील मुमुक्षूंना वैषयिक-सामाजिक प्रेमापासून तो तहत ज्ञानोत्तर भक्तीतील परमप्रेमाकडे हळूहळू कसे जावे, त्यातील अडथळे कसे टाळावे, वगैरे संबंधी अनेक प्रक्रिया सांपडतील. 'आधुनिक गुरुभक्तितील भोंदूगिरी' संबंधी विचार करताना ' वेडे आणि साधु ' यांच्यातील भेद स्पष्ट दाखवून मुमुक्षुजनांना या ग्रंथात सावध केले आहे.

अशा प्रकारे बुद्धिवाद्यांच्या बुद्धीला आणि भाविकांच्या श्रद्धेला परिपुष्ट करणाऱ्या विवेचनाने हा ग्रंथ भरलेला आहे.

|| सर्वत्र यशस्वी श्रीज्ञानेश्वरमाऊली ||

# नित्यतीर्थ

प्रलयातहि नाश न पावणारे असे अविनाशी तीर्थ

श्री क्षेत्र आळंदी

जय जय सद्गुरो आळंदीपते । जय जय सद्गुरो करुणामूर्ते । जय जय सद्गुरो श्रौतकीर्ते । कैवल्यदानी ।। १ ।। जय जय सद्गुरो विघ्नहर्ता । जय जय सद्गुरो बुद्धिदाता । जय जय सद्गुरो सत्य-ज्ञानानंता । जय जय संतमुकुटमणी ।।२।। निगमाचे फळ । गुरुवीण न रसाळ । हे बोलिले केवळ । तातचि अंगे ।।३।। जयाचा दिठीवा वसंतु । जंव न रिघे निगमवनां आंतु । तंव आपुलिया फळी हातु । न घेपतीही ।।४।। (अमृ. २-१८) यस्य देवे पराभक्ति । यथा देवे तथा गुराविति । जयाची तया प्रकाशति । सकलार्थस्थिति श्रुति म्हणे ।।५।। म्हणवोनि सद्गुरूचे चरण । सकलतीर्थां अधिष्ठान । ऐसे गुरुगीतेचे वचन । प्रमाण आहे. ।।६।।

वेदांनी ज्यांची कीर्ति गायिली आहे व जे कैवल्याचे दान करतात अशा करुणेची मूर्ति असलेल्या आळंदीपती सद्गुरुनाथा ! आपला जयजयकार

असो ॥१॥ सर्व विघ्न हरण करणारे, सद्बुद्धि देणारे हे सद्गुरो ! आपण अविनाशी चेतन आणि ज्याच्या स्वरूपाला अंत नाही असे असून संतांचे मुकुटमणी आहात-सर्व श्रेष्ठ आहात. आपला जयजयकार असो ॥२॥ वेदाचे अर्थज्ञानरूप फळ श्रीगुरुकृपेवाचून मधुर होत नाही. म्हणजे कृतार्थ करून ब्रह्मरसाची पुष्टि देणारे-ब्रह्मसुख प्राप्त करून देणारे होत नाही. असे माझे तात श्रीज्ञानेश्वर महाराज यांनीच स्वतः म्हटलेले आहे ॥३॥ ज्यांचा कृपादृष्टिरूप वसंत जोपर्यंत वेदरूपी अरण्यांत शिरत नाही तोपर्यंत कोणीहि वेदाचे फळ आपल्या हाती घेऊ शकत नाही म्हणजे आपल्या स्वतंत्र बुद्धीने परोक्ष व अपरोक्ष ब्रह्मज्ञान करून घेऊ शकत नाही ॥४॥ अमृ. २-१८ ज्याचे भगवंताचे ठिकाणी जसे निस्सीम प्रेम असते तसेच श्रीगुरूंचेहि ठिकाणी आहे, त्यालाच वेदांनी सांगितलेले सर्व अर्थ बरोबर कळतात, असे श्रुतीनेहि म्हटले आहे. ॥५॥ म्हणून श्रीगुरूंचे पायच सर्व पवित्र करणाऱ्या तीर्थांना अधिष्ठानभूत आहेत म्हणजे सर्व तीर्थांचे ठिकाणी पवित्र करण्याचे असलेले सामर्थ्य श्रीगुरूच्या चरणांचेच अंशभूत सामर्थ्य होय, असे गुरुगीतेचे प्रमाण-वचन आहे. ॥६॥

गुरुगीतेतील प्रमाण वचने—

**सर्वतीर्थाऽवगाहस्य संप्राप्नोतिफलं नराः ।**
**गुरोः पादोदकं पीत्वा शेषं शिरसि धारयन् ॥१८॥**

जगातील सर्व तीर्थांमध्ये स्नान केल्यानंतर जे पुण्यफळ मनुष्याला प्राप्त होते ते सर्व फळ श्रीगुरूंच्या चरणाला स्पर्श झालेले उदक प्रेमाने पिऊन व मस्तकावर धारण केल्याने प्राप्त होते.

**सप्तसागरपर्यन्तं तीर्थस्नानफलं यथा ।**
**गुरोः पादोदबिन्दोश्च सहस्रांशेन तत्फलम् ॥७५॥**

सातहि समुद्रांचे स्नान करण्यापर्यंत जेवढी तीर्थे आहेत त्या सर्व तीर्थांमध्ये स्नान केल्याने जे पुण्यफल प्राप्त होते, ते सर्व पुण्य श्रीगुरूंच्या चरणामृतातील एक बिंदु प्राशन केल्याने मिळणाऱ्या पुण्याच्या एक सहस्रांश देखील नाहीं ॥७५॥

**हो अवघीयांची रीति । परी माझी विशेष स्थिति । ती सावध होऊनी श्रोती । ऐकावी प्रेमे ॥७॥ माझा सद्गुरु करुणाघन । आळंदीपति कल्याण निधान । जेणे आपुलिया नामाचा मंत्र देऊन । कृतार्थ केले मजलागी ॥८॥ कैवल्य कन-काचियां दाना । जो न कडसी थोर साना । दृष्टयाच्या दर्शना । पाठाउ जो ॥९॥ अमृ. २-२५॥ या साच करावया निज वचना । न देखोनि मम पात्रपणा । अंकी घेवोनि खुणा । सांगीतल्या स्वनामाच्या ॥१०॥**

असेच वेदशास्त्रादिक सर्वांचे म्हणणे आहे पण माझ्या श्रध्देची स्थिति या सर्वांहून विशेष आहे. ती श्रोत्यांनी एकाग्रचित्त करून प्रेमाने श्रवण करावी ॥७॥ ज्यांनी आपल्या नामाचा मंत्र देऊन मला कृतार्थ केले ते सर्व कल्याणाचे कोठार व केवळ करुणेची मूर्ति असलेले आळंदीचे स्वामी श्रीज्ञानेश्वर महाराज माझे सद्गुरु आहेत ॥८॥ कैवल्यरूप सुवर्णाचे दान करतांना जो 'हा मोठा आहे की लहान आहे' ही कसोटी लावून पाहत नाही व जो दृष्टयाचा साक्षात्कार करून देणारा वाटाड्या आहे. म्हणजे 'मोठा असो की लहान असो, श्रीमंत असो की गरीब असो, व्युत्पन्न असो की

अव्युत्पन्न असो' त्याला भगवत्प्राप्तीची तळमळ असली की पुरे, ते त्याचा उध्दार करतात, असा अर्थ ॥९॥ या आपल्या अमृतानुभवातील वचनाला सत्य करून दाखविण्याकरताच त्यांनी माझी पात्रता न पाहता, मला मांडीवर घेऊन आपल्या नामाच्या खुणा सांगितल्या म्हणजे नामाचा अर्थासह बोध केला ॥१०॥

**जो आळंदीत समाधिवासी । जागृत भक्त हृदयदेशी । त्रिभुवनी वाराणसी । ती आळंदी मी म्हणे ॥११॥ भलतैसे हो कां पाणी । जे लागले श्रीगुरुचरणी । ते पी तयाचिया चरणी । लोळे गंगा ॥१२॥ हे असो माझी उपासना । येरव्ही वेद युक्ती अनुभवखुणा । विचारिता नित्यतीर्थपणा आळंदीते ॥१३॥**

असा माझा जो सद्‌गुरुनाथ तोच भक्तहृदयात जागृत असून आळंदीत समाधि लावून बसलेला आहे. म्हणून आळंदी ही त्रैलोक्यात दुसरी वाराणसीच (काशी) आहे, असे मी म्हणतो ॥११॥ विहिरी-तळे-नदी-ओढा यापैकी कोठलेहि पाणी असो पण ते माझ्या श्रीगुरूंच्या चरणास लागले म्हणून अत्यंत पवित्र आहे, असे समजून जो पीतो, त्याच्या चरणांवर गंगा लोळते-म्हणजे गंगाहि आपल्यापेक्षा त्याला श्रेष्ठ समजते ॥१२॥ अशी माझी गुरूपासनेविषयी बुद्धि आहे. ती असू द्या. पण साधारणपणे विचार करून पाहता देखील वेद-युक्ति व अनुभव या तिन्ही दृष्टीनी आळंदीला नित्यतीर्थपणा आहे ॥१३॥

**हिरण्यगर्भान्त आनंदाहून । ब्रह्मनिष्ठानंद अनंतगुण । ऐसी श्रुति सांगे म्हणून । ब्रह्मनिष्ठ**

**तेथ पुण्य सर्वहि ॥१४॥ तयांचे जे शब्द । आकाशी दुमदुमती प्रसिद्ध । आणि पदरजे सिद्ध । पावन धरणी ॥१५॥ परी जे अवतार शरीर । ते त्याहुनी विशेष परिकर । जे शरीरातूनि शुद्ध अंतर । वाहे आरपार शिष्यहृदयी ॥१६॥ ते अनध्यस्तविवर्त । तातांचे अद्यापि आळंदी वसत । आणि सत्कार्यवादे पाहता निश्चित । युक्ति कळे ॥१७॥**

हिरण्यगर्भाच्या म्हणजे ब्रह्मदेवांच्या आनंदाहून ब्रह्मनिष्ठाचा आनंद अनंतपट अधिक असतो, असे तैत्तिरीय उपनिषदातील श्रुतीने सांगितले असल्यामुळे ब्रह्मनिष्ठाचे ठिकाणी संपूर्ण पुण्य असते किंबहुना ब्रह्मनिष्ठ हा संपूर्ण पुण्याचा साठा असतो ॥१४॥ त्याच्या मुखातून जे शब्द निघतात ते आकाशात दुमदुमत राहतात आणखी त्याच्या चरणधुळीने संपूर्ण पृथ्वी पावन होते ॥१५॥ पण जे अवतारी शरीर असते ते अशा ब्रह्मनिष्ठाच्या शरीरापेक्षाहि आणखी विशेषच पवित्र असते. कारण अवतार शरीरातील अन्तःकरण शिष्याच्या हृदयात आरपार शिरू शकते ॥१६॥ ते अवतारांचे शरीर अनध्यस्त विवर्त असते. तसेच श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे शरीरहि अवतारशरीर असून अजून पर्यंत आळंदीत आहे. आणि सांख्याच्या सत्कार्यवादानुसार पाहता त्यांच्या अवतार शरीराविषयी उपपत्तीहि मिळू शकते ॥१७॥

वेदान्ताप्रमाणे विवर्त हा 'अध्यस्त व अनध्यस्त' असा दोन प्रकारचा आहे. हे श्रीज्ञानेश्वरीतील अकराव्या अध्यायात खालील ओवीतून स्पष्ट केले आहे.

**हे अवतार सकळ। जया समुद्रीचे कां कल्लोळ।**
**आणि विश्व हे मृगजळ। जया रश्मीस्तव दिसे।।**
(ज्ञा. अ. ११)

अनध्यस्तविवर्त :–भगवंताच्या अवतारांना समुद्राच्या कल्लोळाची उपमा देऊन अनध्यस्त विवर्त सांगितला आहे. माझी सद्गुरु आई अनध्यस्त विवर्ताची व्याख्या करते-"अभिन्ने सति अपररूपत्वे सति भेद-अभानपूर्वक अधिष्ठान – ज्ञान–अनावरकत्वे सति च प्रीतिमात्रत्वाद्–अधिष्ठानज्ञानानिवर्त्यम् अनध्यस्तविवर्त लक्षणम् ।।" जे शरीर अधिष्ठानरूप सच्चिदानंद परब्रह्माचा विवर्त असून ब्रह्माशी यत्किंचितहि भिन्न न राहता अभिन्नच राहते. व अधिष्ठानाचा लोप न करता अधिष्ठानाचे स्पष्ट ज्ञान होऊ देते आणि जे परमप्रेमाचा विषय असल्यामुळे त्याची अधिष्ठान ज्ञानाने निवृत्तिहि होत नाही, त्या शरीराला 'अनध्यस्त विवर्त' म्हणतात. या शरीराला समुद्राच्या कल्लोळाचा दृष्टांत देऊन माऊलीने हे म्हणणे स्पष्ट केले आहे.

अध्यस्तविवर्त–जीवांची शरीरे अज्ञान व कर्मजन्य असल्यामुळे ती अधिष्ठानरूप परब्रह्माची विवर्त असली तरी अधिष्ठानाचा लोप करून अधिष्ठानाचे ज्ञान होऊ न देणारी–अधिष्ठानाहून भिन्न भासणारी, परमप्रेमाचा विषय होऊ न शकल्यामुळे ज्ञानाने निवृत्त होणारी असतात. म्हणून त्यांना 'अध्यस्त विवर्त' म्हटले जाते. आणि विश्व म्हणजे सर्व जीवांची शरीरे वर सांगितल्याप्रमाणे अध्यस्त विवर्त आहेत हेच माऊलीने "विश्व हे मृगजळ। जया रश्मीस्तव दिसे ।।" या दोन चरणांनी वरील ओवीत सांगितले आहे.

**सत्कार्यवादाची रीति । कापिल ऐसे बोलती ।**
**जे धर्मीविण प्रतीति । धर्माची नोहे ।। १८ ।।**
**अतीतता धर्म जाण । न राहे द्रव्य-धर्मीविण ।**

**धर्म्यभावे धर्मदर्शन । कदा नोहे ।।१९।। आणि धर्मी वाचोनि धर्म राहत । ऐसे जयांचे मत । तया मी पुसोनि परीक्षित । उत्तरप्रचीत दाखवावी ।। २० ।।**

सांख्यवादी कार्य सद्रूप आहे असे प्रतिपादन करताना अशी उपपत्ति देतात की धर्माची प्रतीति धर्मीवाचून येत नाही ॥१८॥ अतीतता म्हणजे भूतकालीन अस्तित्व हा धर्म द्रव्यरूप धर्मीवाचून राहू शकत नाही. ज्याचे ठिकाणी धर्म म्हणजे गुण राहतात त्यालाच धर्मी किंवा द्रव्य म्हणतात. धर्माला वस्तु आधार नसली तर धर्माचे ज्ञानच होणे शक्य नाही ॥१९॥ बरें, द्रव्यवस्तु आधार असल्यावाचून धर्म ज्ञात होऊ शकतो किंवा राहू शकतो असे ज्यांचे मत असेल त्यांची मी प्रश्न विचारून परीक्षा घेतो. त्यांनी असा प्रत्यक्ष अनुभव कोठे येतो दाखवावा ॥२०॥

**साखरेविण गोडपण । जिभेवरी राहवे पूर्ण । की जिभेविण भाषण । श्रवणी यावे ।।२१।। आश्रय-द्रव्य नसता । गमनागमन घडावे तत्वता । की पुत्रचि जगी नसता । भासावे पुत्रत्व ।।२२।। म्हणोनि अतीतता धर्माप्रति । धर्म्याश्रयता व्हावी निरुति । धर्मी तंव घट निश्चिती । यालागी कार्याप्रति सत्पण ।।२३।। आता अनागत-अवस्थान । तेहि न घडे धर्मीविण । अभाव तरी सर्व उत्पन्न । सर्वत्र व्हावे ।।२४।। कारणांतूनि अभिव्यक्त जरी ।**

**प्रागभाव गौरव तरी। याचा समन्वय परी। वेदान्ती ऐसा ।। २५ ।।**

साखरेचे (धर्मी) गोडपण (धर्म) साखरेवाचून जीभेला अनुभवता यावे किंवा जीभेवाचून बोलणे बाहेर पडून कानाला ऐकू यावे ॥२१॥ द्रव्याच्या आश्रयावाचून 'जाणे–येणे' या क्रिया होताना दिसाव्यात किंवा पुत्राचे मुळीच अस्तित्व नसताना पुत्रत्व भासावे ॥२२॥ पण असे होत नाहीं. म्हणून 'अतीतता' या धर्माला धर्मीचा (द्रव्य) आश्रय पाहिजे — घट हा धर्मी सत्य असतो म्हणूनच "घट होता-घट होईल" असा "अतीतता–वर्तमानता–भविष्यता" वगैरे धर्मांचा प्रत्यय येतो. याप्रमाणे कार्य सत्य ठरते ॥२३॥ भविष्यकालीन अस्तित्व (अनागतावस्थान) हे देखील धर्मी असल्यावाचून बोलता येत नाही. धर्मीचे अस्तित्व न मानता धर्मीचा अभाव मानला तर कोठेहि काहीहि उत्पन्न होईल व नियत कार्यकारण भाव मानता येणार नाही ॥२४॥ कारणातून कार्य बाहेर पडते–व्यक्त होते म्हणजे ते त्या विशिष्ट कारणात अभिव्यक्तिपूर्वी असतेच. तेव्हा ते नव्हते असा प्रागभाव मानणे, हा गौरव दोष आहे.—वेदान्त दृष्टीने याचा समन्वय असा होतो ॥२५॥

**सांख्य देती कार्या मुख्यसत्यता। वेदान्ती मानती गौण सत्यता । कालत्रयाबाध्या मुख्यसत्यता । यावत्कालस्थायिता गौण सत्यत्व ।। २६ ।। कारणात्मना स्थायित्वस्वीकार । हा दृष्टिसृष्टिवादेहि विचार। अद्वैतसिद्धीत समग्र। मधुसूदन बोलिले ।।२७।। जीवदृष्टि अनादि**

**म्हणोन । ज्ञातसत्तया कार्या सत्पण । परि येथ उपादान । अविद्या एक ।।२८।। तिची झालिया निवृत्ति । सहजचि कार्यमिथ्याप्रतीति ।–**

सांख्यवादी कार्याला मुख्य सत्यता देतात म्हणजे कार्य हे सदासर्वदा अविनाशी आहे असे समजतात– आणि वेदान्ती व्यवहारापुरती कार्याला सत्यता देतात. १ कालत्रयीहि जिचा नाश होत नाही ती ‘मुख्यसत्यता’ होय. २–यावत्कालस्थायिता म्हणजे कार्यरूप जगताला अधिष्ठानभूत असलेल्या परब्रह्माचे ज्ञान होईस्तोपर्यंत जगद्रूप कार्य सत्य वाटणे याला ‘गौण सत्यता’ म्हणतात. ।।२६।। कार्याचे आपल्या कारणात कारणरूपाने स्थायी अस्तित्व असते, असे वेदान्ताच्या दृष्टिसृष्टि वादातहि मानलेले आहे. असे मधुसूदन सरस्वतींनी ‘अद्वैतसिद्धी’ नामक ग्रंथात विस्ताराने म्हटले आहे ।।२७।। जीवाची वृत्त्यवच्छिन्नरूप दृष्टि अनादिच असल्यामुळे व त्या दृष्टीला कळणाऱ्या कार्याची ज्ञातसत्ता मानली असल्यामुळे ते कार्य ‘कळते तोपर्यंत’– सत्य मानले जाते. पण जगतातील या सर्व कार्यरूप पदार्थांचे उपादान कारण एक अविद्या आहे. “जीवेशौ हि विशुद्धा चित् विभागस्तु तयोर्द्वयोः । अविद्या तच्चितेर्योगः षडस्माकमनादयः ।।” –१ जीव, २ ईश्वर, ३ शुद्ध चिति म्हणजे परब्रह्म, ४ जीव व ईश्वर यांचा भेद, ५ अविद्या, ६ अविद्या आणि परब्रह्माचा संबंध, हे सहा पदार्थ वेदान्तात अनादि कारणरूप मानलेले आहेत. ।।२८।। म्हणून अविद्येची आत्मज्ञानाने निवृत्ति झाल्याबरोबर हे सर्व जगद्रूप कार्य मिथ्या ठरते–

**परि अनध्यसाविवर्त जगत्पति । प्रतिबिंबापेक्षिक बिंबत्वारोपावच्छिन्न बिंबस्थिति जयाची ।।२९।। आणि तच्छरीर नोहे भयाध्यास । यालागी**

**निवृत्यपेक्षा नाही त्यास । शरीरत्वास्तव विवर्त-वास । परि ज्ञानाप्रतिबंधकत्वास्तव अनध्यस्त ।। ३० ।। सत्कार्य म्हणोनि अभिव्यक्तिपूर्वी । देखताती योगज्ञ कवी । परी तेहि भासवे जो रवि । तत्प्रेमान्वय येथ प्रगटे ।।३१।। विषय प्रारब्धाधीन । ते संपलिया होती क्षीण । प्रेम नोहे प्रारब्धाधीन । म्हणोनि प्रियक्षीणत्वा युक्ति नाही ।।३२।। आणि विवर्त म्हणोनि ब्रह्मभिन्न । म्हणाल की बुद्धि क्षीण । तरि आत्मप्रेम समान । तो क्षीण नोहे ।।३३।।**

पण जगत्पति परमात्म्याच्या अवतार शरीराची गोष्ट तशी नाही. ते त्याचे शरीर अनध्यस्त विवर्त म्हणजे अविचारहित आहे.–जलात पडलेल्या प्रतिबिंबाच्या अपेक्षेने जसे सूर्यावर बिंबत्व येते त्याप्रमाणे प्रतिबिंबरूप जीवाच्या अपेक्षेने जो परमात्मा बिंबरूप शरीरधारी झाला आहे. तेच अवतार शरीर होय ।।२९।। भगवंताचे शरीर भय उत्पन्न करीत नाही म्हणून ते नाहिसे व्हावे किंवा निवृत्त व्हावे, अशी कोणाचीहि अपेक्षा असणे शक्य नसते. ते शरीररूपाने प्रत्ययाला येते म्हणून विवर्त आहे आणि आत्मज्ञानाला ते शरीर प्रतिबंध करीत नाही म्हणून अनध्यस्त आहे ।। ३० ।। सांख्यांच्या सत्कार्यवादानुसार ते भगवंताचे शरीर अवताररूपाने प्रगट होण्यापूर्वीहि असतेच व योगसंपन्न ज्ञानी पुरुष त्या शरीराला पाहतातहि. ज्या चैतन्यप्रकाशरूप सूर्याने ते शरीर प्रत्ययाला येते त्याच्या निस्सीम प्रेमामुळे

जगात त्याचा प्रत्यक्ष प्रकट अनुभवहि येतो ॥२१॥ विषय हे प्रारब्धानुसार प्राप्त होत असतात म्हणून प्रारब्ध संपले की ते ते विषय नाश पावतात. परंतु प्रेम हे स्वरूपभूत असून प्रारब्धाने प्राप्त झालेले नसते. म्हणून निस्सीम प्रेमाने प्राप्त होणारे परमात्म्याचे शरीर प्रारब्ध संपले असता नाश पावते असे म्हणण्याला काहीहि उपपत्ति सापडत नाही ॥२२॥ आणि ते शरीर परब्रह्माचा विवर्त आहे म्हणून परब्रह्माहून भिन्न नाही एकरूपच आहे. "बुद्धि क्षीण होईल तेव्हा प्रेमहि क्षीण होईल व त्या प्रेमाने अनुभवाला येणारे भगवंताचे शरीरहि क्षीण होऊन नाहिसे होईल" असे कोणी म्हणतील पण आत्मप्रेम 'अधिक-न्यूनभाव रहित' अखंड सम राहणारे असल्यामुळे ते कधीहि क्षीण होत नाही म्हणून त्या प्रेमाने झालेले परमेश्वराचे शरीरहि क्षीण झाले-नाश पावले, असा प्रत्यय येऊ शकत नाही ॥२३॥

**आणि विवेकहि करिता । दृष्टिसृष्टिवादीय ईशैक्यता । अथवा शुद्ध ब्रह्मैक्यता । घेतली जरी ॥३४॥ तरी परानुग्रहार्थ स्वानुभववृत्ति । न चुके अक्षय जीवन्मुक्ति । यालागी भगवद्देहस्थिति । नित्य मी म्हणे ॥३५॥ आणि कुजन-हनन जे अवतारी । तेथ आरोपित तम भासे तरी । परी भक्तिस्थापन जे अवतारी । तेथ आरोपितही गुण न भासती ॥३६॥ तैसा माझा ताताविर्भावो । वरी समाधि सावेवो । योगशास्त्रयुक्तिप्रवाहो । ऐसा याचा ॥३७॥**

आत्मानात्मविवेक केला असता जीव दृष्टिसृष्टिवादातील ईश्वराशी किंवा शुद्ध ब्रह्माशी ऐक्य पावतो असे म्हटले तरी परानुग्रहार्थ आत्मानुभववृत्ति व त्यामुळे जीवन्मुक्तस्थिति कायम राहत असल्यामुळे जीवन्मुक्ताच्या देहस्थितिरूप प्रारब्धाच्या अपेक्षेने भगवंताची देहस्थिति नित्य कायम राहते असेच मी म्हणतो ॥३४-३५॥ दुष्टांचा संहार करण्याकरता घेतलेल्या अवतार शरीराच्या ठिकाणी, संहाररूप तमोगुणाचा आरोप करता येत असला तरी भक्तिप्रेमाकरता घेतलेल्या अवतार शरीराच्या ठिकाणी कोणत्याहि गुणांचा आरोप होऊ शकत नाही. ॥३६॥ भक्तिस्थापने करता होणाऱ्या अवताराच्या शरीराप्रमाणे माझे तात श्रीज्ञानेश्वर महाराज यांचा अवतारविग्रह असून आणखी त्यांनी समाधि लावलेली आहे. म्हणून त्याच्या देहाच्या अविनाशीपणाची योगशास्त्राप्रमाणे पुढील उपपत्ति देता येते ॥३७॥—

**विक्षिप्त-भूमिकेवरी चित्त असता । तीचि भूमिका तीव्र होता । तरी यक्षादिसमान तत्वता । शरीर होय ॥३८॥ असता एकाग्रभूमिकेवरी । शरीर जैसे ध्यानाहारी । ब्रह्मलोकस्थ प्रचारी । समान दिसे ॥३९॥ आणि निरुद्ध-भूमिकेवरी चित्त । असता सत्वसम शरीर होत । संस्कारशेष असंप्रज्ञात । लाधता गुणद्वय अनभिभूत देह होय ॥४०॥**

( १ )-'विक्षिप्त' भूमिकेवर चित्त असून ती भूमिका दृढ किंवा तीव्र झाली असता यक्षादिकांच्या शरीराप्रमाणे योग्याचे शरीर होते. (यक्षशरीरात गुप्त होणे, आकाशगमन वगैरे काही सिद्धी असतात त्याप्रमाणे) ॥३८॥

( २ )–'एकाग्र' भूमिकेवर चित्त असून ती भूमिका तीव्र झाली असता योग्याचे शरीर ब्रह्मलोकात राहणाऱ्या ध्यानस्थ जीवांच्या शरीराप्रमाणे होते ॥३९॥

( ३ )–सात्विक अशा 'निरुद्ध' भूमिकेवर चित्त असून ते दृढ झाले असता योग्याचे शरीरहि सत्वमय होते. आणि

( ४ )–केवल संस्कारमात्र चित्त राहते अशा 'असंप्रज्ञात' समाधीत योगी असताना त्याचा देह पूर्ण रजस्तमरहित असा शुद्धसत्वात्मक होतो ॥४०॥

**तो समाधीची जरी दृढ । तरी हृदयसूर्यकान्त उघड । चैतन्यसूर्यप्रभा सुघड । निघे तेथुनी ॥४१॥ ते जना पवित्र करी । मग तया शरीरी । रजस्तम भरोवरी । न स्पर्शे कदा ॥४२॥ प्रलयकालीचाही तम देखे । तया सत्वदेहा अभिभवू न शके । हे बोलिले निके । योगवासिष्ठी ॥४३॥**

ज्या योग्याचा हा असंप्रज्ञात समाधि दृढ होतो त्याचे हृदय इतके शुद्धसात्विक होते की सूर्यकान्त मण्यातून सूर्याची किरणे जशी दुसरीकडे परावृत्त होऊन सूर्याप्रमाणे दैदिप्यमान अशी केंद्रीभूत होतात त्याप्रमाणे त्याच्या हृदयातून अधिष्ठानभूत चैतन्यसूर्याची किरणे स्पष्ट बाहेर पडून शिष्याच्या हृदयात प्रवेश करतात. ॥४१॥ व इतर जनांना कृतार्थ करतात. त्या शरीराला रजस्तमगुणरूपी मळाचा पुनः कधीहि स्पर्श होत नाही ॥४२॥ येवढेच नाही तर सर्वसंहार करणारा प्रलयकालीचा प्रचंड तमोगुण देखील त्या शुद्ध सात्विक देहाला आपल्यात लीन करून घेऊ शकत नाही, असे योगवासिष्ठात स्पष्ट सांगितले आहे ॥४३॥

माझी सद्गुरु आई 'प्रियलीलामहोत्सव' सखिप्रेषण १३ मध्ये म्हणते की,—

अहो जलस्थ प्रतिबिंबे सूर्य व्हावे। परी सूर्यकांती येवोनि तृण जाळावे। तैसे जीवन्मुक्ते विदेहमुक्त व्हावे। परी हृदयसूर्यकान्ती येवोनि जाळावे। जगदोष ॥२५०॥ आधी सात्विक केलिया प्राण। तो सहजचि स्थिर होय आपण। परी हृदय सात्विक होय म्हणून। प्रकाशे चेतन त्यांतुनी ॥२५१॥ मग तया चेतनाचेनि योगे। भजकजन पूर्ण होवो लागे। यालागी विदेहमुक्ताची सवेगे। समाधि कीजे ॥२५२॥ आळंदीवल्लभ समाधिवासी। ते स्वये मुक्तचि निश्चयेसी। परी मुक्तिप्रभा हृदयसूर्यकान्तासी। मिळुनी उपदेशी दीनजना ॥२५३॥ समुद्री मिळालिया संपूर्ण। मेघ जरी नेईल त्यातुन। तरी प्रतिबंधीना जीवन। तयापरी ॥२५४॥ तैसे विदेहमुक्त जाहले। आणि हृदयसूर्यकान्ती ज्ञान प्रगटले। ते इतरा उजळोनि मुक्तिद झाले। तरी आम्ही ना न म्हणो ॥२५५॥ अविरोधि म्हणोनि भेद नाही। इतरांचे कार्य करी सर्वदांही। यालागी समाधिस्थ ज्ञानेश आई। गुरुरूपे अनादि अनंत ॥२५६॥ नित्यचि चैतन्य विख्यात। आणि जो हृदयसूर्यकान्त। तत्स्थप्रभा जनकार्य करीत। मग निवटाया समर्थ कवण असे ? ॥२५७॥ यालागी अनंत अनंत। आळंदी हे मुख्य तीर्थ। आणि उपदेशक तात।

**अखंडचि ॥२५८॥ परी ते परमेश्वरचि म्हणोनी । सिद्धसूर्यकान्त सूर्यस्थानी । इतर जे कां मुक्त कोणी । ते साध्यसूर्यकान्ती सिद्धसूर्य ॥२५९॥ सिद्ध सूर्यरूप चिद्घन । प्राण केलिया सत्वगुण । आपुले जे हृदय पूर्ण । ते साध्यसूर्यकान्त होय ॥२६०॥**

अहो जलात पडलेल्या सूर्याच्या प्रतिबिंबाला प्रतिसूर्य व्हावयाचे असेल तर त्याने सूर्यकान्त मण्याच्या द्वारा आपली किरणे केंद्रीभूत केली पाहिजेत तेव्हाच ते प्रतिसूर्य होऊन सूर्याप्रमाणे तृण जाळू शकते. त्याचप्रमाणे जीवन्मुक्तहि निर्विकल्प समाधि दृढ साधून विदेहमुक्त होतात तेव्हा ते शुद्ध सात्विक अशा हृदयसूर्यकान्त मण्याच्या द्वारा अधिष्ठानभूत ज्ञानसूर्याची किरणे बाहेर फेकून लोकांचे दोष जाळू शकतात ॥२५०॥ प्राण सात्विक झाला असता तो स्थिर होतो व हृदयहि सात्विक होते, म्हणूनच त्या हृदयातून चेतनाचा प्रकाश बाहेर पडतो ॥२५१॥ मग त्या हृदयातून बाहेर पडणाऱ्या ज्ञान–प्रकाशाच्या योगाने त्या ज्ञानी पुरुषाची भक्ति करणारे भक्त पूर्ण होऊ लागतात. म्हणूनच निर्विकल्प सामाधि साधून विदेहमुक्त झालेल्याची शीघ्राति-शीघ्र लगेच समाधि केली पाहिजे ॥२५२॥ आळंदीवल्लभ श्रीज्ञानेश्वरमहाराज समाधीत आहेत आणि ते स्वतः खरोखर नित्यमुक्तच आहेत तरी नित्यमुक्ति-रूप ज्ञानसूर्याची प्रभा त्यांच्या शुद्ध सात्विक अशा हृदयरूप सूर्यकांत मण्याशी संबंधित होऊन मुमुक्षुजनांना उपदेश करीत असते ॥२५३॥ संपूर्ण नदीनदांचे पाणी समुद्रात मिळाल्यानंतर तेच पाणी घेऊन जर मेघ तयार होऊ लागले तर पाणी त्याला 'नाही' म्हणत नाही ॥२५४॥ त्याप्रमाणे विदेहमुक्त होऊन हृदयरूप सूर्यकान्तात त्यांचे ज्ञान प्रगट झाले आणि इतरांना मुक्ति देईल असे उपकारक झाले तर आम्ही 'नाही' म्हणत नाही ॥२५५॥ हृदयरूप सूर्यकान्त मण्यात प्रगट झालेले ज्ञान अधिष्ठानभूत ज्ञानरूप सूर्याशी विरोधि नसल्यामुळे

ते त्याच्याहून भिन्न होत नाही आणि इतर जीवांना मोक्ष देण्याचे कार्य सतत करते, म्हणून निर्विकल्प समाधिस्थ असलेली श्रीज्ञानेश्वरमाऊली अनादि व अनंत कालपर्यंत सर्वांना गुरुरूप आहे ॥१५६॥ चैतन्य नित्य आहे हे प्रसिद्धच आहे आणि जर त्याची हृदयरूप सूर्यकान्तात पडलेली प्रभा जनोद्धाराचे कार्य करीत असते, तर त्याचे निवारण करण्यास कोण समर्थ आहे ? ॥२५७॥ म्हणून आळंदी हे अमर्याद व अविनाशी असे मुख्य तीर्थ आहे आणि तात श्रीज्ञानेश्वर महाराज हे उपदेश करणारे अखंड गुरु आहेत. ॥२५८॥ आणि पुनः ते अवतार म्हणून परमेश्वरच असल्यामुळे त्यांचे हृदय अनादि स्वतःसिद्ध सूर्यकान्तमणीरूप असून, ते स्वतः अनादि अनंत स्वतःसिद्ध अशा ब्रह्मरूप सूर्याचे ठिकाणीहि आहेत.—प्रथम बद्ध असून नंतर मुक्त होणारे असे इतर जे कोणी आहेत ते 'साध्य' म्हणजे नवीन तयार होणाऱ्या शुद्ध सात्विक हृदयरूप सूर्यकान्तमण्यामध्ये राहणारे शुद्ध अनादि अनंत असे ब्रह्मरूप सिद्ध सूर्य आहेत. ॥२५९॥ सच्चिदानंदघन वस्तु सिद्ध सूर्याचे ठिकाणी असून प्राण स्थिर झाल्याने सात्विक होणारे हृदय साध्य सूर्यकान्त मण्याचे ठिकाणी आहे ॥२६०॥

**राये कर्कटीचो मूर्ति । करिता सत्वयुक्ती । कर्कटी समाधिस्थ होती । तरि मूर्तीत प्रवेशिली ।।४४।। अप्सरेमागे भृगुसूत । योगे धावताहि शरीर तैसेचि स्थित । मग जो अत्यंत समाधिस्थ । तच्छरीर केवि नाशे ? ।।४५।। काकभृशुंडि मुनी । वृक्षसहित शरीर घेऊनी । प्रलयीहि राहुनी । चिरजीवी ।।४६।।**

राजा विक्रमाने कर्कटी राक्षसीची मूर्ति केली असता कर्कटी समाधिस्थ असतानाहि तिने सत्वगुणाच्या आश्रयाने मूर्तीत प्रवेश केला. असे योगवासिष्ठ उत्पत्ति प्रकरण अध्याय ८३ मध्ये सांगितले आहे. ॥ ४४ ॥ ध्यानसमाधि लावून बसलेला भृगुऋषींचा पुत्र शुक्राचार्य अप्सरेमागे जाऊं लागला तरी त्याचे शरीर पडले नाही किंवा नष्ट झाले नाही. मग जो 'असंप्रज्ञात' समाधि लावून बसलेला आहे त्याचे शरीर नाश पावते, असे म्हणण्याला काहीच प्रमाण नाही ॥ ४५ ॥ तसेच काकभृशुंडिमुनी हे ज्या वृक्षावर बसले होते त्या वृक्षासह प्रलयामध्ये देखील आपले शरीर मोक्षाप्रमाणे अविनाशी करून राहिले होते ॥ ४६ ॥

**हे ब्रह्मवराची ख्याति । आणि निरुद्धभूमिकेची स्थिति । पाहता ब्रह्मलोकावरुती । सहज आहे ।।४७।। मग तच्छरीरा कवण । जंतु नाशू शकेल आपण । जयांचे होताचि दर्शन । सत्वसंपन्न सर्व होती ।।४८।। म्हणोनि प्रलयीचा योगिया । आघातु न करी अपाया । वरी अनध्यस्तविवर्त तया । न करी, हे बोलणे के ।।४९।।**

अशी निरुद्धभूमिकेवर राहणाऱ्या श्रेष्ठ ज्ञान्यांच्या शरीराची स्थिति सांगितली आहे. विचार केला असता ही स्थिति ब्रह्मलोकात राहणाऱ्या लोकांच्या प्रलयापर्यंत टिकणाऱ्या शरीरस्थितिपेक्षाहि अधिक श्रेष्ठ आहे असे सहज दिसून येते ।।४७।। मग ज्याचे हृदय अत्यंत शुद्ध सत्वात्मक झाले असल्यामुळे–ज्याच्या दर्शनाने इतर लोक तत्काळ सत्वसंपन्न होतात अशा पुरुषाच्या शरीराचा रजोगुणी–तमोगुणी असे जंतू कसा नाश करू शकतील ?

॥४८॥ अशाप्रकारे जर योगसंपन्न ज्ञान्याच्या शरीरावर प्रलयकालचा आघात देखील अपाय करू शकत नाही, तर मग अविचाररहित अशा अनध्यस्त विवर्त शरीरावर प्रलयाचा देखील आघात होऊं शकत नाही, हें काय सांगावयाला पाहिजे ॥४९॥

**आणि भक्तिप्रेमाचिये पिसे । हृदयसत्व सूर्यकांतासरिसे । जेथोनि चैतन्य प्रकाशे । चिरजीवी वसे भक्तहृदयी ।।५०।। ते परब्रह्मशरीर । न नाशे हा दृढ विचार । तदवच्छिन्न साचार । देश तैसा ।।५१।। यालागी आळंदीतीर्थ । मज वाटे नित्य जीवंत । आणि स्वानुभवही येथ । प्रमाण आहे ।।५२।।**

ज्या अनध्यस्त विवर्त शरीरातील सूर्यकान्तमण्यासारख्या शुद्धसत्वमय झालेल्या हृदयातून चैतन्याचा प्रकाश बाहेर स्पष्ट फाकतो, ते अनध्यस्तविवर्त शरीर भक्ताच्या भक्तिप्रेमाला अत्यंत वश होऊन भक्ताच्या हृदयात अखंड वास करते ॥५०॥ असे हे पूर्णब्रह्मरूप असलेले शरीर कधीहि नाश पावत नाही, हे पूर्ण विचारांती सिद्ध आहे. म्हणून असे हे शरीर ज्या देशात राहते तो देशहि त्याच्या प्रभावाने तसाच अविनाशी होतो ॥५१॥ म्हणून आळंदीतीर्थ हे कधीहि नाश न पावता अखंड जिवंत राहणारे आहे. असे मला वाटते. व याला माझा अनुभवहि प्रमाण आहे ॥५२॥

**मूर्तीत ऐशिया शरीराची । भावना केलिया साची । उपासना भक्ताची । यदाधारे सिद्ध**

॥५३॥ तैसे प्रत्यक्ष शरीर । जेथ नित्य पूर्वयुक्त्य-नुसार । तेथ नित्यतीर्थता समग्र । कां न राहे ? ॥५४॥ तया नित्यतीर्थी । स्नान करोनि गुरुमूर्ती । ध्याता, तेहि होती । तेणेचि माने ॥५५॥

जड मानल्या गेलेल्या मूर्तीत देखील अशा अनध्यस्त शरीराची भावना धरून उपासना केली असता त्या अनध्यस्त शरीराच्या प्रभावाने उपासना सिद्ध होऊन संपूर्ण मूर्ति अनध्यस्तविवर्त शरीरमय आहे, असा प्रत्यक्ष अनुभव येतो ॥५३॥ तर पूर्वी उपपत्तींनी सिद्ध केल्याप्रमाणे जेथे अनध्यस्त विवर्त अशा शरीराचाच नित्य वास आहे, त्या स्थळाला नित्यतीर्थत्व कां येणार नाही ? ॥५४॥ त्या आळंदीरूप नित्य तीर्थामध्ये स्नान करून त्या अनध्यस्तविवर्त शरीरधारी गुरुमूर्तीचे ध्यान करणारेहि त्यांच्यासारखेच अनध्यस्त विवर्त शरीरधारी होतात ॥५५॥

श्रीज्ञानेश्वर जनक जननी । अनंतकाल तदीय चरणी । राहोनी नित्यतीर्थ वाखाणी । मुक्तहि असोनि सर्वदा ॥५६॥ जय जय सद्गुरो ज्ञानेश्वरा । जय जय सद्गुरो करुणाकरा । जय जय सद्गुरो विश्वंभरा । मज चरणी दातारा, नित्य ठेवा ॥५७॥

श्रीज्ञानेश्वर महाराज हेच माझे माता व पिता आहेत. मी त्यांचे कृपेने मुक्त होऊनहि, अनंत काल त्यांचे चरणांचे ठिकाणी राहून नित्यतीर्थ अशा आळंदीची कीर्तिच गात राहीन ॥५६॥ हे करुणाकरा आणि विश्वंभरा सद्गुरो श्रीज्ञानेश्वरा ! आपल्या चरणांचे ठिकाणीच मला हे दातारा ! अखंड ठेवा ॥५७॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर कृपाप्रसादे ओवीछंदबद्धे श्रुत्या, युक्त्या, स्वानुभूत्या परमसमाधिरूपसंस्थानाद् आलंदेर्नित्यतीर्थवर्णनं श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराज चरणयोस्समर्पितम् ।

श्रुति-युक्ति-अनुभव या तिन्ही प्रमाणांनी पाहता श्रीज्ञानेश्वरमहाराज परमसमाधि लावून आळंदीत बसलेले आहेत म्हणून आळंदी नित्यतीर्थ आहे असे केलेले हे वर्णन म्हणजे 'आळंदी महिमा' श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजांच्या चरणांवर समर्पण असो !

पुढील प्रकाशने

१. श्रीगुलाबराव महाराजांचे चरित्र.

२. भक्तिपदतीर्थामृत-सार्थ.

# वैदर्भीय संतश्रेष्ठ श्रीगुलाबरावमहाराज विरचित

# 'सूक्ति रत्नावली'

## या ग्रंथमालेची माहिती

### ग्रंथमालेच्या प्रत्येक भागाला यष्टि असे नाव आहे.

१ यष्टिः– यांत भक्तिपदतीर्थामृत, कान्तकान्तावाक्यपुष्पम् निगमान्तपथसंदीपक, चौसष्टी, भगवद्गीतासंगति, निदिध्यासनप्रकाश इत्यादि आठ प्रकरण ग्रंथ आहेत.– २.

२ यष्टिः– पूर्वार्धांत–कृष्णपंचपदी, सद्वैजयंती, बाराखडी, चित्तोपदेश, त्रिकांडसार, तुंबडी, चिरंजीवपदाभ्यास, शांतिसुधाकर, सोपानसिद्धि, नित्यतीर्थ, मणिमंजुषा, प्रियपाहुणेर, अलौकिकप्रवास, अमोघनिरूपण व स्त्रीगीत इत्यादि प्रकरण ग्रंथ.— २.

उत्तरार्धः– रुक्मिणीपत्रिका, ध्यानयोगदिवाकर, गुरुपंचपदी. २.

३ यष्टिः– 'प्रियलीलामहोत्सव' यांत श्रीमद्भागवत स्कंध पहिला यावर गद्यपद्यात्मक टीका आहे. ३ = ५०

द्वितीय आवृत्ति– 'भागवतरहस्य' भा. १–२ ४ = ५०

४ यष्टिः– 'स्त्रीगीतसंग्रह' यांत स्त्रियोपयोगी भक्तिरसपूर्ण गाणीं आहेत. १ = ५०

५ यष्टि :– 'अलौकिक व्याख्यानमाला' पौर्वात्य व पाश्चात्य तत्वज्ञानांचा तुलनात्मक गद्य ग्रंथ— ४ थी आवृत्ति २

६ यष्टिः– 'स्वमंतव्य सिद्धान्ततुषार' यात मधुराद्वैताचे हिंदीभाषेत सुंदर विवेचन. १.

७ यष्टि :– यात उपदेशामृतपूर्ण आणि विचारप्रचुर अशी सदतीस पत्रे आहेत. ( २ आवृत्त्या संपल्या ) ×

८ यष्टि :– ' साधुबोध ' यात धार्मिक, नैतिक, सामाजिक व राजकीय इत्यादि विविध विषयांवर एक हजार प्रश्नोत्तरे आहेत.

( तीन आवृत्त्या संपल्या ) ×

९ यष्टि :– पूर्वार्ध– १ अभंगाची गाथा. २ = ५

२ पदांची गाथा २ = ५०

उत्तरार्ध– आख्याने २.

१० यष्टि :– 'प्रेमनिकुंज' यात ज्ञानोत्तर मधुराद्वैत भक्तीचे शास्त्रीय विवेचन केले आहे. ×

११ यष्टि :– 'संप्रदायसुरतरू' हा अलौकिक सांप्रदयिक ग्रंथ असून यात

१ पूर्व विहार ×

२ उत्तर विहार ५.

१२ यष्टि :– यात ४३ पत्रे असून त्यात डार्विन, स्पेन्सरादिकांचे मतखंडन व विविधप्रकारचे तेजस्वी लेख आहेत. ×

१३ यष्टि :– ' सुखवरसुधा व वेदान्तपदार्थोद्देशदीपिका ' हे दोन ग्रंथ असून यात श्रीमहाराजांचे ग्रंथ तारतम्येकरून कसे प्रमाण मानावेत याचे व दुसऱ्यात वेदान्ताची शास्त्रीय परिभाषा समजण्याचे स्पष्टीकरण केले आहे. १.

१४ यष्टि :– यात ओवीबद्ध नारदीयभक्तिसूत्रभाष्य, प्रियलीला महोत्सव व सांख्यसुरेंद्र हे तीन ग्रंथ आले आहेत. ५.

१५ यष्टि :– ईशावास्योपनिषद, प्रमादकल्लोळ, पतिव्रता चरितामृत, सुखपर्व (नाटक) आत्मचरित्रादि ३० प्रकरणे आहेत. ५.

१६ यष्टि :– यात नारदीयभक्तिसूत्रभाष्यम्, बालवासिष्ठम्, शास्त्रसमन्वयः, इत्यादि तीस संस्कृत ग्रंथ आहेत. ५.

१७ यष्टि :– ‘समयोपदेश’ वेगवेगळ्या अधिकारी शिष्यांना केलेला बोध यात ग्रंथित आहे. ५.

१८ यष्टि :– समयोपदेश भा. २ २.

१९ यष्टि :– ‘मनोहारिणी’ भगवद्गीतेच्या काही श्लोकावर हिंदीत निरूपणे. ० = ५०

२० योगप्रभाव भा. १–२–३ ५.

फुली असलेले ग्रंथ शिल्लक नसल्याने ‘पुस्तिकावृत्ति’ रूपाने (Pocket Edition) प्रकाशित करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

---

# आर्यधर्मोपपत्ति

## लेखक :–श्रीबाबाजीमहाराज पंडित.

“ आपला आर्यधर्म ईश्वर निर्मित आहे काय ? मनुष्य निर्मित कां नाही ? तो सर्व धर्माहून श्रेष्ठ आहे, याला काही प्रमाण आहे काय ? कोणी लिहिलेला इतिहास प्रमाण मानावा ? ‘ आजचे इतिहास संशोधक इतिहासप्रामाण्यविचारकसोटीला कितपत उतरतात ? ‘ आर्य बाहेरून आले ’ या संशोधनात काय चुकले आहे ? हिंदुधर्मात शुद्धिकरण होऊ शकते की नाही ? होत असल्यास कोणाचे आणि कसे ? ब्राह्मणांनी वेदविद्या चोरून ठेवली की काय ? हिंदु म्हणजे काय ? त्यांचे संघटन कसे शक्य आहे ? आजचा मुख्य धर्म भागवत धर्मच कां ? तो सर्वश्रेष्ठ कां आहे ?” वगैरे अनेक धर्म विषयक प्रश्नोपप्रश्नांची सयुक्तिक उत्तरे श्रुतिस्मृति–पुराणे व संतवाङ्मय यांच्या एकवाक्यतेसह आणि परकीयमतखंडणपूर्वक हवी असल्यास या ग्रंथाचे परिशीलन करणे आवश्यक आहे.

किंमत दोन रुपये

## वैदर्भीय संत श्रीगुलाबरावमहाराज विरचित

# अलौकिक व्याख्यानमाला

पृ. १८० ] चतुर्थ आवृत्ति [ २ रु.

भारतीय विचारसरणीचे त्रिकालाबाध्यत्व सिद्ध करण्यासाठी पाश्चात्य विचारधारांवर ‘ मूले कुठारः ’ न्यायाने त्यांच्या मूलभूत सिद्धान्तांचे तर्कशुद्ध व सप्रमाण खंडण करणे आवश्यक आहे, हे लक्षांत घेऊन या ग्रंथात “ अन्तस्फूर्ति–बहूपयोगिता–उत्क्रांतिवाद–परमाणुवाद–तर्कशास्त्र–स्वप्नविज्ञान ” वगैरे अनेक विषयांचा तौलनिक विचार करून त्यांचा फोलपणा सुस्पष्ट दाखविला आहे.

मानसशास्त्राचा अभ्यास करणाऱ्यांना तर भारतीय मनोविज्ञान आणि परकीय मनोविज्ञान यांच्या तुलनेसंबंधी नवनवीन युक्तिवाद अनेकविध स्वरूपात सांपडतील. तसेच अध्यात्ममार्गातील मुमुक्षूंना वैषयिक–सामाजिक प्रेमापासून तो तहत ज्ञानोत्तर भक्तीतील परमप्रेमाकडे हळूहळू कसे जावे, त्यातील अडथळे कसे टाळावे, वगैरे संबंधी अनेक प्रक्रिया सांपडतील. ‘आधुनिक गुरुभक्तितील भोंदूगिरी’ संबंधी विचार करताना ‘ वेडे आणि साधु ’ यांच्यातील भेद स्पष्ट दाखवून मुमुक्षुजनांना या ग्रंथात सावध केले आहे.

अशा प्रकारे बुद्धिवाद्यांच्या बुद्धीला आणि भाविकांच्या श्रद्धेला परिपुष्ट करणाऱ्या विवेचनाने हा ग्रंथ भरलेला आहे.

**ग्रंथप्राप्तीचे ठिकाण—**

**मधुर प्रकाशन**

C/o गोपाल प्रिंटिंग प्रेस,

बडकस चौक, नागपूर–२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ३६८०५
क्रमांक ९६२२ दि. ...

REFBK-0013487

REFBK-0013487

## साहित्य सम्राट

## नरसिंह चिंतामण केळकर :

" खडे तात्त्विक बोल व सुभाषिते " हा उत्कृष्ट ज्ञानप्रद वाङ्मयाचा एक चांगला नमुना व कसोटी आहे. श्रीगुलाबराव महाराज यांच्या ग्रंथात दोन्ही प्रकारचे वाङ्मय बरेच आहे. यांचे एकंदर ग्रंथ पाहता तो एक 'ज्ञानकोश' किंवा 'एन्सायक्लोपिडियाच' झालेला आहे."

गोपाल प्रिंटिंग प्रेस